म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. २५९

ग्रमाला : पुस्तक

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ७०३९८
ठाणें

# संततिनियंत्रण

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ... नं. २५९
ता. ...
ठाणें

लेखक

नारायण गोविंद चापेकर, बी. ए., एल्एल्. बी.
'निवडक लेख,' 'वैदिक निबंध,' 'गच्चीवरील गप्पा,'
'पैसा,' 'आमचा गांव' इत्यादि ग्रंथांचे कर्ते

पुणें

REFBK-0004612

शके १८५४ ] किंमत १२ आणे [ इ. स. १९३२

लोकशिक्षण-लघुग्रंथमाला : पुस्तक १

# [illegible]

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. नि. नं. ५२०
ता. २२/५/३३
ठाणें.

लेखक

नारायण गोविंद चापेकर, बी. ए., एल्‌एल्. बी.

'निवडक लेख,' 'वैदिक निबंध,' 'गच्चीवरील गप्पा,'
'पैसा,' 'आमचा गांव' इत्यादि ग्रंथांचे कर्ते

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ४६१२
(स्थळ पुस्तक)

REFBK-0004612

शके १८५४ ] किंमत १२ आणे [ इ. स. १९३२

संपादक व प्रकाशक: गणेश गंगाधर जांभेकर
'लोकशिक्षण-लघुग्रंथमाला'
सदाशिव पेठ, पुणें

"अणुभ्यश्च महद्भ्यश्च शास्त्रेभ्यः कुशलो नरः ।
सर्वतः सारमादद्यात् पुष्पेभ्य इव षट्पदः ॥"

मुद्रक: गणेश काशिनाथ गोखले,
सेक्रेटरी, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स
४९५-४९६ शनिवार पेठ, पुणें

# प्रस्तावना

वाङ्मय-क्षितिजावर समाजशास्त्राचा उदय हा सापेक्षदृष्ट्या नूतनच म्हटला पाहिजे. म्हणून ह्या शास्त्राच्या शाखास्थानीं असणाऱ्या विषयांवर इंग्रजींतहि फारसे ग्रंथ उपलब्ध नाहींत ह्यांत आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. 'समाजनियंत्रण' हा जरी अत्यंत महत्त्वाचा व उपयुक्त विषय असला तरी तो एक त्या शास्त्राचा पोटभाग आहे. समाजशास्त्रान्तर्गत अनेक विषयांवर स्वतंत्र ग्रंथरचना पाश्चात्त्य देशांत झाली आहे व होत आहे. परंतु समाजनियंत्रणावर वाचण्यासारखा इंग्रजी ग्रंथ म्हणजे प्रसिद्ध अमेरिकन् समाजशास्त्रज्ञ प्रो. रॉस ह्यांचाच आहे असें वाटतें. प्रस्तुत पुस्तकाची कल्पना याच ग्रंथावरून सुचली हें सांगणें अवश्य आहे.

समाजांत गोंधळ उडूं नये, सर्वांचें सुख साध्य व्हावें, व्यक्तिहित व समाजहित ह्यांत विरोध येऊं नये, तसेंच ऐहिक व पारमार्थिक कल्याण सर्वांना साधतां यावें ह्याकरितां समाजनियंत्रणाची आवश्यकता असते. अर्थात् उन्नति पाहिजे असेल तर नियंत्रणाशिवाय भावी समाजाचें चालणार नाहीं. मनुस्मृतीमध्यें दण्डाचा महिमा वर्णिला आहे तो ह्याचकरितां होय. नियंत्रणाचे अनेक प्रकार, त्याची दिशा व मर्यादा, त्याचप्रमाणें नियंत्रण सफल होण्यासाठीं राजा व प्रजा ह्यांनीं करावयाचे प्रयत्न इत्यादि गोष्टींचा विचार प्रस्तुत लहानशा ग्रंथांत केला आहे. हल्लींच्या काळांत स्वातंत्र्याविषयींच्या विस्तृत कल्पना समाजांत प्रसृत होत चालल्या आहेत हें कोणासहि दिसून येईल. अशा वेळीं समाजनियंत्रणाचीं तत्त्वें समजून घेणें अवश्य आहे. नियंत्रणाच्या अभावीं समाज अधोगतीला जाईल हें तत्त्व प्राचीन तत्त्ववेत्यांनीं फार उत्तम रीतीनें विशद केलें आहे. लोकांचे सर्व व्यवसाय दण्डामुळेंच योग्य रीतीनें चालतात-'दण्डे प्रतीयते वृत्तिः।' असें चाणक्य-सूत्र आहे. मनु म्हणतो, 'दण्डं धर्मं विदुर्बुधाः।'-'दण्ड हा धर्म आहे असें शहाणे लोक मानतात.' पूर्वीचेच विचार,पण आधुनिक पाश्चात्त्य ग्रंथांच्या तऱ्हेवर न्याय-शास्त्राच्या पद्धतीनें प्रतिपादिल्याशिवाय कोणाचेंच समाधान होत नाहीं. ह्यास्तव **'लोकशिक्षण-लघुग्रंथमाले'** चा आश्रय घेऊन ह्या मनोवेधक परंतु बहुंशीं तात्त्विक विषयाची मांडणी उपरिनिर्दिष्ट पद्धतीस अनुसरून केली आहे. ज्या देशांत महाभारतासारखा समाजशास्त्राचा रत्नाकर निर्माण झाला त्या देशांत

समाजशास्त्राचें अध्ययन अत्यल्प प्रमाणांत असावें आणि अमेरिकेसारख्या आधुनिक देशांत तें अतिशय मोठ्या प्रमाणांत व्हावें हें आश्चर्य नव्हे काय ?

असो. हें कार्य करण्याची संधि दिल्याबद्दल ' **लोकशिक्षण** ' मासिकाच्या विद्वान् संपादकांचा मी अत्यंत ऋणी आहें. त्यांच्या प्रोत्साहनाशिवाय हा लघु... इतक्या लवकर प्रकाशन पावला नसता, कदाचित् जन्मासहि आला नस... तसेंच तो लिहितांना प्रो. वा. ना. गोडबोले, एम् ए. ह्यांच्याशीं जी ... करण्यांत येत असे तिचा मला फारच उपयोग झाला, ह्या गोष्टीचा येथें स्नेहपूर्वक उल्लेख करणें अवश्य आहे.

बदलापूर
आषाढ व॥ १३
शके १८५४

**ना. गो. चापेकर**

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | समाज सुव्यवस्थित नांदतो कसा ? | १ |
| २ | मनुष्यस्वभाव | ६ |
| ३ | नियंत्रणाची आवश्यकता | २२ |
| ४ | नियंत्रणाची दिशा | ३३ |
| ५ | समाजनियंत्रणाचा उगम | ४० |
| ६ | समाजनियंत्रणाचें अधिष्ठान | ४६ |
| ७ | समाजधर्म | ५२ |
| ८ | समाजनियंत्रणाचे मार्ग | ६१ |
| ९ | समता | ७७ |
| १० | नियंत्रणाची सीमा | ८२ |
| ११ | निष्कर्ष | ९३ |

# संदर्भ-ग्रंथ

महाभारत, मनुस्मृति इत्यादि प्राचीन संस्कृत ग्रंथांतून समाजाच्या उत्पत्ति स्थिति-लयासंबंधीं पुष्कळ विचार ठिकठिकाणीं केलेला आढळतो. परंतु 'समाज शास्त्र' म्हणून हल्लींप्रमाणें स्वतंत्र शास्त्र कल्पून त्याची मांडणी आपणांकडे झालेली नाहीं. मराठी भाषेंतहि आगरकर, गोळे, राजवाडे, वैद्य, भाटे, केतकर प्रभृति विद्वानांनीं प्रसंगवशात् वेगवेगळ्या सामाजिक प्रश्नांचा ऊहापोह केला आहे; तथापि 'समाजशास्त्रा'वर स्वतंत्र पद्धतशीर ग्रंथ कोणीं लिहिलेला आढळत नाहीं. स्पेन्सर व मिल् यांच्या एतद्विषयक कांहीं ग्रंथांचीं मराठी भाषांतरे प्रसिद्ध आहेत; परंतु तीं सामान्य वाचकांस रूक्ष वाटतात. अर्थात् 'समाज नियंत्रण' ह्या शाखेवर मराठी ग्रंथ उपलब्ध नाहीं हें सांगावयास नको. अभ्यासकांस ह्या बाबतींत पुढील कांहीं ग्रंथ मार्गदर्शक होतील:—


Blackmar & Gillin–*Outlines of Sociology*

Maciver–*Community*

Ross–*Social Control*

Bernard–*Introduction to Social Psychology*

Ward–*Dynamic Sociology, Pure Sociology*

Spencer–*Study of Sociology*

Summer–*Folkways*

Tylor–*Anthropology, Primitive Culture*

Bhagawan Das–*Science of Social Organisation*


# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २६ | २१ | राहील | राही |
| ४६ | ५ | केळव | केवळ |
| ५८ | ५ | पुष्ळकांस | पुष्कळांस |
| ६३ | २३ | असतें | नसतें |
| ६४ | २६ | पाश्चत्त्यांची | पाश्चात्त्यांची |
| ८१ | १ | वतने अर्स | वर्तन असे |
| ९२ | २६ | राजीखुशीन | राजीखुशीनें |

८६१२
मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे

# समाजनियंत्रण

## प्रकरण पहिलें

### समाज सुव्यवस्थित नांदतो कसा ?

पुण्यांतील बुधवार चौकाच्या नाक्यावर क्षणभर उभें राहून आपल्या भोंवतीं न्याहाळून पाहावें म्हणजे आपणांस काय दिसेल ! चोहींकडून माणसें इकडून तिकडे जात येत आहेत. कोणी समोरून येतो, कोणी आडव्या रस्त्यानें येतो. परंतु एकमेकांची टक्कर होत नाहीं, एकाचा धक्का दुसऱ्याला लागत नाहीं, एक गाडी दुसऱ्या गाडीवर आदळत नाहीं. या प्रकारावरून जाणायेणाऱ्या व गाड्या हाकणाऱ्या लोकांत एक प्रकारची नियमबद्धता अथवा शिस्त आहे हेंच सिद्ध होतें. एकाच ठिकाणीं एकाच दिशेनें पुष्कळ लोक सुयंत्रित रीतीनें जातांना आपण पाहिले, तर त्यांना कोणी प्रतिरोध केला नाहीं यामुळेंच ते सुव्यवस्थितपणानें जात आहेत, असें म्हणतां येणार नाहीं. शिस्तीचा जर अभाव असेल तर कांहीं माणसें इतरांच्या पुढें धडपडत जात असतांना, चालणाऱ्यांत गोंधळ व अव्यवस्थितपणा उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं. अशा रीतीनें एकाचा उपसर्ग दुसऱ्याला होऊं लागला तर त्या ठिकाणीं शिस्त नाहीं असेंच समजलें पाहिजे. लोकांची गर्दी जमते अशा स्थळीं आपला उपसर्ग दुसऱ्याला होणार नाहीं अशाविषयीं प्रत्येक मनुष्य जेव्हां दक्षता बाळगतो, तेव्हां त्या गर्दीतील लोक शिस्तीनें चालणारे आहेत असें आपण म्हणतों. हीच शिस्तीची कल्पना समाज नांदतो कसा या प्रश्नाचा ऊहापोह करण्याला उपयोगी पडणारी आहे. शिस्त असलेल्या समाजांतील लोक सरळ मार्ग सोडून दुसऱ्याला उपद्रव देण्याच्या भानगडींत पडत नाहींत. परस्परांचे व्यवसाय परस्परांच्या हिताच्या

आड येण्याचा संभव असल्यास शिस्तीचें पालन करणारीं माणसें विरोध टाळण्याची कांहींतरी शक्कल लढवितात; आणि सर्वांना संमत होईल अशा प्रकारचा पायंडा पाडतात. आगगाडी स्टेशनवर येतांच लोक खालीं उतरून नळाकडे धाव मारतात. एखादा दुर्बल मनुष्य प्रथम नळाखालीं भांडें धरतो. इतक्यांत दुसरा दांडगेश्वर त्याच्यावर आपलें भांडें ठेवून आपणच प्रथम पाणी घेऊन जातो. पहिला माणूस आपल्या दौर्बल्यामुळें मुकाट्यानें आपलें खालचें भांडें काढून घेतो आणि पाठीमागून आलेल्या माणसाचें पाणी भरून झाल्यावर पुनः पाणी घ्यावयास लागतो. या ठिकाणीं या दोन माणसांत मारामारी झाली नाहीं आणि स्वास्थ्याचा भंग झाला नाहीं हें जरी खरें असलें, तरी याला शिस्त म्हणतां येणार नाहीं. प्रथम आलेल्या माणसानेंच आपलें भांडें प्रथम भरलें पाहिजे, अशा बुद्धीनें जेव्हां पाठीमागून आलेला मनुष्य पहिल्याचें पाणी घेऊन होईपर्यंत स्तब्ध राहील, त्या वेळेस मात्र हें स्वास्थ्य शिस्तीमुळें राखलें गेलें असें म्हणतां येईल.

गजबजलेल्या ठिकाणीं पराकाष्ठेची रहदारी असूनसुद्धा जेथें गोंधळ उडत नाहीं, तेथें वरच्या दर्जाची शिस्त आहे असें म्हणावें लागतें. तसेंच हें समाजयंत्र जितकें अधिक सरळ चालेल त्या मानानें समाजांतील व्यक्तींचे बरेच व्याप बंदहि पडतील. त्यांच्या शक्तीचा अपव्यय होणार नाहीं. अशा समाजांतील शिस्त पूर्णावस्थेला पोंचली आहे असें म्हणतां येईल. ज्या समाजांत सहकारी संस्था अत्यंत यशस्वी रीतीनें चालल्या आहेत तो समाज अनुकरणीय शिस्तीचें उदाहरणच होय. कित्येक संस्थांत तर त्यांतील सभासदांना कमजास्त जोखमीचीं कामें करावीं लागतात; आणि त्यांच्या कामाच्या मानानें फायद्याचें प्रमाण असतेंच असें नाहीं. अशा संस्थांमधील सभासद एकमेकांवर तुटून पडण्याचा संभव असतांहि जेव्हां त्या संस्था अबाधितपणें काम करीत असतात तेव्हां या शिस्तीची चांगलीच परीक्षा होते असेंच म्हटलें पाहिजे. असल्या प्रकारचीं उदाहरणें युद्धांत अनेकदा घडत असतात. एका पलटणीचा जीव वांचविण्याकरितां जेव्हां दुसरी पलटण

बळी देण्यांत येते व हें सर्व जेव्हां निमूटपणें सहन केलें जातें, तेव्हां तर या शिस्तीचा कडेलोट होतो. आपणांस जेथें प्रतिकार आढळून येत नाहीं तेथें सामाजिक शिस्त आहे असें अनुमान करतां येतें; कारण कांहींतरी नियमांना अनुसरून मनुष्यामनुष्यांमधील धासाधिशीच्या प्रश्नांचा निर्णय लावला जातो. कांहीं समाजांत समाजाकरितां कराव्या लागणाऱ्या कामांची विभागणी अत्यंत कसोशीनें केलेली असते व कोणताहि बिघाड न होतां समाजकार्य चालू असतें. हें उत्कृष्ट शिस्तीमुळेंच घडून येतें असें समजावें. कारण निश्चित धोरणाप्रमाणें निरनिराळ्या माणसांचे नानाविध व्यापार परस्परांना प्रतिरोधक होणार नाहींत अशा रीतीची व्यवस्था असल्याशिवाय वरीलसारखी शिस्त राहणार नाहीं.

स्वार्थ साधण्याच्या बुद्धीनें नियमांचें उल्लंघन करून शांततेचा भंग करण्यास मनुष्य प्रवृत्त होतो. परंतु अशींहि कांहीं माणसें असतता कीं, तीं कोणत्याहि कारणानें आपल्या स्वार्थासाठीं दुसऱ्याला अपाय करीत नाहींत. असा फरक होण्याचें कारण त्या दोन माणसांची निरनिराळी मनोरचना हें होय. शांतताप्रिय मनुष्य विरोध टाळीत असतो, तर भांडखोर वृत्तीचा मनुष्य कुरापत उकरून काढतो. अल्पसंतुष्ट माणसें आपल्या वासना व आपले व्यापार हीं नेहमीच्या मर्यादेपलीकडे नेत नाहींत. उलट धाडसी वृत्तीचे लोक अडथळ्यांना पायाखालीं तुडवून मर्यादा ओलांडून जाण्याचा प्रयत्न करीत असतात. असलेल्या गरजा जेमतेम भागवून घेण्याची खटपट शांत वृत्तीचीं माणसें करीत असतात. उपद्व्यापी लोक नेहमीच असंतुष्ट असतात. आपल्याजवळ असलेलें रक्षण करण्यांत ते जितकी शक्ति खर्च करतील तितकीच त्यांच्याजवळ नसलेलें पैदा करण्यांतहि ते करतील. शांत वृत्तीच्या लोकांत एकदा का शिस्तीचा अंमल बसला म्हणजे त्यांपैकीं प्रत्येकजण नियत कर्माच्या पलीकडे कोणतेंहि कर्म करीत नाहीं. हा त्यांचा स्वभावच बनतो. परंतु उच्छृंखल वृत्तीच्या लोकांत शिस्तीचा भंग होण्याची सारखी भीति असते. कारण अशा लोकांचा स्वभाव मर्यादा पाळण्याचा

नसतो. सामाजिक बंधनाच्या योगानेंच अशा समाजांत शिस्त राहिली तर राहूं शकते.

पाश्चात्त्य लोक स्वस्थ बसणारे नसून उपद्यापी आहेत. असें असतां ते एकत्र गुण्यागोविंदानें कसे नांदतात व सलोख्यानें आपलीं सर्व कृत्यें कशीं करतात हें शोधून काढणें अवश्य आहे. हिंदु लोक हे निसर्गतःच स्थिर स्वभावाचे व निरभिमानी असल्यामुळें त्यांच्यामध्यें शिस्त असणें जरी स्वाभाविक असलें, तरी ती असण्याचें कारणहि आपणांस शोधलें पाहिजे. हिंदूंपेक्षां ऑस्ट्रेलिया किंवा अमेरिका या देशांत युरोपांतले जे लोक जाऊन राहिले त्यांच्यांतील शिस्तीची मीमांसा करणें जरा अवघड आहे. मोठेपणाची आवड, सत्तेची हौस, सूड उगविण्याची उत्कटता, लौकिक, संपत्ति अथवा स्त्री संपादन करण्याकरितां सर्व जग उलथेंपालथें करण्याची बुद्धि, हीं नेहमी धडपड करीत असलेल्या कांहीं मानव वंशांतील लोकांत आढळून येतात. असा मनुष्य शिस्तीखालीं आणणें सोपें नसतें. हा शिस्तीखालीं कसा आला याचेंहि कारण शोधून काढणें अवश्य आहे.

कित्येक लोकांना समाजांतील शिस्तीच्या कारणांची चौकशी करण्याचें काम म्हणजे निरर्थक काथ्याकूट करणेंच होय असें वाटेल. पुष्कळांची तर अशी समजूत असते कीं, प्रत्येक समाजांत शिस्त ही असणारच. म्हणून आपलें जीवन जिच्यावर अवलंबून आहे अशा हवेचा ज्याप्रमाणें आपण विचार करीत नाहीं, त्याप्रमाणें हे लोक शिस्तीची मीमांसा करण्याचा विचारसुद्धा मनांत आणीत नाहींत. परंतु वस्तुतः पाहतां समाजामध्यें व्यवस्थेच्या ऐवजीं अव्यवस्था असणें स्वाभाविक आहे असें मानणें हेंच अधिक योग्य होईल. भावाभावांत भांडणें असतातच, त्याप्रमाणें एकमेकांच्या सन्निध राहणाऱ्या लोकांत सतत कटकटी होत असतील असेंच धरून आपण चाललें पाहिजे. अविकृत प्रकृतीच्या माणसांत सामान्यतः मत्सर, क्रौर्य, अथवा विषयलोलुपता यांचा अभाव असला तरी स्वार्थ साधण्याला आतुर होऊन तो जें कांहीं कर्म करतो त्याच्या आड कोणी येतां कामा नये, असें त्याला वाटणें

स्वच्छ प्रत नि. नं.

अगदीं स्वाभाविक आहे. आपण एका सुपीक पण ओसाड प्रदेशाचें उदाहरण घेऊं.अशा भूमीवर कांहीं लोक पाठवावे म्हणजे सर्वच एकट्याकरितां दामटण्याच्या अनिवार तृष्णेनें तीं सर्व माणसें कसा एकमेकांचा जीव घेतील तें आपणांस दिसून येईल. परंतु अशाच खादाखादींतून व मारामारींतून अखेरीस नियमबद्धता उत्पन्न होते हेंहि आपल्या प्रत्ययास येईल. अशा समाजाच्या इतिहासावरून आपणांस पुष्कळ शिकतां येईल. शिस्तीचा अभाव हा वैभव व संपत्ति अथवा उत्कर्ष यांना काळिमा आणणारा आहे असें हळूहळू या लोकांस वाटूं लागतें. अशा समाजांत शिस्त स्थापन करण्याच्या कामीं शस्त्राचाहि उपयोग होतो. मनुष्यांमधील शारीरिक दुर्बलता शस्त्राच्या योगानें नाहींशी होऊन अशक्त आणि सशक्त हे दोघे समबल होतात. आपल्या चौकशीला येथून प्रारंभ करून ही मानवामानवांमधील झटापट कोणत्या कारणानें मर्यादित होते हें पाहिलें पाहिजे. अशा समाजांतून अपकार करण्याची बुद्धि कशी अजीबात नाहींशी झाली, एकमेकांच्या विरुद्ध असलेल्या वैयक्तिक वासनांचा लढा लोपून त्यांऐवजीं योग्य अशी चढाओढच कशी राहिली याचाहि विचार केला पाहिजे.

समाजाचें नियंत्रण मनुष्याला कांहीं नसतें, सद्वर्तनाचें बाळकडूच त्याला मिळालेलें असतें म्हणून तो शिस्तीनें वागतो, असा साधारण समज आहे; पण तो भ्रममूलक होय. एकदा असा समज होता कीं, सद्वर्तनाचे धडे घेऊनच मनुष्य जन्मास येत असतो. परंतु निरनिराळ्या काळच्या निरनिराळ्या लोकांच्या नीतिकल्पनांत विलक्षण तफावत असल्याचें जेव्हां आढळून आलें तेव्हां नीतिशास्त्रज्ञ असें प्रतिपादन करूं लागले कीं, चांगलें कोणतें हें ज्ञान प्रत्येक माणसाला उपजतच असतें; पण हाहि भ्रमाचा भोपळा लवकरच फुटला. मनुष्य जें कांहीं कर्म करतो त्याच्या बुडाशीं विचारापेक्षां विकारच असतो हें लोकांना हळूहळू पटूं लागलें. यानंतर अहंभाव आणि परोपकार अथवा स्वार्थ आणि परमार्थ हीं मनुष्य-स्वभावाचीं दोन अंगें आहेत असा सिद्धांत पुढें येऊं लागला. कांहीं कालानें

याचें निरर्थकत्व पटल्यावर मुंग्यामाशांचीं उदाहरणें पुढें करून मनुष्यांमध्येंहि एकमेकाला साहाय्य करण्याची उपजत बुद्धि देवानें दिली आहे असें नीतितत्त्वज्ञ म्हणूं लागले. तथापि मुंग्यामाशांहून समाजाची शिस्त निराळ्या प्रकारची आहे असें मानण्यास सबळ कारणें आहेत. हें कांहीं असलें तरी ज्या कारणांच्या योगानें समाज सुखानें नांदतो त्या कारणांत मनुष्यस्वभाव हें एक कारण आहे काय हें समजून घेणें फार महत्त्वाचें आहे. सुसंस्कृत समाजांत व्यक्तींचें हित आणि समाजाचें हित, व्यक्तीच्या आकांक्षा आणि समाजाच्या आकांक्षा यांतील अंतर दोन्ही बाजूंनीं कमी कमी होत जात आहे. या कामीं व्यक्तीचा उपयोग किती झाला आहे हें पाहणें अवश्य आहे. या दृष्टीनें विचार करतां आपणांस आतां मनुष्यांतील सहृदयता, सोबतीची आवड, न्यायबुद्धि, आणि प्रतिकाराची भावना या कारणांनीं समाजांतील शिस्त कितपत राखली जाते हें समजून घेतलें पाहिजे.

---

# प्रकरण दुसरें
## मनुष्यस्वभाव
### सहानुभूति

आपण ज्याला सज्जन समजतों त्याच्यामध्यें सहृदयता अथवा सहानुभूति, संगतीची आवड अथवा समाजशीलता आणि न्याय-अन्याय पाहण्याची बुद्धि अथवा न्यायशीलता हे गुण असतात. परोपकार हा एक स्वार्थाचाच प्रकार आहे, अथवा एकाच्या सुखदुःखानें दुसऱ्याच्या अंतःकरणांत त्या सुखदुःखाची भावना उद्भूत होते, असें प्रतिपादन करणें योग्य ठरणार नाहीं. पशुपक्ष्यांकडे पाहिलें तरीसुद्धा स्वार्थाबरोबर परोपकाराचीहि छटा त्यांच्या अंतःकरणावर उमटलेली असते असें दिसून येतें. या सहानुभुतीचा उगम प्रजननकर्मांत आपणांस आढळून येतो. मांजराच्या पिलांवर जर त्यांच्या आईचें म्हणजे मांजरीचें प्रेम असणार नाहीं, तर तीं पिलें कधींहि

जगणार नाहींत हें उघड आहे. फार काय मांजरप्राणी हा जगांतून नष्ट होईल. मनुष्यजातीचीहि हीच स्थिति आहे. तान्ह्या अनाथ अर्भकाचें रक्षण व्हावें म्हणून तर मातेच्या अंतःकरणाला मायेचा पाझर सुटतो. या मायेच्या योगानेंच मनुष्यजातीचें सातत्य राहिलें आहे. ज्या कांहीं लोकांत मायेचा अंश कमी असतो त्यांची संख्या हटत हटत अखेरीस तो सर्व समाजच नष्ट होतो. स्वतःच्या सुखाचा त्याग करून मुलांचें संरक्षण करण्याची प्रवृत्ति ज्या समाजांतील आईबापांत असते त्याच समाजाची वाढ होत असते. या कारणानेंच म्हणजे अर्भकाच्या रक्षणाची जबाबदारी निसर्गतःच मातेवर पडत असल्यानें ममताळूपणा हा स्त्रियांचा स्वभाव होऊन बसला आहे. रानटी लोकांच्या तडाक्यांत सापडलेल्या प्रवाशांनीं त्या रानटी लोकांच्या बायकांनाच शरण जाऊन आपला जीव बचावल्याची उदाहरणें प्रवासवृत्तांतून आढळून येतात. कित्येक लोकांचें मत असें आहे कीं, पुरुषांइतक्या बायका उपद्यापी व कलागती लावणाऱ्या नसल्यामुळें त्यांचा समाज पुरुषांच्या अगोदर बनला. या मताला इतिहासाचा आधार मिळेल कीं नाहीं याची शंका वाटते. तथापि एवढें मात्र निर्विवाद कीं, समाज करून राहण्यास भांडखोर वृत्तीच्या माणसांपेक्षां शांत स्वभावाचीं माणसेंच उपयोगी पडतात. अशीं माणसें समाज करून एकत्र राहिलीं म्हणजे त्यांचें बल वाढतें व त्यायोगें निर्दय व दुष्ट स्वभावाचे लोक आपोआपच हळूहळू नाहींसे होतात. मनुष्याला एकदा शांततेची चटक लागली, शांतता व मारामाऱ्या यांचे परिणाम त्याच्या निदर्शनास येऊं लागले, म्हणजे खट्याळ व उपद्यापी लोकांबद्दल त्याच्या मनांत तिटकारा उत्पन्न होतो आणि असे लोक हळूहळू समाजांतून लुप्त होतात. कधीं कधीं याच्या उलटहि प्रकार होण्याचा संभव आहे; म्हणजे क्रूर वृत्तीचे लोक बहुसंख्याक असल्यास त्यांच्यामध्यें शांत वृत्तीचीं माणसें राहूं शकत नाहींत; आणि म्हणून अशा समाजांतून हीं माणसें बाहेर हाकललीं जातात. उपद्रवाची धग आपणांस कोठूनहि लागूं नये म्हणून शांतस्वभावी माणसें अविवाहित

स्थिति पतकरितात, त्यामुळें अशा लोकांचा हळूहळू ऱ्हास होतो. तात्पर्य, अत्यंत निर्दय माणसाचा जसा समाजामध्यें टिकाव लागत नाहीं तसाच अत्यंत शांतताप्रिय माणसाचाहि लागत नाहीं असें दिसतें. म्हणजे कोणत्याहि समाजांत अशा दोन टोकांकडे सर्वांशीं झुकलेलीं माणसें असूं शकणार नाहींत. अर्थात् मध्यम मनोवृत्तींच्या माणसांचाच समाज बनलेला असतो असें म्हणावें लागतें.

अगदीं जुना रानटी मनुष्य क्रूर होता असेंच इतिहास आपणांस सांगतो. आजचा क्रूर मनुष्य त्याच्या मानानें किती तरी सदय ठरेल. समाजांत राहण्यामुळेंच पूर्वमनुष्याची ही क्रूर वृत्ति नष्ट झाली असें म्हटलें पाहिजे. एकंदरींत माया अथवा प्रेम यांच्या पायावरच कुटुंबाची उभारणी होऊं शकते. पिढ्यान्‌पिढ्या कुटुंबसंबंध जे टिकतात त्याचें कारणहि या वैवाहिक, पैत्रिक मायेंत आढळून येतें. याशिवाय या सहानुभूतीच्या योगानें मनुष्य परोपकारशील होतो. मनुष्याच्या आयुष्यांत ज्या घडामोडी होतात त्यांची तीव्रता कमी करण्यास सहानुभूतीचा फार उपयोग होतो. दुर्दैवाचा फेरा दुसऱ्याच्या सहानुभूतीमुळें टळतो आणि विषमतेची उग्रता सह्य होऊं शकते. स्त्रिया, विधवा, मुलें व वृद्ध यांसारख्यांची तर आपत्ति इतरांच्या सहानुभूतीनेंच कमी होऊं शकते. ही व्यक्तींची गोष्ट सोडून समाजांतहि सहानुभूतीचें कार्य मोठ्या प्रमाणावर घडून येत असल्याचें दिसून येतें. कारखान्यांत काम करणाऱ्या बायकांच्या कामाचे तास कमी करणें, सुखा-समाधानानें त्यांस राहतां येईल इतकें वेतन त्यांस मिळवून देणें, व्याधि-ग्रस्तांचा सांभाळ करणें इत्यादि कृत्यें सहानुभूतीच्याच जोरावर होत असतात. जेथें जेथें म्हणून विषमता आढळून येईल तेथें तेथें ती नाहींशी करण्याचा उपाय समाज योजतो त्याचें कारण सहानुभूतिच होय. धनी आणि नोकर, नवरा आणि बायको, आईबाप आणि मुलें, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या परस्पर संबंधावर सार्वजनिकरीत्या नजर असावी लागते. नाहींतर एकापासून दुसऱ्यास अन्याय सहन करावा लागतो.

याप्रमाणें सहानुभूतीचें कार्य जरी मोठें असलें तरी ती समाजाच्या वाढत्या प्रपंचास अपुरी पडते यांत कांहीं शंका नाहीं. सामाजिक संघटना म्हटली म्हणजे तिच्यांतील प्रत्येक मनुष्यानें कोणाची देखरेख असो वा नसो, त्यास नेमून दिलेलें काम केलेंच पाहिजे; तसेंच दुसऱ्याच्या कामांत त्यानें अडथळा आणतां कामा नये. हें कसें साधेल याचा विचार केला, तर नुसत्या सहानुभूतीनें किंवा मायेनें वरील गोष्ट घडून येणार नाहीं अशी आपल्या मनाची खात्री होते. विषमता नाहींशी होण्यास सहानुभूति कारणीभूत होते, म्हणून सहानुभूति हाच जर आपल्या समाजघटनेचा पाया केला तर जगांतील पुष्कळ दुःख नाहींसें होईल, अशी लोक कल्पना करतात; आणि म्हणून समाज सुसंघटित करण्याच्या उद्देशानें कित्येक विचारवंत माणसें, स्त्रिया व मालमत्ता हीं कोणाच्याहि एकाच्या मालकीचीं नसून सर्व समाजाच्या मालकीचीं असावीं, असें प्रतिपादन करतात. उलट सहानुभूतीचा फायदा मिळणाऱ्यास हा दुसरा मनुष्य आपली कींव करीत आहे असें वाटतें. संकटांत सापडलेल्या मनुष्यास सहानुभूति म्हणजे वैषम्य उत्पन्न करणाराच गुण असें वाटण्याचा संभव आहे. असें झाल्यास सहानु-भूति दाखविली जाणाऱ्या माणसांत जी मनोवृत्ति उत्पन्न होते ती इष्टच असते असें म्हणतां येणार नाहीं. मोठ्या संस्थांत किंवा संघटनेंत मित्रत्वानें केलेल्या साह्याचा उपयोग होत नसतो. तेथें विश्वासाच्या वागणुकीचीच आवश्यकता असते. एखाद्या बायकोचा नवरा तिला मारीत असला तर सहानुभूति असणारा मनुष्य मध्यें पडून तिचा मार चुकवील हें खरें; पण त्यामुळें तो लांच खाणार नाहीं अथवा खोटें बोलणार नाहीं असें अनुमान करतां येणार नाहीं. गाडीखालीं मूल सांपडत असल्यास एखादा एंजिनियर धावत जाऊन त्याला काळाच्या जबड्यांतून ओढून काढील; परंतु तेवढ्यामुळें कराराप्रमाणें काम न करणाऱ्या ठेकेदाराला तो शासन करीलच असा नेम नाहीं. भिक्षेकऱ्याला एखाद्यानें भिक्षा घातली म्हणून तो खोटी साक्ष देणार नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. बुडणाऱ्या माणसाला

एखाद्यानें हात दिला म्हणून तेवढ्यानें कर बसविणाऱ्या अधिकाऱ्याला तो आपलें वास्तविक उत्पन्न सांगेल असें नाहीं. यावरून सहानुभूतीची उपयुक्तता व अनुपयुक्तता कशी आहे हें आपणांस दिसून येतें. शिवाय असें कीं, आपले आप्तेष्ट जे असतील अथवा ज्यांना आपण ओळखतों, अशांचेंच फार तर सहानुभूतीच्या योगानें आपण कार्य करूं शकूं. परंतु ज्यांच्याशीं आपला संबंध नाहीं त्यांच्यासंबंधीं सहानुभूति निरुपयोगीच ठरते. आपल्या कृत्यानें एखाद्या विशिष्ट व्यक्तीचें नुकसान होत आहे अशा प्रसंगीं कदाचित् आपण माघार घेऊं; परंतु सर्व लोकांकरितां अशी आपण माघार घेऊंच असा नियम नाहीं. सारांश, नुसत्या मनोविकारावर विसंबून मोठमोठीं राष्ट्रकार्यें होणें अवघड वाटतें. दयार्द्र अंतःकरणाचा मनुष्य चहाडया सांगून किंवा खोटी बातमी पसरवून देशाचें अनन्वित नुकसान करण्यास तयार होतो असा अनुभव आहे. ढेकूण मारावयाला ज्याचें मन कचरतें असा स्थानिकस्वराज्यसंस्थेचा सभासद दोष उत्पन्न होऊन पिण्याला अयोग्य झालेलें पाणी लोकांस बिनदिक्कत देत असतो. उदार स्वभावाचा अधिकारी स्वार्थ साधण्याकरितां लग्नसंस्था, मालमत्ता, भाषणस्वातंत्र्य यांच्यावर गदा आणतो, असा अनुभव अनेकवेळां आलेला आहे. म्हणून असें दिसतें कीं, संरक्षणाचीं आवश्यकता जेथें अधिक भासते तेथें सहानुभूति अपुरी पडते. कारण प्रगतीच्या पायरीला लागलेल्या समाजांत व्यक्तीचें महत्त्व नसून ठरीव तत्त्वानुसार सर्वांचे आचार नियमित झालेले असतात. बायकोवर प्रेम करणें, मुलांवर माया करणें आणि शेजाऱ्याला आपल्यापासून उपद्रव न पोंचूं देणें याच्यापेक्षां मनुष्याचें कर्तव्यक्षेत्र सध्या विस्तृत झालें आहे. आपण मनुष्यावर ज्याप्रमाणें प्रेम करतों त्याप्रमाणें संस्थांबद्दल आपल्यामध्यें पूज्यबुद्धि असावी लागते. अशा वाढत्या समाजाचें काम केवळ सहानुभूतीनें भागणार नाहीं; आणखी दुसऱ्या कशाची तरी आवश्यकता आहे हें खास.

स्थळ प्रत
सं. ली नं.
ता.
ठाणें
नोंद नं.
ठाणें

## समाजशीलता

दुसऱ्या कोणाच्या तरी सहवासांत राहावें अशी मनुष्याची स्वाभाविक वासना असते. त्याला एकटें राहणें मनापासून आवडत नाहीं. असंस्कृत माणसाला तर एकलकोंडेपणाचा कंटाळाच येतो. बायको तरी निदान आपल्याला सहचरी असावी असें त्याला वाटत असतें तें यामुळेंच. सुबुद्ध समाजांत आपल्याला अविवाहित स्थितींत राहणारे तरुण आढळून येतात; परंतु अप्रबुद्ध अशा रानटी समाजांत अविवाहित स्थितींत कालक्रमण करणारा क्वचित्च आढळतो. मंडळींत बसून हसावें, खेळावें, मजा मारावी, अशी त्याची इच्छा असते. आतां हे गुण ज्या माणसांत आहेत तो मनुष्य सद्वर्तनी असतोच अशीमात्र खात्री देतां येत नाहीं. तथापि अशा प्रकारची वृत्ति स्नेहसंबंध जडविते. मंडळींत ऊठबस होत असल्यामुळें प्रसंगोपात्त एकमेकाला उपयोगी पडण्याची बुद्धीहि आपोआपच होते. या कारणास्तव अशा लोकांच्या समाजांत शिस्त राहूं शकते. जनावरांनाहि कळप करून राहण्याची सवय आहे, एवढेंच नव्हे तर जनावरांइतकी संगतीची आवड रानटी लोकांत असतेच असें म्हणवत नाहीं. रानटी मनुष्य क्रूर असतो असा सामान्यतः समज आहे आणि तो खरा आहे. पण हें त्याचें क्रौर्य फक्त युद्धकर्मातच प्रकट होतें. एरवीं तो चांगलाच माणसाळलेला आहे. तो घर करून राहतो, कुटुंब बनवितो व शेजारधर्म पाळण्याला कमी करीत नाहीं. अशा समाजांतून वाईट मनुष्य खड्यासारखा बाहेर टाकला जातो. त्याचा या समाजांत निभाव लागत नाहीं. सुधारलेल्या समाजांत मात्र उलट प्रकार झालेला अनुभवास येतो. कायद्याच्या नांवाखालीं सुष्ट आणि दुष्ट या दोघांचेंहि रक्षण समाज करतो.

माणसांचे अनेक संघ बनलेले आपल्याला दिसतात, पण ते स्नेहभावानें अथवा संगतिप्रियतेनें बनलेले असतात असें मात्र नव्हे. सर्वांत प्रचंड संघ म्हणजे राष्ट्र होय. परंतु राज्यें व अधिराज्यें आजपर्यंत तरी निदान एका बाजूला पाशवी शक्ति व दुसऱ्या बाजूस भीति या योगानेंच बनलेलीं आहेत.

मुलुखगिरी करावयाची असली म्हणजे लोक संघटित होतात, त्याचप्रमाणें सर्वांवर सारखेंच कोसळणारें संकट टाळण्याकरितांहि त्यांना एकवटावें लागतें. मुलुखगिरी करून राज्यें स्थापन करणाऱ्या मदामुळें एकलकोंडेपणा उत्पन्न होतो; आणि म्हणून जेत्यांचा आणि जितांचा एक संघ कधींहि बनत नाहीं. हिंदुस्थानांतील इंग्रज राज्यकर्त्यांत तुसडेपणा दिसून येतो याचें कारण हेंच होय.

पूर्वकालीन समाजस्थैर्याला प्रत्येकानें शेजारधर्मास अनुसरून आचरण केलें तर तितकें पुरें होत असे. सध्याचा समाज अशा स्थितीला येऊन पोंचला आहे कीं, आतां प्रकृतिधर्म मागें पडून विचारशक्तीची गरज अधिक भासते. समाजाचीं स्थित्यंतरें होण्यास नैतिक कारणांपेक्षां आर्थिक कारणेंच अधिक प्रभावी होतात. म्हणून असा निष्कर्ष निघतो कीं, संघ करून राहण्याची स्वाभाविक प्रवृत्ति मनुष्यांत असली तरीसुद्धा त्या समाजाची प्रगति होणार नाहीं. संघशक्तीचें महत्त्व ज्या समाजांतील लोकांना पटतें आणि उत्तम प्रकारची समाजघटना करण्याची अक्कल ज्यांच्यांत आहे त्याच समाजाचें पाऊल पुढें पडतें. म्हणून रानटी लोकांचे संघ स्वाभाविकरीत्या बनत, तर हल्लींच्या सुधारलेल्या लोकांचे संघ कृत्रिम रीतीनें बनत असतात. प्राचीन समाजांत संघांतील लोक थोडेच असल्यामुळें ते वैयक्तिक स्नेहानें एकमेकांशीं बद्ध झालेले असतात. रानटी लोकांचा संबंध बाहेरच्या लोकांशीं आला तर तो नाचासारख्या प्रसंगानें येतो. अशा रीतीनें दोन संघांतील लोकांचा घरोबा जडल्यास तो सहकारी तत्त्वानुरोधानें जडतो. हा दुसऱ्या प्रकारचा संबंध पहिल्या प्रकारच्या संबंधाहून अधिक व्यापक असतो. सुधारणेची बरीच मजल मारलेल्या समाजांत ज्यांचें प्रत्यक्ष कधीं मुखावलोकन झालेलें नाहीं अशाच लोकांशीं निकट संबंध जडण्याचे प्रसंग अधिक येतात. गांधींच्या अनुयायांत गांधींचें तोंडहि ज्यांनीं कधीं पाहिलें नाहीं असे किती तरी लोक असतील. परंतु घरच्या माणसांवरसुद्धा नसेल इतकें प्रेम व इतकी निष्ठा या अनुयायांची

गांधींवर आहे. यावरून असें उघड होतें कीं, समविचारांचाच संघ बनणें हें सुधारणेचें द्योतक होय. मोठमोठ्या शहरांकडे आपण पाहिलें तर आपणांस असें सहज दिसून येण्यासारखें आहे कीं, त्यांतील लोक स्नेहबद्ध होऊन एकत्र राहिलेले नाहींत. शहरांतील लोकांचा समाज गुण्यागोविंदानें नांदत असतो याचें मुख्य कारण म्हणजे एकमेकांचे हितसंबंध एकमेकांत गुंतलेले असतात. हे संबंध कोणी तोडूं म्हणेल तर त्याला उपाशीच राहावें लागेल. पैसे मिळविणें ही ज्यांची महत्त्वाकांक्षा आहे अशा स्वार्थी माणसांकडून शहरें वसविलीं जातात. शहरांत कोणी कोणाची फिकीर करीत नाहीं. प्रत्येकजण स्वतःकरितां धडपडत असतो. त्यांतल्यात्यांत स्नेहशीलता हा मनुष्यांचा धर्म असल्यामुळें लहान लहान बनलेले अनेक संघ शहरांत दृष्टीस पडतात. तेव्हां शहरांतील माणसांत असलेली शिस्त सोबतीच्या आवडीमुळें लागत नसून नुकसानीच्या भीतीनें लागत असते. तें कांहींहि असो, अद्यापि तरी स्वार्थ व परमार्थ यांचें तादात्म्य मानणारे लोक फार थोडे आहेत. उलट असा कांहीं चमत्कार दिसून येतो कीं, शहरांतील लोक समाजाला कंटाळून मनाला रमविण्याकरितां वनाचा आश्रय करितात. विचार करणाऱ्या माणसाला समाजाचा संपर्क नडतो हें कांहीं खोटें नाहीं. हा प्रकार रानटी माणसाच्या अगदीं विरुद्ध दिसतो. यावरून सोबतीची आवड अथवा समाजशीलता वर्तमानकालीन समाजाच्या शिस्तीला पुरी पडत नाहीं हेंच सिद्ध होतें.

## न्यायशीलता

लहान मुलाच्या वागणुकीकडे सूक्ष्म रीतीनें पाहिल्यास न्यायबुद्धीचा उगम कसा व कोठें होतो हें ध्यानांत येईल. लहान मुलास स्वतःचाच अनुभव असल्यामुळें आपल्यावरूनच तो दुसऱ्याची स्थिति समजून घेतो. दुसऱ्याची स्थिति समजण्यास त्याला अन्य मार्गच नाहीं. आपल्यावरून तो जगाची परीक्षा करीत असतो. आपल्याला भूक लागते तशीच आईला लागत

असेल, अशा विचारानें 'आई तूं कां जेवली नाहींस !' असा तो तिला प्रश्न करितो. थोडें आणखी जास्त समजूं लागलें म्हणजे दुसऱ्याचे हितसंबंध व त्याचे हितसंबंध यांची भेसळ होते. अशा वेळीं दुसऱ्याच्या हितसंबंधाला तो स्वतःइतकेंच महत्त्व देतो. मला जसें वाटतें तसेंच दुसऱ्याला वाटत असावें, हें त्याच्या बालबुद्धीला पटत असतें. मी व तूं अथवा तो यांमध्यें तो फरक करीत नाहीं. सर्व जग आपल्यासारख्या माणसांनींच भरलें आहे अशी ज्या माणसाची समजूत होते, तो दुसऱ्याच्या हिताचा विचार आपल्या दृष्टीनें करतो. अशा विचारांत आपपरभाव नसतो. मी व तो यांत भेद करण्यास सुरुवात झाली म्हणजे अन्यायबुद्धि डोकें वर करते. लहान मुलगा आपल्या अल्पवयस्क बहिणीला जेव्हां फसवितो तेव्हां ती लहान आहे, मी मोटा आहें; ती मुलगी आहे, मी मुलगा आहें; असा भेद करून तो आपल्या फसवेगिरीचें समर्थन करतो. हीच गोष्ट मोठ्या माणसांचीहि आहे. गुलामासंबंधीं धन्याचें वर्तन अशाच कारणामुळें अन्यायाचें होत असतें. गुलाम हा माझ्यापेक्षां निराळा आहे, म्हणजे माझ्याहून कमी दर्जाचा आहे; म्हणून त्याला चांगले पदार्थ खावयास न मिळाले अथवा भरपूर वस्त्र पांघरावयास नसलें तरी तें योग्यच आहे, असें या भेदबुद्धीमुळें धन्यास वाटूं लागतें. जेते जितांना आपल्याहून कमी योग्यतेचे समजतात, त्यामुळें त्यांच्याशीं वागतांना नीतिनियम पाळले नाहींत तरी त्यांत कांहीं पाप नाहीं असें त्यांस वाटत असतें. इंग्रज लोक आपापसांत वागतांना जितकें नैतिक आचरण ठेवीत असतात तितकें हिंदी लोकांशीं वागतांना ठेवलेंच पाहिजे असें त्यांचें नीतिशास्त्र त्यांस सांगत नाहीं. याचें कारण हिंदी लोक आपल्याहून हीन दर्जाचे, हीन संस्कृतीचे आहेत असें त्यांना मनांतून वाटत असतें. समबलांचा सामना होतो तेथेंच नीतिनियम पाळण्याची खबरदारी घेण्यांत येते, असें यावरून निदर्शनास येण्यासारखें आहे. तात्पर्य, भाषा, जात, वर्ण, धंदा, गरिबी इत्यादि बाह्योपाधींकडे दुर्लक्ष करून मनुष्यत्वाच्या समत्व-भावनेनें जो वागतो तोच न्यायाचें वातावरण उत्पन्न करतो.

याशिवाय जगांत असे कांहीं लोक असतात कीं, मीच काय तो एकटा या जगाचा मध्यबिंदु आहें म्हणून माझ्या भोंवतींच सर्व जग फिरलें पाहिजे, असें त्यांस वाटत असतें. माझ्याकरितांच परमेश्वरानें सर्व पदार्थ निर्माण केले आहेत, त्यांचा उपभोग मलाच एकट्याला घेतां आला पाहिजे, अशा भावनेनें प्रेरित होऊन ते लोकांशीं वागत असतात. अशा वागणुकींत अन्याय रुतलेला असल्यास त्यांत विशेष आश्चर्य नाहीं. मनुष्यामध्यें स्वभावतःच आढळून येणाऱ्या दया, माया, स्नेह इत्यादि मनोविकारांच्या योगानें अशा माणसांकडून सद्वर्तन होईल तेवढेंच; एरवीं जेथें या सहज प्रवृत्तींची मजल पोंचत नाहीं, तेथें त्यांच्याकडून इतरांच्या संबंधानें अन्यायाचें वर्तनच घडत असतें.

सहानुभूति आणि न्यायबुद्धि हीं एक नव्हत. त्यांच्यामध्यें मूलतःच भेद दिसतो. सहानुभूति ही मनुष्यांत त्याच्या जन्माबरोबरच उद्‌भूत झालेली असते. परंतु न्यायबुद्धि हें विचाराचें कार्य आहे. सहज प्रवृत्तीला दाबून न्यायबुद्धीला तिची जागा पटकावावी लागते. न्यायबुद्धीची वाढ व पोषण हीं समाजशासनांनीं करावीं लागतात. उपजतच जो धर्म मनुष्यांत व्यक्त होतो त्याच्या वाढीकरितां कृत्रिम उपायांचें कारण पडत नाहीं. समाजाचे कायदे असे असावे लागतात कीं, त्यांच्या योगानें न्यायबुद्धि जागृत राहील. परंतु जर याच्या उलट प्रकार असला, म्हणजे समाजाचे उक्तानुक्त नियम जर सदोष असतील तर मनुष्यांची न्यायबुद्धि बोथट होईल. प्रसंगीं ती लुप्तहि होण्याचा संभव आहे. मनुष्याच्या न्यायबुद्धीचें ढळढळीत उदाहरण युद्धक्रियेंत दिसून येतें. युद्धांतील दोन्ही पक्ष युद्धाचे नियम पाळीत असतात याचें कारण न्यायबुद्धीशिवाय दुसरें काय असूं शकणार ! द्वंद्वयुद्धांत परस्परांचा जीव घेऊं पाहणारे पुरुषहि द्वंद्वयुद्धाचे नियम आनंदानें पाळतात. हें सहानुभूतीचें कार्य आहे असें कोणाला ध्वनितहि करतां येणार नाहीं. दुसरा मनुष्य पेंचांत सांपडला असतां त्याचा फायदा घेऊन स्वार्थ साधूं नये असें त्यास वाटतें असें नव्हे; तर आपणहि संकटांत सांपडलों असतां दुसऱ्यानें

त्याचा फायदा घेऊं नये असें त्यास वाटत असतें; आणि त्याच भावनेनें त्यांच्याकडून न्यायाची वागणूक होते. निःशस्त्र माणसाला शस्त्र घेऊन मारणें हें असल्याच कारणानें अन्यायाचें ठरतें. दरोडा घालावा, पण चोरी करूं नये; दुसऱ्यास फसवावें, पण विश्वासघात करूं नये; मारावयाचें असेल तर भर दिवसां मारावें, झोपेंत मारूं नये, असें वाटणें हें न्यायबुद्धीचेंच फल होय. आपण दिलेलें वचन पाळलें पाहिजे, उसने घेतलेले पैसे परत दिले पाहिजेत, असें मनुष्याला वाटतें त्याचा उद्गम त्याच्या न्यायबुद्धींतच असतो. यामधूनच कर्तव्याच्या कल्पनेची उत्पत्ति झाली आहे. युद्ध करणाऱ्यांमध्यें नीतिबंधनें कशीं पाळलीं जातात याचें आतां आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. खेळ, व्यापारधंदा, राजकारण यांत नेहमी समानाबरोबरच व्यवहार होत असतात. म्हणून यांतील दोन्ही बाजूंच्या लोकांत औदार्य, न्यायप्रियता, प्रामाणिकपणा इत्यादि वरिष्ठ प्रकारचे गुण आढळून येतात. पण जेते एकदा राज्य करूं लागले म्हणजे त्या राजकर्त्यांत वरील गुणांचा लोप होतो; कारण मागें सांगितल्याप्रमाणें जितांना ते आपल्याहून कमी लेखतात. इकडे राज्यकर्त्यांकडून अशा रीतीनें अन्याय्य वर्तन होतें, तर परसत्तेखालीं प्रजा नेभळी व निःसत्त्व बनल्यामुळें तिच्याकडून कुटिल नीतीचा अवलंब करण्यांत येतो. शूर मनुष्य सरळ असतो, पण दुर्बळ मनुष्य अप्रामाणिकपणाच्या युक्त्यांवर आपलें संरक्षण करीत असतो. अशा रीतीनें जित व जेते अथवा राज्यकर्ते व प्रजा या दोघांचाहि अधःपात होतो.

न्यायबुद्धि आणि ममताळूपणा यांमध्यें किती अंतर आहे हें निरनिराळ्या समाजांच्या वागणुकीवरून दिसून येतें. कोणत्याहि गोष्टीसंबंधानें बरेचसे युरोपियन लोक हें बरोबर आहे काय असा प्रश्न करतील. उलट चीन देशांतील लोक हें दयाळूपणाचें आहे काय असें विचारतील. इंग्रज लोक आपल्या हक्कांविषयीं आग्रह धरितात आणि त्या हक्कांवर कोणी गदा आणिल्यास तो गुन्हा समजतात. चिनी लोक सर्व परिस्थितीचा विचार करून

मनुष्यानें अशा वेळीं काय केलें असतें याचा विचार करितात. एखाद्या श्रीमंत मनुष्याकडे पोटाकरितां गरिबानें लहानशी चोरी केली तर त्याबद्दल ते त्याला फारसा दोष लावणार नाहींत; पण गरिबाला लुबाडणें हा ते अधिक भयंकर अपराध समजतात. अशा प्रकारची मनोवृत्ति बनण्यास भौगोलिक कारणें असतात; परंतु त्यांचा येथें फारसा विचार कर्तव्य नाहीं. थंडीच्या देशांत मनुष्य घरांत कोंडून घेतो, उष्ण प्रदेशांत घराच्या बाहेर असतो. यामुळें दोन्ही समाजांच्या लोकांचे निरनिराळ्या दिशेनें स्वभाव बनणें स्वाभाविक आहे. येथें आपल्याला जें ठरवावयाचें आहे तें हें कीं, न्यायबुद्धीनें वागण्याची प्रवृत्ति ही समाजाच्या शिस्तीला कितपत कारणीभूत होते. वर वर्णन केलेल्या न्यायबुद्धीच्या योगानें इतर लोक कसे वागतात, त्यांच्या वागणुकीचे नियम कोणते याची चौकशी करून तदनुसार तो वागेल. म्हणजे समाजाला लागलेली शिस्त तो मोडणार नाहीं; परंतु शिस्त नसलेल्या समाजाला शिस्त लावण्याचें काम अशा माणसाकडून होईल असें मानावयास कारण दिसत नाहीं. शिवाय समाजाकरितां व्यक्तीचा बळी दिला पाहिजे, ही गोष्ट त्याच्या न्यायबुद्धीच्या क्षेत्रांत येण्यासारखीहि नाहीं. ‘ घर आणि चोप ’ अशा प्रवृत्तीच्या समाजाला असल्या माणसाचा पाठिंबा मिळेल व शांततेचाहि तो पुरस्कार करील. चार लोकांची रीत सोडून वागलें नाहीं म्हणजे अशा माणसाची न्यायदेवता संतुष्ट होते. तात्पर्य, केवळ न्यायशीलतेनें समाज सुव्यवस्थित होईलच असा नेम नाहीं.

## प्रत्याघात

रहदारीच्या रस्त्यावर पोलीस शिपाई उभा नसतांना एखादा गाडीवान दुसऱ्याच्या गाडीला मोडतोड होईल या भीतीनें अथवा आपल्या स्वतःच्याच गाडीचें नुकसान होईल या भयानें धकाधकी करण्यापासून परावृत्त होईल. त्याचप्रमाणें दया, माणुसकी अथवा न्यायबुद्धि यांचा आगाळिक करण्या-

पासून मनुष्याला परावृत्त करण्याच्या कामीं जेथें उपयोग होत नाहीं अशा ठिकाणीं तो मनुष्य केवळ प्रत्याघाताच्या भीतीनें माघार घेण्याचा संभव आहे.* तात्पर्य, समाज सुव्यवस्थित चालण्यास सहानुभूति, समाजशीलता, न्यायशीलता आणि प्रत्याघाताचें भय हीं कारणीभूत होतात. यांपैकीं पहिले तीन गुण हे कर्त्यांच्या ठिकाणीं असतात. उलटपक्षीं, चौथें कारण आपल्या कर्मांचा परिणाम ज्याच्यावर घडतो अशा माणसाच्या ठिकाणीं असलेला मनःसंताप हें होय. ही प्रत्याघाताची बुद्धि आत्मरक्षणार्थ उत्पन्न झालेली आहे. आपण जगावें ही जी मनुष्याला उत्कट वासना असते तिच्यामुळ आपल्या अंगावर कोणी चालून आल्यास अथवा आपल्याला कोणीं इजा केल्यास आपणाला उलट क्रिया करण्याची इच्छा होते. विचाराअंतीं, प्रत्याघाताच्या क्रियेचें पर्यवसान समता स्थापन करण्यांतच होतें असें एका दृष्टीनें म्हणतां येईल. माझा दांत ज्यानें पाडला त्याचा मी दांत पाडीन, माझा डोळा ज्यानें फोडला त्याचा मी डोळा फोडीन असें वाटणें म्हणजे सूड उगविण्याचा जो मूळ स्वभाव त्यावर विचाराचा मुलामा देणें होय. आपल्याला इजा करून दुसऱ्यानें जो कमीपणा आणिला, म्हणजे विषमताच निर्माण केली, ती नाहींशीं करून पुनः दोघांनीं समबलच राहावें याकरितां जितकें माझें नुकसान झालें तितकें मी त्याचें करीन असें म्हणून मनुष्य प्रतिक्रिया करतो; आणि तसें करण्यानें अपकृत माणसाचें समाधान होतें. क्षुद्र स्वरूपांत राग हा सहजधर्म होय. परंतु उच्च स्वरूपांत अन्याय सहन न करण्याचा अभिमान असेंहि त्याला म्हणतां येईल. अन्यायाचें कृत्य करण्यापासून मनुष्य जितका परावृत्त होईल, त्या मानानें अन्याय सहन न

---

* दक्षस्मृतींत म्हटल्याप्रमाणें आपण दुसऱ्याला जें सुखदुःख दिलें असेल तें सर्व त्याच्याकडून फेडीच्या रूपानें आपणांकडे येऊन आपणांस भोगावें लागतें:— "सुखं वा यदि वा दुःखं यत्किंचित् क्रियते परे। तत्कृतं तु पुनः पश्चात् सर्वमात्मनि तद्भवेत् ॥"

करण्याचा त्याला त्वेष येईल. मनुष्यामध्यें न्यायबुद्धि असली म्हणजे दुसऱ्यांच्या हक्कांबद्दल त्याच्या ठिकाणीं पूज्यबुद्धि उत्पन्न होते आणि तो आपण होऊन कोणाची कुरापत काढीत नाहीं. दुसऱ्या बाजूनें पाहिलें तर आपले हक्क प्रस्थापित करण्याच्या तत्परतेमुळें तो आगळिक होऊं देत नाहीं. एवढ्याचसाठीं राग हा सहजधर्म असला तरी तो एक गुण आहे व त्याची उपयुक्ततादि आहेच आहे. समान हक्क स्थापून सर्व मनुष्यांना समबल करण्यांत त्याचा उपयोग होतो. प्रत्याघात करण्याची बुद्धि जर मनुष्यांत नसेल आणि आपल्याला होणाऱ्या उपद्रवासंबंधानें मनुष्य जर नुसत्या नफ्यातोट्याचा विचार करूं लागेल तर बलिष्ठापुढें मान लववून आपल्या दुर्बलतेला अनुरूप असें स्थान तो मुकाट्यानें पत्करील. अशा रीतीनें असमबल मनुष्यांत कधींहि समता उत्पन्न होणार नाहीं. निःशक्त मनुष्य आपला दुबळेपणा सुडाच्या जोरावर भरून काढतो.

आपण होऊन आगळिक करणाऱ्या माणसांत स्वार्थ साधण्याच्या वासनेनें एकप्रकारची धिटाई आलेली असते. कारण स्वार्थ साधावयाचा नसल्यास कोणीहि मनुष्य दुसऱ्याच्या वाटेला विनाकारण जाणारच नाहीं. परंतु याच्या स्वार्थाला बळी पडला जाणारा जो मनुष्य त्याच्यांत मनःसंतापामुळें धैर्य आलेलें असतें. या दोघांची क्रिया मनोविकारांनींच जर प्रेरित झाली तर दोघांमध्येंहि तितकेंच धैर्य असल्याचें अनुभवास येईल. अपकार केलेल्या माणसाच्या मनाला तो अपकार विषासारखा भासत असतो. म्हणून तो दुर्बल असतांहि मोठ्या आडदांडालासुद्धा भारी होतो. या सुडाला भिऊनच पुष्कळ माणसें दुसऱ्याच्या वाटेस जात नाहींत. सुडाची भावना जबरदस्त असल्यामुळें आपण होऊन आगळिक करणाऱ्यांना चांगलीच दहशत बसते. या कारणास्तव समाजांत सुव्यवस्था निर्माण करण्यास तिचा फार उपयोग होतो. यामुळें विषम स्थितींतील माणसांतहि समता उत्पन्न होते.

एखाद्या नवीन बिनवस्तीच्या ठिकाणीं कांहीं लोक सोडले व त्यांच्यावर

कोणताहि प्रतिबंध ठेविला नाहीं तर अशी स्थिति होईल कीं, आडदांड व उर्मट अशा लोकांची एकमेकांशीं घासाघीस होऊन त्यांच्या चकमकी उडतील आणि दोघेहि अखेरीस नाश पावतील. तसेंच जे निःसत्त्व असतील ते मरतील, पळून जातील, किंवा बलिष्ठांच्या ताटाखालचीं मांजरें होऊन बसतील. म्हणूनच त्या दोन्ही प्रकारच्या लोकांचा सामाजिक शिस्तीच्या कामीं उपयोग होत नाहीं. अशा प्रकारचीं माणसें पाहिजेत कीं त्यांच्यांत आपल्याला कोणी उपद्रव केला असतां त्याचा प्रतिकार करण्याची धमक व निश्चय असून दुसऱ्याला फसविण्याची बुद्धि असूं नये. अशीं माणसें असतील तरच समाज टिकूं शकेल.

आतां अपकार केलेला मनुष्यच सूड उगवतो असें नाहीं. त्याच्याशिवाय त्याच्या कुटुंबांतलीं आणि जातीचीं माणसें अपकारकर्त्याला शासन करण्यास उद्युक्त होतात. अशा वेळीं या सुडाचें स्वरूप फारच अघोर असतें. या धास्तीमुळेंहि कित्येक लोक दुसऱ्याची आगळिक करण्याच्या भरीस पडत नाहींत. एखाद्या माणसाचा कोणी खून केला तर त्याचा सूड उगविण्यास मयताचीं माणसें पुढें येत नाहींत असें क्वचित् घडतें. ही सुडाची प्रवृत्ति फारच बोकाळली असती; पण वृद्ध माणसें मध्यें पडून जास्त हत्या न होऊं देण्याचा प्रयत्न करितात. माणसाला माणूस घेण्याच्या ऐवजीं ते दुसरी कांहीं तडजोड काढतात; मृत्यूमुळें झालेलें नुकसान देववितात किंवा अशाच प्रकारचा दुसरा कांहीं उपाय अमलांत आणितात. अशा रीतीनें हळूहळू व नकळत सुडाचें स्वरूप जें वैयक्तिक असतें तें सामाजिक बनतें. उसनें न फेडतां दिलेलें दुःख निमूटपणें सोसण्यांत फारच कमीपणा येतो. सर्व लोक त्याची छीः थूः करितात. निष्कारण ज्याला कोणी त्रास दिला असेल अशा माणसांचा संताप किंवा त्वेष याला एकप्रकारचें पावित्र्य उत्पन्न होतें; आणि म्हणून त्याच्या आड कोणी येऊं नये अशी रानटी लोकांची समजूत असते. जशास तसें हें त्यांचें शास्त्र असतें. कायद्यांच्या अभावीं अपकारकर्त्यास शासन करण्याची जबाबदारी अपकार झालेल्या

माणसावरच्च असते. या स्वाभाविक प्रवृत्तींचा लोप आजपर्यंत कायदा करूनच करावा लागला आहे.

'माझी खोड तूं काढूं नको, तुझी मी काढणार नाहीं' असली वृत्ति जेथें समाजांतील व्यक्तींचे परस्पर संबंध सरळ असतात तेथें कामीं येतें. परंतु हे संबंध जेथें गुंतागुंतीचे आणि सूक्ष्म असतात तेथें या वृत्तीनें काम भागणारें नसतें. सुधारलेल्या समाजांत परस्परांचे हितसंबंध इतके बारकाव्याचे असतात कीं, दोघांमध्यें वाद उत्पन्न झाला असतां चटकन निर्णय करणें कठीण पडतें आणि प्रत्येक मनुष्य माझेंच बरोबर आहे अशा दृढ भावनेनें मरण्यास तयार होतो.अशा ठिकाणीं सुडाची कल्पना असत नाहीं. तेव्हां अशा प्रकारचा वाद उपस्थित झाला असतां त्याचा निर्णय करण्यास तिऱ्हाईतच लागतो. म्हणून औद्योगिक समाजांत अशाकरितां कांहींतरी तजवीज करून ठेवणें भाग पडतें. प्रगमनशील नसणाऱ्या अशा स्थिर समाजांत वहिवाटीप्रमाणेंच निकाल करण्यांत येतो; व तेवढ्यानें त्या समाजाचें काम भागतें. पेशवाईत वहिवाटीवांचून दुसरें निर्णयाचें शास्त्र कोणाला माहीतच नव्हतें. परंतु ज्या समाजांत एकसारखा फेरबदल होत आहे, कालची गोष्ट आज टिकत नाहीं आणि आजची उद्याला राहत नाहीं, अशा समाजांत नुसत्या वहिवाटीवर विसंबून पुरें पडत नाहीं. बाहेरचीच कांहीं तरी सत्ता असले वाद मिटविण्यास अवश्य आहे. या सत्तेच्या अभावीं समाजाच्या चिंध्याच उडतील. लोकांनीं कसें वागावें याची एकदा पद्धत घालून दिली म्हणजे सुडाचें कारणच राहत नाहीं. ज्या कृत्याबद्दल समाजानें दावा साधला पाहिजे त्याबद्दल व्यक्तीला सूड उगवूं देणें हितावह नाहीं. कारण ठोशास ठोसा लगावून दिला असतां समाजांत एकसारखी भांडणें, मारामाऱ्या व बेशिस्त यांचें साम्राज्य होईल. समाज हा अमूर्त असल्यामुळें त्यानें केलेल्या कृत्याबद्दल सुडाची बुद्धिच उत्पन्न होत नाहीं. म्हणून सुधारलेल्या समाजाचें पहिलें कर्तव्य केलेल्या अपराधाचें शासन परस्पर व्यक्तीला करूं न देणें हें होय. वैयक्तिक सूड कायद्याच्या योगानें बंद पडतो इतकेंच नव्हे, तर

आत्मसंरक्षणाचें क्षेत्रहि कायद्यानें आकुंचित करण्यांत येतें. समाजांतील व्यक्तीला निष्कारण त्रास दिला असतां तो समाजालाच दिला आहे असें समाज समजतो. समाजाचें प्रतिनिधित्व राजाकडे असतें. तेव्हां हा मलाच त्रास दिलेला आहे अशा भावनेनें त्रास देणाऱ्याला शिक्षा करणें ती राजाकडून केली जाते. सर्व प्रकारच्या आगळिकीमुळें सार्वजनिक शांततेचा भंग होतो असें समाज मानतो; आणि म्हणून व्यक्तीच्या हातून काढून घेतलेला शासन करण्याचा अधिकार न्यायाधिशावर सोंपविला जातो.

---

# प्रकरण तिसरें

## नियंत्रणाची आवश्यकता

अनुकूल परिस्थितींत सहानुभूति, समाजशीलता आणि न्यायशीलता, तशीच प्रतिकारशीलता यांच्या योगानें समाजांत आपोआपच शिस्त राहूं शकते. म्हणजे अशा समाजांत शिस्त प्रस्थापित करण्याकरितां कोणी मुद्दाम उपाययोजना करीत नाहीं. आतां अशा समाजांतील शिस्त ही जरी नमुनेदार म्हणतां येणार नाहीं तथापि अशा समाजांत कोणत्याहि माणसाला जोखमीचें काम अंगावर घेतां येण्यास अडचण पडणार नाहीं. आजच्या समाजाकडे पाहून वर सांगितलेल्या स्वाभाविक शिस्तीचें स्वरूप आपल्याला कळणार नाहीं. कारण समाज व्यक्तीवर हळूहळू आपलें नियंत्रण बसवीत असतो. म्हणून आज जी शिस्त दिसते ती कांहीं अंशीं स्वाभाविक आणि कांहीं अंशीं कृत्रिम अशी असते. शिवाय हे दोन प्रकार एकमेकांत इतके मिसळून गेलेले असतात कीं, लोकांच्या चांगल्या वागणुकीचें कारण त्यांच्या स्वभावांत किती आहे आणि समाजानें घालून दिलेल्या नियमांत किती आहे हे कांहीं केल्या समजत नाहीं.

ओसाड देशांत ठिकठिकाणाहून आलेले लोक नवीन वस्ती करतात

तेव्हां त्या समाजांतील लोकांची वागणूक कोणत्या प्रकारची असते हें पाहणें बोधप्रद आहे. आपल्या मूळगांवीं असतांना त्यांच्या समाजानें घालून दिलेलें नियंत्रण त्यांना पाळण्याची सवय असली, त्याचप्रमाणें परंपरा, ध्येय इत्यादिकांचा जरी परिणाम त्यांच्यावर घडलेला असला तरी या नवीन परिस्थितींत मूळचे गुण सर्वस्वीं लोप पावतात. कारण अशा ठिकाणीं मनास येईल त्याप्रमाणें वागण्याची संधि त्यांना मिळत असते. त्यांच्या स्वतःच्या मनोभावना अनियंत्रितपणें विस्तार पावतात आणि आचारविचारांच्या बंधनांचें जुनें खोड गळून पडतें. इकडे या नवीन समाजाचें तर नियंत्रण कांहींच नसतें. खरें म्हटलें तर तो एक लोकसमूह असतो, समाज या पदवीस अद्यापि पोंचलेला नसतो. लोकमत, धर्म, कायदा आणि अशाचसारख्या समाजाची इच्छा व्यक्त करणाऱ्या दुसऱ्या गोष्टी यांचें बंधन उत्पन्न होण्यास वेळ लागतो. जरूर भासल्यावरसुद्धा नियामक संस्था लवकर अस्तित्वांत येत नाहींत. तेव्हां या नवीन जमलेल्या लोकसमूहांत सामाजिक बंधनाशिवाय सर्व व्यक्ति वागत असतात आणि व्यवहार करितात. अशा लोकांत कांहीं शिस्त दृष्टीस पडते तीमात्र वर सांगितलेल्या नैसर्गिक शिस्तीच्या जवळजवळ असते. अशा लोकांनीं शिस्तीनें वागावयाचें असेल तर मनुष्यांत जे नैसर्गिक गुण असतात म्हणून वर सांगितले, ते गुण व्यक्त होतील अशा प्रकारचा या लोकांचा परस्परसंबंध असावा लागतो. सगळीं माणसें सारखींच असतात अथवा आहेत ही भावना असली म्हणजे वरील गुण व्यक्त होतात. कोणत्याहि कारणानें असो, पण जेव्हां समाजांत मनुष्यामनुष्यांत अनेकप्रकारच्या कृत्रिम कारणांनीं विषमता उत्पन्न होते, तेव्हां सहानुभूति, माणुसकी, न्यायबुद्धि इत्यादि मनुष्याचे प्राकृतिक गुण नष्टप्राय होतात. विषमतेनें गजबजलेल्या समाजांत राजसंस्था व धर्मसंस्था या तरी निदान असाव्या लागतात. म्हणून आपापल्या देशांतून विषमतेचें गाठोडें बरोबर घेऊन आलेल्या वसाहतवाल्यांत राजाची आणि धर्माची प्रतिष्ठा करावी लागते. आज हिंदु समाजामध्यें जी बजबजपुरी व बेबंदशाही अनु-

भवास येते त्याचें 'कारण परकी सत्तेमुळें उत्पन्न झालेली प्रचंड विषमता हें होय. शिक्षण, अधिकार, पदव्या इत्यादि कारणांनीं मनुष्यामनुष्यामधील अंतर सारखें वाढत आहे. ब्रिटिश अमदानीच्या पूर्वी माणसामाणसांत बरीच समता असल्यामुळें मनुष्याच्या स्वाभाविक गुणांचा उदय होत असे. सर्व बाजूंनीं समता असलेले लोक कोणत्याहि नियंत्रणाशिवाय आनंदानें नांदत असतात, हें सिद्ध करण्यास इतिहासांत पुष्कळ उदाहरणें सापडतील. असे लोक एकमेकांना खाऊन टाकतील असें प्रथमदर्शनीं वाटतें; पण हा समज चुकीचा आहे. ब्रिटिश अमलापूर्वी कोणताहि कायदाकानू नसतां हल्लींच्या पेक्षांहि लोक सुखासमाधानानें नांदत होते, हें आपला इतिहास सांगतच आहे. दुसऱ्याला साहाय्य करावें, अन्यायानें दुसऱ्याच्या मिळकतीचा अपहार करूं नये, एवढ्या दोन गुणांमुळें पूर्वीचा समाज व्यवस्थितपणानें व आनंदानें राहत होता. अशीं उदाहरणें दाखवितां येतील कीं जेथें चोरी नाहीं, त्रेबंद-शाही नाहीं, मारामाऱ्या नाहींत. उत्तरेस हिमालयांत व इकडे रत्नागिरी जिल्ह्यांत अशा प्रकारचा अनुभव अजूनहि मिळण्यासारखा आहे. याचें कारण तेथील लोकांत विषमता फारच कमी प्रमाणांत आहे. सार्वजनिक ठिकाणीं द्रव्याची रास ठेवूनहि तिला कोणी स्पर्श करीत नाहीं अशीं कांहीं उदाहरणें प्राचीन प्रवासग्रंथांतून नमूद केलेलीं आहेत. सर्व समाजांत समता उत्पन्न करण्याचा मोठा प्रयत्न म्हणजे चातुर्वर्ण्य हा होय. चातुर्वर्ण्याचें पुनरुज्जीवन करतां येईल कीं नाहीं हा प्रश्न सोडून दिला तरी हिंदुस्थानांत पुष्कळ कालपर्यंत चातुर्वर्ण्याच्या योगानेंच असंख्य जातीपातींनीं गजबजलेलें हें राष्ट्र एकनिष्ठेनें राहिलें यांत शंका नाहीं. श्रीमंत-गरीब, धनी-नोकर, राजा-प्रजा, अधिकारी-अनधिकारी, प्रबुद्ध-अबुद्ध, काळा-गोरा इत्यादि प्रकारच्या द्वंद्वांनीं समाजांत विषमता उत्पन्न होते; आणि या विषमतेचें परिणाम जाचक होऊं नयेत म्हणून समाजाला उपाय योजावे लागतात. परंतु त्याचा परिणाम मनुष्याची मूळची सद्वृत्ति लुप्त करण्यांत होतो. सुधार-लेल्या राष्ट्रांत असली विषमता सारखी वाढत असते. किंबहुना विषमता

वाढविणें हेंच अर्वाचीन सुधारणेचें मुख्य कार्य म्हणावयास हरकत नाहीं. म्हणून असली विषमताच मुळापासून नाहींशी करण्याचे प्रयत्न करणें अवश्य आहे. तात्पर्य, नैसर्गिक शिस्त आणि कृत्रिम शिस्त यांमधील हा फरक फार महत्त्वाचा असून त्याचा अभ्यास करणें अगत्याचें आहे.

ओसाड प्रदेशांत सोडलेल्या लोकांत मनुष्याचा नैतिक स्वभाव प्रकट होऊन त्यामुळें शिस्त प्रस्थापित होते असें सांगितलें. परंतु अशा लोकवस्तींत सुद्धा माणसामाणसामध्येंच संबंध उत्पन्न होतात असें नाहीं. कांहीं माणसें जर जुगार खेळूं लागलीं तर त्यामुळें समाजाचें नुकसान होतें असें आढळून येतें. म्हणून हें नुकसान होऊं नये यासाठीं समाजानेंच निर्बंध घालणें अवश्य होतें. कांहीं दुष्कृत्यें अशीं असतात कीं, त्यामुळें तद्बाधित व्यक्तीलाच संताप येतो असें नव्हे, तर सर्वच लोकांना उद्वेग उत्पन्न होतो. अशा रीतीनें दोन व्यक्तींत होणाऱ्या कृत्यानें सर्व समाजाला चीड येते आणि सर्वांना त्या कृत्याबद्दल गुन्हेगाराला शासन झालेंच पाहिजे असें वाटतें. यांतच समाजनियंत्रणाचें बीज असतें. एखादा उद्योगधंदा सर्व लोकांनीं मिळून आरंभिला आणि त्याचें फल अथवा फायदा सर्वांना साक्षात् मिळण्यासारखा असला, तर येथें बाह्य नियंत्रणाशिवाय सहकारितेनें रीतसर काम चाललेलें दिसून येईल. परंतु सहकारितेनें केलेल्या कामाचा फायदा जेव्हां प्रथम समाजाला मिळतो आणि मग समाजाच्या द्वारें व्यक्तींना मिळतो, अशा ठिकाणीं आपापल्या वरील कामाचा बोजा आपण प्रामाणिकपणानें पार पाडला पाहिजे. जुन्या काळीं साध्या समाजांत गांवचें काम लोकांनीं आरंभिल्यास कामचुकार, भित्रे, माणूसवाणे या सर्व लोकांना ओढून आणून त्यांच्याकडून काम करवून घेण्याचा प्रघात असे. अशा कामांत व्यक्तीला प्रत्यक्ष व तात्बडतोब फायदा नसतो. म्हणून कामचुकारपणा अथवा अंग चोरून काम करण्याकडे कांहीं माणसांची प्रवृत्ति होते. तेव्हां अशा लोकांना काम करावयास लावणारी सत्ता कोठें तरी असावी लागते.

नदीकांठीं राहणाऱ्या लोकांना नदीला बांध घालावा लागतो. या बांधामुळें सर्वांचें सारखेंच संरक्षण होतें. परंतु वैयक्तिक फायदा नसल्यामुळें सर्व लोक आपखुषीनें आणि प्रामाणिकपणानें काम करण्यास पुढें आले पाहिजेत; तथापि तसें होत नाहीं. अशा वेळीं राजसत्तेसारखी कांहीं तरी सत्ता असली पाहिजे असें वाटूं लागतें. नवीन ठिकाणीं लोक वसाहत करावयास गेले म्हणजे तेथील मूळच्या लोकांच्या विरुद्ध आत्मरक्षण करण्याकरितां सर्व लोक एकजुटीनें पुढें येतात असा अनुभव आहे. भित्र्या व माणुसघाण्या व्यक्तीसुद्धा अशा कार्यांत भाग घेतात.

सहकारितेचा व्यवहार अधिक गुंतागुंतीचा असला तर काम करण्यास तयार असलेल्या लोकांवरसुद्धा सत्ता उपयोगांत आणावी लागते. याचा अनुभव युद्धामध्यें येण्यासारखा आहे. युद्ध हें एक प्रचंड सहकारी तत्त्वावर चालविलेलें कार्य होय. युद्धामध्यें एकाच्या हुकमतीखालींच सर्वांनीं वागावें लागतें. शिपायांनीं आपल्या बुद्धीचा उपयोग न करितां सेनापति सांगेल त्याप्रमाणें वागलेंच पाहिजे, अशी सक्ती असल्याशिवाय युद्धांत यश येण्याचा संभव नसतो. म्हणून शिस्तीच्या शिक्षणाचा पाया युद्धांतच घातला जातो. राजा नाहीं असे समाज पूर्वी होते; परंतु त्यांनाहि लढाई करण्याचा प्रसंग आला तर कोणी तरी मुख्य म्हणून नेमावा लागत असे. सर्व लोक आपलें जीवित त्याच्या हवालीं करीत. लढाई संपतांच मुख्याची गरजहि संपे व पूर्ववत् लोक अराजक स्थितींत राहत. परंतु हेच युद्धाचे प्रसंग वारंवार येऊं लागले म्हणजे दोन लढायांच्या दरम्यानच्या काळींदेखील स्वाभाविकपणेंच मुख्याचें बूड मुख्यपदाच्या ठिकाणीं कायम राहील. खळबळ नसलेल्या आणि स्वास्थ्यानें राहणाऱ्या समाजांतसुद्धा त्या समाजाच्या वाढीबरोबर लोकांचा परस्परांशीं संबंध निकट येऊं लागतो. त्यांचे व्यवहारहि अधिक होतात. त्यामुळें नैसर्गिक शिस्त मोठ्या कष्टानें राखली जाते. परस्परांच्या हितसंबंधाची घासाघीस जास्त होऊं लागली म्हणजे मूळचा सुशीलपणा अथवा माणुसकी पार नाहींशी होते, वादविवादाची

प्रत सं. नं. ठाणें.

असंख्य कारणें उपस्थित होतात आणि सार्वजनिक शांतता मोडण्याचे प्रसंग उद्भवतात.

कोणत्याहि लोकसमूहांत किंवा जमातींत कांहीं पेंढारी असतातच. ते नीतिदृष्ट्या पशुच होत. उंदीर मारून खातांना त्याच्या जिवाची तळमळ किती होत असेल याचा विचार जसा मांजराच्या मनाला शिवत नाहीं त्याप्रमाणें या लोकांनाहि आपल्या कृत्यामुळें दुसऱ्याला काय वाटत असेल याची मुळींच पर्वा नसते. अनेकप्रकारचे संबंध आल्यामुळें अनेक लोकांची ओळख होते अशा वेळीं वर सांगितलेले पशुतुल्य पेंढारी यांना लोकांचें नुकसान करण्याची अधिक संधि मिळते. समजा, एखाद्या घराला आग लागली असतां कांहीं माणसें रांगेनें उभीं राहून पाण्याची बादली एकाच्या हातून दुसऱ्याच्या हातांत देत आहेत. यामध्यें लबाड लोक आपल्या हातून दुसऱ्याच्या हातीं बादली देत असतां पाणी जमिनीवर पडलें तरी त्याची काळजी करीत नाहींत. त्यामध्यें आपल्या हातून कांहीं वाईट गोष्ट घडली याची त्यांना कल्पनाच नसते. हींच माणसें आपापली बादली पाण्यानें भरून स्वतंत्रपणें आग विझवूं लागलीं तर त्या बादलींतून पाण्याचा थेंबहि सांडणार नाहीं अशी दक्षता बाळगतील. तात्पर्य, आपापल्या परीनें निरनिराळें काम करणारीं माणसें जेव्हां भानगडीचें सहकार्य अंगावर घेतात तेव्हां त्यांच्यांतील नीच प्रवृत्तीच्या लोकांना दुसऱ्याचें नुकसान करण्याची उत्तम संधि मिळते. या टिकाणीं व्यक्तीच्या प्रत्याघातबुद्धीचा कांहीं उपयोग होत नाहीं. या कारणास्तव जेथें विविध स्वरूपांत संघटना परिणत होते तेथें या लुच्चे लोकांना ताळ्यावर कसें आणावें हा प्रश्न सोडविण्याची जबाबदारी समाजावर पडते.

प्रथमतः प्रत्यक्ष रीतीनें संबद्ध झालेलीं माणसें हेंच समाजाचें स्वरूप असतें. परंतु पुढें पुढें एकाच समाजांत अनेक संघ निर्माण होतात. अशा वेळीं शेजारधर्माचा अगदीं लोप होऊन जातो. लोकसंख्या वाढत जाते त्याप्रमाणें निरनिराळ्या जाति, निरनिराळे पंथ, निरनिराळे संघ उत्पन्न

होतात. एकंदर समाजाचा अथवा राष्ट्राचा जाति हा एक घटक असतो. त्यामुळें त्याच्यामध्यें नैसर्गिक शिस्त आपोआपच राखली जाते. याचा परिणाम असा होतो कीं, जातीच्या लोकांची सहानुभूति फक्त जातीच्या माणसापुरतीच असते. तिचा फायदा जातीच्या बाहेरच्या माणसाला कधीं मिळत नाहीं. आपल्या जातीचा अथवा संघाचा उत्कर्ष हेंच त्यांतील लोकांचें ध्येय बनतें. जातिप्रेमामुळें कर्तृत्वाचा पराक्रम उदयास येतो. राष्ट्राला ज्या गुणांची आवश्यकता असते ते सर्व गुण जातींतील लोकांत असतात. परंतु निरनिराळ्या जातींमध्यें वैमनस्यें उत्पन्न होऊन सर्व राष्ट्राचा नाश होतो. हेंच जातिप्रेम कमी करून त्या प्रेमाचा ओघ राष्ट्रकार्याकरितांच वाहून आणणें हें काम राष्ट्राला करावयाचें असतें. निरनिराळ्या जाति झाल्या म्हणजे राष्ट्र आणि व्यक्ति यांच्यामध्यें चकमक उडण्याचे प्रसंग कमी होतात. राष्ट्राला जातींशीं झगडावें लागतें, किंवा एक जात दुसऱ्या जातीची गळचेपी करते. यामध्यें धर्मपिसे, जात्यंध, पक्षांध, अत्युत्साही, मूर्ख अशा लोकांची राष्ट्राला भीति बाळगावी लागते. मिळकतीवर वैयक्तिक सत्ता आणि वाटेल तो व्यवहार करण्याची मुभा इतकी सवलत ठेवल्यावर माणसामाणसांत सांपत्तिकदृष्ट्या महदंतर पडतें तें कसें टाळावें हा उपाय कोणास सुचला नाहीं. प्राचीन काळीं समाजांत सांपत्तिकदृष्ट्या सगळीं माणसें जवळजवळ सारखींच असत. परंतु आपल्या कर्तृत्वाचें फळ ज्याचें त्यालाच मिळूं लागलें म्हणजे त्या योगानें माणसामाणसांत विषमता उत्पन्न होते आणि वारसाच्या कायद्यानें तिला शाश्वती येते. कायदा, राजकारण, धर्म यांत जरी समानता ठेवली तरीसुद्धा आर्थिक विषमतेचें पाऊल मागें येत नाहीं; आणि म्हणून समाजनियंत्रणाची आवश्यकता निर्माण होते. बंधुभावानें वागावयाचें याच उद्देशानें जो समाज बनतो त्यामध्यें शिस्त आपोआपच राखली जाते. सरकारला मध्यस्थी करण्याचा फारसा प्रसंग येत नाहीं. परंतु पैसा मिळवून श्रीमंत होणें हेंच ज्या समाजाचें ध्येय असतें तेथें आर्थिक विषमता उत्पन्न होऊन त्यामुळें

समाजांत इतका प्रक्षोभ होतो कीं, सरकारला जुलूमजबरदस्तीनेंच राज्यकारभार हांकावा लागतो. लोकांनीं सलोख्यानें राहण्याचा कितीहि निश्चय केला तरी वैयक्तिक मालमत्ता असल्यानें त्यांच्यांत फाटाफूट झाल्याशिवाय राहत नाहीं. खाजगी मिळकतीच्या बाबींमुळें सत्तेचे उपाय अमलांत आणण्याचा प्रसंग येतो. कारण अशा समाजांत वर सांगितल्याप्रमाणें नैसर्गिक शिस्तीला अवश्य असणारे जे स्वाभाविक धर्म त्यांचा लोप होत असल्यानें कृत्रिम नियंत्रणें योजावीं लागतात. आर्थिक विषमता ही माणुसकीची संहारक आहे. वारसाच्या योगानें संपत्तीमध्यें अंतर पडतें. बापापासून फुकटची मिळकत मिळाल्यामुळें कांहीं लोकांना काम न करतां जन्मभर मजेनें राहतां येतें. तथापि हें सामान्य माणसाच्या न्यायबुद्धीस पटत नाहीं. संसार ही एक शर्यत आहे हें मान्य; परंतु कांहीं माणसांनीं मात्र धावावें आणि इतरांनीं न धावतांच बक्षीस मिळवावें ही शर्यत तरी कोणत्या प्रकारची ! आतां हा वारसाचा कायदाच बंद केला तर तेवढ्यानें सर्व सुधारेल असें नाहीं. त्यापासून कर्तृत्ववान् माणसांना राग येतो. त्यांना असें वाटतें कीं, आमच्या कर्तृत्वामुळें आमच्या मुलांनीं काम न करतां सुखानें राहावें हा आपला हक्कच आहे. माझ्या कर्तृत्वाचा फायदा माझ्याबरोबर माझ्या बायकामुलांनीं घेऊं नये हा कोणता न्याय ! आणि मग माझ्या कर्तृत्वाचा उपयोग तरी काय ! जमीन आणि भांडवल यांचीहि गोष्ट अशीच आहे. सरळ शर्यतींत आपण हरलों तरी बेहेत्तर असें म्हणणारे लोक नसतात असें नाहीं. तथापि कांहींनीं मात्र पायीं धावावें आणि दुसऱ्यांनीं मोटरींत बसून जाऊन बक्षिसें मिळवावींत हें त्यांना पटत नाहीं. आतां जमिनीचें व भांडवलाचें उत्पन्न सर्व राष्ट्राला सारखें वांटून द्यावयाचें असा नियम घातल्यास वर सांगितल्याप्रमाणें कर्तृत्ववान् माणसांची ओरड होणार. ज्यांच्या अंगांत धमक असते ते कितीहि अडचणी आल्या तरी आपल्या पराक्रमानें गबर होण्याची संधि दवडीत नाहींत. बरें, ही स्पर्धा अथवा चढाओढ खरोखरच न्यायाची आहे काय ! आम्ही सगळ्यांना

सारखी संधि देत आहों, अंगांत सामर्थ्य असेल त्यांनीं तिचा फायदा घ्यावा, हें म्हणणें दिसण्यांत बरें दिसतें. परंतु एखादा पांगळा मनुष्य असें म्हणेल कीं या धावण्याच्या शर्यतींतच नशिबाची पारख कां ठेवावी ? शरीर-सामर्थ्य किंवा चातुर्य हे तुम्ही शर्यतीचे विषय ठेवा, म्हणजे मी इतरांबरोबर स्पर्धा करूं शकेन. मला धावतां येत नाहीं, तेव्हां धावण्याची शर्यत मला मान्य नाहीं. आतां आपण कांहीं सांगितलें तरी या पांगळ्या माणसाचें समाधान होणार नाहीं. हे खरें आहे कीं, वर सांगितलेली शर्यत ही न्यायतः उत्तम म्हणून कोणीच तिची योजना केलेली नाहीं. महत्त्वाकांक्षी लोक आणि क्रियाहीन लोक यांच्यामधली ही एक तडजोड आहे. खरा प्रकार असा आहे कीं, आपल्या कोणत्याहि संस्था सर्व सज्जनांना पटेल अशा एखाद्या साध्या नैतिक तत्त्वावर उभारलेल्या असतात. विरोधाचे प्रसंग कमी करण्याकरितां जसे उपाय सुचले तसे करण्यांत आले. विषमता नांदत असलेल्या समाजांत लबाड व उपद्रवी लोकांचा भरणा भरपूर असणार. हल्लींच्या समाजांत पूर्वींपेक्षां गुन्ह्यांचें प्रमाण अधिक आहे हें आपण पाहतोंच. कोर्टांत जे गुन्हे येतात त्यांच्यापेक्षां खरोखर कितीतरी अधिक गुन्हे नित्यशः घडत असतात. कितीतरी गुन्हेगार सापडत नाहींत; कितीतरी गुन्हेगार शिक्षेवांचून सुटतात; आणि गुन्ह्यामध्यें ज्यांचा समावेश होत नाहीं अशीं कितीतरी दुष्कृत्यें समाजांत हरघडीं केलीं जातात. म्हणून समाजाचा विध्वंस टाळण्याकरितां समाजानें या सगळ्या लोकांचें नियंत्रण करणें अवश्य आहे. तटस्थ राहून भागण्यासारखें नाहीं. नुसत्या कायद्या-संबंधींच नव्हे, तर शिक्षण, लोकमत, धर्म इत्यादि बाबींतसुद्धा समाजाचें नियंत्रण असावें लागतें. अशा गुंतागुंतीच्या समाजांत कायद्याच्या योगानें शिस्त ठेवणें भाग पडतें. मनुष्यांतील नैसर्गिक सद्गुणावर विसंबून पुरें पडणार नाहीं. सुधारलेला समाज कायद्याच्या नियंत्रणाशिवाय सुसंघटित राहणें अशक्य आहे. नियंत्रणहीन समाजांत लोकांना आपापलें संरक्षण करावें लागेल. अशा समाजांत ‘ बळी तो कान पिळी ’ हाच न्याय असणार हें

उघड आहे. मात्र एकजुटीची भावना सर्व समाजांत पसरली म्हणजे सर्व समाजावर चालणारी एक सत्ता स्थापन केली पाहिजे असें लोकांस आपोआपच वाटूं लागतें. ज्या समाजांत बेबंदशाही असेल त्या समाजाची वेळीं उपासमारहि होईल. बाहेरचे कोणीहि व्यापारी आपला माल घेऊन असल्या समाजांत येण्यास धजणार नाहींत. कारण जेथें त्यांच्या जीविताची व मालाची सुरक्षितता राहील म्हणून खात्री वाटत नाहीं, तेथें ते व्यापार करावयास काय म्हणून येतील !

सुधारलेल्या व्यापारी समाजांत मागें सांगितलेल्या मनुष्यांच्या नैसर्गिक गुणांपेक्षां त्यांच्या नेकीचा उपयोग अधिक होतो. प्रामाणिकपणाची सवय नसली म्हणजे सहकारी तत्त्वानें चालावयाच्या कामांत कधींहि यश येत नाहीं. कोणता मनुष्य केव्हां फसवील याचा नेम नाहीं. यामुळें कोणी कोणावर विश्वास ठेवण्यास तयार नसतो. अर्थात् कोणतेंहि एकजुटीनें होणारें कार्य पार पाडतां येत नाहीं. हिंदुस्थानांत आज आपणांस हा अनुभव येतच आहे. देशी पेढयांतून म्हणजे आपल्याच लोकांनीं चालविलेल्या बँकांत आपण पैसे ठेवण्यास धजावत नाहीं. युरोपियन लोकांच्या पेढयांत आपण पैसे ठेवण्यास धावतों. याचा अर्थच असा कीं, युरोपियन लोकांचा प्रामाणिकपणा अद्यापि आमच्या अंगीं उतरला नाहीं. एक टांचणी करावयाचें म्हटलें तर तीसुद्धा सहकारितेखेरीज करतां यावयाची नाहीं; पण कोणाचा कोणावर विश्वासच नसेल तर कोणता धंदा चालवितां येईल ! कित्येक लोकांची तर अशी समजूत असते कीं, खोटें बोलणें हें कांहीं लांछनास्पद नाहीं. उलट वाईट प्रकारावर पांघरूण न घालणें हें त्यांच्या दृष्टीनें अधिक लांछनास्पद होय. हिंदी लोकांत नीतीचा आणि शिस्तीचा अभाव आणि युरोपियन लोकांत या दोन्ही गुणांचें प्राचुर्य यामुळें ते आमच्यावर सहज मात करूं शकतात. तात्पर्य, कोणत्याहि प्रकारचें नियंत्रण न पाळल्यास औद्योगिक, व्यापारी, राजकीय, सैनिक, शैक्षणिक इत्यादि कोणत्याहि प्रकारचें कार्य अंगावर घेऊन त्यापासून फायदा

आपणांस करून घेतां येणार नाहीं. समाजांतील माणसेंच जर बेविश्वासू असतील तर किती द्रव्याची खराबी होईल याचा नेम नाहीं. हीं माणसें आपलें काम बरोबर करतात किंवा नाहीं हें पाहण्याकरितां दुसरीं माणसें ठेवावीं लागतात. त्यापायीं खर्च होतो तो होतोच; पण शिवाय घासाघीस सुरू होते ती निराळीच. अखेरीस कार्य फायदेशीर होत नाहीं हा त्याचा परिणाम होऊन बसतो. म्हणून मनुष्यांच्या स्वाभाविक नैतिक गुणांनीं जितकी शिस्त राहील त्याच्याहून अधिक शिस्तीची गरज असते. आतां एवढें खरें कीं, कांहीं कारणानें आपल्या अप्रामाणिकपणामुळें आणि बेशिस्त वागणुकीमुळें आपलें अखेरीस नुकसान होतें अशी जाणीव हळू-हळू उत्पन्न होऊं लागते. असें जेव्हां लोकांना पटतें तेव्हांच त्यांच्यामध्यें शिस्तीनें व नीतीनें वागण्याची प्रवृत्ति उद्भूत होते. व्यक्तीच्या फायद्यामुळें समाजाचा फायदा नियमित वर्तनाशिवाय टिकाव धरूं शकत नाहीं. नदीला पूर आला म्हणजे त्यापासून आपलें नुकसान होऊं नये म्हणून मनुष्य थोडेसे उपाय योजतो. त्याप्रमाणेंच मनुष्याच्या दुष्ट मनोविकारांपासून समाजानें आपलें संरक्षण करून घेण्याचे उपाय योजावयास नकोत काय ! जनावराहून मनुष्याचें मन थोडेंसें शिस्तीकडे झुकतें हें खरें; परंतु तें अगदींच क्षुल्लक प्रमाणांत असतें. सद्वर्तनाचीं भरपूर फळें खावयाची आपणांस इच्छा असेल तर त्याच्याकरितां तयार केलेलीच जमीन पाहिजे. हें नियंत्रण सारखें ठेवावें लागतें. एका पिढीला नियंत्रणाची दीक्षा दिली म्हणजे पुढें नियंत्रणाची आवश्यकता राहत नाहीं असें नाहीं; कारण नैतिक गुण हे मुलांत उतरतातच असा नेम नाहीं. पांच हजार वर्षांपूर्वी सद्वर्तनाबद्दल लोकांना जो उपदेश ऋषि करीत असत त्याच उपदेशाची आवश्यकता आजच्या पिढीकरितांहि भासत आहेच. यावरून मनुष्यस्वभाव फारसा पालटला नाहीं हें सिद्ध होतें. उंदराचें शेपूट सारखें पंचवीस पिढ्या तोडलें म्हणून बिनशेपटाचा उंदीर थोडाच निपजणार आहे ! मनुष्यप्राण्याच्या विकासापेक्षां समाजाचा विकास अधिक वेगानें होत असतो. मी चोरी करीत नाहीं याचें कारण

माझें स्वतःचें खंबीर मन नसून समाजानें उत्पन्न केलेली परिस्थिति हें होय. अर्थात् मनुष्याला जसें मन असतें तसें समाजालाहि असतें असें कल्पिणें भाग आहे. अशा या समाजपुरुषाच्या वृत्तींत बदल होतो तेव्हांच तो समाज कोणतेंहि कार्य संघशक्तीनें करण्यास पात्र होतो. शिक्षेसारखे बाह्य उपाय योजणें तर अवश्य आहेच, परंतु दुष्कृत्याबद्दल केवळ शिक्षा देऊन समाजाची कधींहि प्रगति होत नसते.

---

# प्रकरण चौथें

## नियंत्रणाची दिशा

कोणतेंहि कर्म झालें म्हणजे त्याला तीन बाजू असतात. एक कर्म करणारा, दुसरा ज्याच्यावर त्या कर्माचा परिणाम झाला असेल तो, आणि तिसरा त्रयस्थ.म्हणून सामाजिक नियंत्रण निर्माण करतांना ह्या तीन माणसांच्या भावनांचा विचार करावा लागतो. परंतु त्यांतहि नियंत्रणाची दृष्टि दोघां-वरच असते. म्हणजे त्रयस्थ आणि ज्याला अपकार केलेला असेल तो. केवळ दुःखित माणसाच्या दृष्टीनेंच नियंत्रण केलें तर त्याच्या बुडाशीं स्वार्थबुद्धि असणार; आणि त्रयस्थाच्या दृष्टीनें नियंत्रणयोजना केली तर निर्विकारित्वांत उत्पन्न झालेली नुसती नापसंती असणार. आपल्यावर जें कांहीं नियंत्रण आहे त्याची उपपत्ति या दोन्ही गोष्टी विचारांत घेतल्या-शिवाय लागणार नाहीं. सर्व शासनपद्धतीचा उलगडा एकच गोष्ट जमेस धरून करतां येण्यासारखा नाहीं. कांहींनीं समाजांतील नुसत्या लोकमताचा विचार करून शासनपद्धतीवर भाष्यें लिहिलीं आहेत, तर दुसऱ्या कित्ये-कांनीं सामाजिक उपयुक्तता दृष्टीपुढें ठेवून शासनपद्धतीचें रहस्य उलगड-ण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु अशा एकांगी विचारानें कोणत्याहि

राष्ट्रांतील शासनपद्धतीचा उलगडा करतां येणार नाहीं. याचें कारण असें कीं, कधीं कधीं समाज नुसता भावनेवर तर कधीं स्वार्थावर शासनपद्धति अधिष्ठित करीत असतो. सहानुभूति, न्यायबुद्धि अशांसारख्या भावनांचें पहिलें कार्य म्हणजे मनुष्य स्वतः आपलें आपणच संयमन करतो. यानंतर दुसरें कार्य म्हणजे दुसऱ्यांचें नियंत्रण करण्यास किंवा दुसऱ्यांना आवरून धरण्यास तो उद्युक्त होतो. सामाजिक बाबतींत हें दुसरें कार्य फार महत्त्वाचें असतें. मोह आवरण्याचें सामर्थ्य ज्याच्यांत आहे असा मनुष्य विरळा. परंतु न्याय्य कर्माकडे मनुष्याच्या मनाचा स्वाभाविक ओढा असतो. त्या कारणानें तो न्यायबुद्धीनें प्रेरित होऊन दुसरा मनुष्य मोहवश होणार नाहीं असें करतो. स्वतः दारू पिणारे दारूबाजांना वाईट नाहीं का म्हणत ? स्वतःचें संयमन ज्याला करतां येत नाहीं त्यानें दुसऱ्याचें संयमन करण्याच्या भानगडींत पडूं नये, असें सर्व लोक बोलत असतात. परंतु यांत सत्याचा भाग फार अल्प आहे. दुसऱ्याला न्याय सांगणारा स्वतः न्यायानें वागणारा पाहिजे असें म्हटल्यास न्याय देणाऱ्याच्या अभावीं कोणाला न्यायच मिळणार नाहीं; आणि सर्वत्र अन्यायाचें साम्राज्य पसरेल. आपल्या डोळ्यांतलें मुसळ ज्याला काढतां येत नाहीं त्यानें दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळ काढतां कामा नये, ही विचारसरणि मान्य केल्यास सर्वच लोक आंधळे राहतील. स्वतःच्या बाबतींत न्यायानुसार आचरण ठेवण्यापेक्षां दुसऱ्याच्या बाबतींत तें ठेवणें सोपें असतें; आणि म्हणूनच याचा फायदा समाजानें उपेक्षितां कामा नये. हें जें नैतिक सामर्थ्य समाजामध्यें असतें तें उपयोगांत आणिलें नाहीं तर समाजाचें पाऊलच पुढें पडणार नाहीं. ह्या तटस्थाच्या वृत्तीचें जें लोकमत बनतें तें फार प्रभावी असतें. वैयक्तिक विकारयुक्त बुद्धीच्या पुढें ही तिऱ्हाइताची दृष्टि समाजाला नेऊं शकते. सदाचाराबद्दल अशा रीतीनें समाजामध्यें जें लोकमत बनलेलें असतें त्याच्या योगानें, तसेंच मान्य झालेल्या आचारांनीं मनुष्याच्या मनोविकारांवर दडपण पडतें; आणि या दडपणांतच भावी उत्कर्षाचें बीज रुजलेलें असतें. युद्धविषयक माणुसकीचे नियम

करणारे युद्धामध्यें प्रत्यक्ष भाग घेणारे लोक नसून दुरून युद्ध पाहणारेच होते हें लक्षांत ठेवलें पाहिजे. कुस्तीच्या वेळीं कुस्तीचे नियम पाळले गेले किंवा नाहींत याचा निर्णय करण्यास तिऱ्हाईत नेमावे लागतात. कुस्ती खेळणाऱ्यांवर तें काम सोंपवून चालत नाहीं. कारण खेळणाऱ्यांचे विकार पंचांमध्यें उत्पन्न होत नाहींत. एवढ्यासाठींच ‘ पांचां मुखीं परमेश्वर ’ ही म्हण पडली आहे.

वरील कारणांकरितां नियंत्रणाची योजना करतांना तटस्थाची वृत्तिच विचारांत घ्यावी लागते. मनुष्याची वासना आणि सदसद्विवेकबुद्धि यांमध्यें जो फरक आहे तोच फरक झुंज खेळणारा आणि तटस्थ यांमध्यें आहे. नीतीचें बीजारोपण मनुष्याच्या या सदसद्विवेकबुद्धींत झालें आहे असें नीतिशास्त्रवेत्ते म्हणत असतात; आणि या सदसद्विवेकबुद्धीला अनुसरून लोकमत बनत असतें असेंहि ते आणखी प्रतिपादन करतात. परंतु लोकमतानुसार मनुष्याची सदसद्विवेकबुद्धि बनत असते असाहि कित्येकांचा आग्रह आहे. सूक्ष्म विचाराअंतीं सदसद्विवेकबुद्धीला अनुरूप असें लोकमत बनतें आणि पुनः हेंच लोकमत पुढच्या माणसाच्या सदसद्विवेकबुद्धीला वळण लावतें हें खरें दिसतें. वैयक्तिक सदसद्विवेकबुद्धींत सर्व समाजाची सदसद्विवेकबुद्धि अथवा तिचेंच दुसरें नांव लोकमत हें प्रतिबिंबित झालेलें असतें. याचें प्रत्यंतर नैतिक कल्पनांच्या उगमांचा इतिहास पाहिला असतां दिसून येणार आहे.

कौटुंबिक स्थितींत कांहीं भावना दृढमूल झालेल्या असतात. त्यांच्याविरुद्ध आचरण घडलें असतां मनुष्याच्या मनाला धक्का बसतो. उदाहरणार्थ, व्यभिचार, गर्भपात, वेश्यावृत्ति यांच्यासंबंधीं मनुष्याच्या मनांत खंत उत्पन्न झालेली असते. आतां ह्या दुराचारांपासून समाजाचें अहित होत नसलें तरी हे दुराचार बंद करण्यास सर्व लोक उद्युक्त असतात. कांहीं माणसें आळशीपणांत आयुष्य घालवितात, तर कांहीं मूर्खपणाच्या चैनींत कालक्रमणा करितात; आणि कांहींजण बेदरकारपणें उधळपट्टी

करीत असतात, तर कांहीं स्वतःच्याच मिळकतीचा अविचारानें खुशाल धुव्वा उडवितात. असल्या कृत्यांबद्दल समाजाला तिटकारा येतो याचें कारण या दिवाळखोरांना अखेरीस समाजाला फुकट पोसावा लागेल हें असतेंच; पण शिवाय सामान्य माणसाची काटकसर अथवा मितव्यय याविषयीं जी कांहीं कल्पना असते तिला अनपेक्षित धक्का बसतो.

शासनक्षेत्राच्या दुसऱ्या भागांत धार्मिक भावना हें शासनकारण झालेलें आढळतें. देवाची मूर्ति भग्न केली असतां, हिंदूनें गोमांस खाल्लें असतां, ब्राह्मणाचा अग्निच्छेद केला असतां वगैरेसारख्या गोष्टींनीं सर्व जनतेचीं मनें रुष्ट होतात, हा आपला अनुभव आहे. त्यामुळें असलीं दुष्कृत्यें करणाऱ्यास समाज शासन करण्यास प्रवृत्त होतो. कित्येक ठिकाणीं शासनाचें मूळ दयेंत असल्याचाहि अनुभव येतो. मुक्या जनावरांना पराणी टोचणें, बालहत्या करून ती छपविणें, पुरलेलीं प्रेतें उकरून काढणें इत्यादि प्रकार पाहून लोकांना वाईट वाटतें; आणि म्हणून अशा गोष्टी न व्हाव्या एतदर्थ उपाय योजण्यांत पीडिताबद्दल सहानुभूति वाटणें हें चांगलें तर खरेंच, परंतु त्याहिपेक्षां परपीडिताच्या दुःखाची कल्पना येऊन दुसऱ्या लोकांच्या मनांत सात्त्विक संताप उत्पन्न होणें हें कार्य अधिक महत्त्वाचें आहे. कां कीं, तिऱ्हाईत माणसांत ही जी न्यायबुद्धीची प्रेरणा होते तिचा शिस्तीच्या कामीं अतिशय उपयोग होतो. सहानुभूतीच्या योगानें मनुष्य पीडिताला साहाय्य करील; परंतु अपकाराबद्दल जी चीड उत्पन्न होते तीमुळें तो पीडा करणाऱ्याला शासन करण्यास उद्युक्त होतो. आपल्या स्वतःला उपद्रव न पोंचतांहि दुसऱ्याच्या भांडणांत आपलें लक्ष वेधलें जातें यामुळें वैयक्तिक अपकार न मानतां सर्व समाजाचीच हानि झाली आहे असें वाटल्यामुळें अशा प्रकारच्या दुष्कृत्यांचें स्वरूप पार पालटून जातें. कोणत्याहि वैयक्तिक दोषामुळें सर्व समाजाचें नुकसान होतें अशी भावना असणें हें सुधारणेचें द्योतक आहे. हा जो तिऱ्हाइताचा सात्त्विक अथवा शुद्ध संताप, एवढ्यानेंच शासनाची उत्पत्ति लागणार नाहीं. कारण समाजनियंत्रणाची खरी किल्ली

ग्रंथ संग्रहा
पृथक प्रत

म्हणजे त्याची उपयुक्तता हीच होय. समाज हा एक नुसता लोकांचा समुदाय नसून एक स्वतंत्र मनुष्य आहे असें मानावें लागतें. व्यक्तीचें हित आणि समाजाचें हित हीं अनेक वेळां परस्परविरोधी असतात. समाजाचें जगणें, समाजाचें वाढणें हें मनुष्याप्रमाणेंच असतें. म्हणून व्यक्तीच्या कुप्रवृत्तीला आळा घालण्याकरितां समाज जें नियंत्रण बनवितो तें आत्महिताच्या दृष्टीनेंच बनवितो. मात्र या ठिकाणीं त्रयस्थाची भावना असते हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. आपलें हित कशांत आहे अथवा अहित कशांत आहे हें समाजाला समजत असतें. व्यक्तीपासून आपणांस इजा पोंचू नये म्हणून समाजाची खटपट चालू असते. ज्या कृत्यानें समाजाचें परिणामीं नुकसान होईल त्याच कृत्याकडे समाज रुष्ट दृष्टीनें पाहतो. उलट ज्या वैयक्तिक कृत्यानें समाजाचें कल्याण होईल त्याला समाज प्रोत्साहन देतो. कायदेकानू अथवा सामाजिक निर्बंध हे न बदलणारे अथवा कायमचे असत नाहींत. समाजाच्या गरजेप्रमाणें हें नियंत्रण निरनिराळें स्वरूप धारण करतें. एखाद्या समाजाभोंवतीं असंतुष्ट व मनांतून द्वेष करणाऱ्या लोकांचा गराडा असला तर त्या समाजाला आत्मसंरक्षणार्थ धैर्य, मितव्यय, शरीरसंवर्धन अशासारखे गुण संपादन करण्याकरितां सक्तीचे उपाय योजावे लागतील. समाजानें त्रयस्थाचा किती जरी आव आणला तरी आत्महित हेंच सर्व शासनांच्या बुडाशीं असतें, असें विचाराअंतीं कोणासहि पटेल. ह्याच्या उलट कधीं कधीं अज्ञान आणि भोळसरपणा अथवा धर्मवेड हें शासनाचें अधिष्ठान असतें. एखादा देव कोणी पळवून नेला तर त्याचें प्रायश्चित्त साऱ्या समाजाला भोगावें लागेल अशा समजुतीनें समाज असल्या कृत्यांचें नियंत्रण करूं बघतो. पुष्कळ वेळां असें घडतें कीं, ज्या कारणाकरितां नियंत्रण अमलांत आणतात तें कारण नाहींसें झालें तरी एकदा घातलेलें नियंत्रण कायम राहतें; आणि मग त्याची उपपत्ति लावणें कठीण पडतें. नियंत्रणाचा ओघ वारंवार बदलत असतो. एकाच समाजांत निरनिराळ्या वेळीं कायद्यांत व नीतिकल्पनांत फरक पडलेला आपणांस आढळून येतो. समाजाच्या ह्या ज्या

कल्पना बदलतात त्याला कारण समाजांतील कांहीं विशिष्ट व्यक्ति असतात. समाजाचें कल्याण कशांत आहे हें हे लोक ठरवितील तें समाज मानतो. समाजनियंत्रण कायद्याच्या रूपानें व्यक्त होतें आणि लोकांचें नियंत्रण अथवा लोकांची इच्छा ही नैतिक बंधनांत दिसून येते.

पण एवढ्यानें सामाजिक नियंत्रणाचा समाजाच्या शिस्तीशीं कसा संबंध येतो ह्याचें स्पष्टीकरण होत नाहीं. म्हणून त्याचा आणखी विचार केला पाहिजे. लोकांच्या नीतिविषयक कल्पना उच्च दर्जाच्या असल्यास त्या समाजाचें वर्चस्व ज्यांच्या नीतिकल्पना हीन प्रतीच्या आहेत अशा लोकांच्या समाजावर सहज बसतें. एवढेंच नव्हें, तर ज्या समाजाची नीति अगदीं हलक्या प्रतीची असेल त्या समाजाचा अखेरीस ऱ्हासहि होतो. नैतिक कल्पनांच्या प्रगतीबरोबर आचारांचे अर्थहि बदलत असतात. दोन माणसांमध्यें झालेला करार एकानें मोडला तर जो दावा करावयाचा तो ज्या वस्तूसंबंधीं करार असेल त्या वस्तूसाठीं करावयाचा, ही जुनी कल्पना जाऊन त्या ठिकाणीं त्याच दाव्याला वचनभंगाचें स्वरूप प्राप्त झालें. क्रिया जवळजवळ एकच, परंतु तिच्या अर्थांत जो फरक पडला त्याचें कारण नैतिक कल्पनांतील फरक हें होय. उलट प्रकारहि होणार नाहीं असें नाहीं. वेश्यागृहें बंद केलीं तर त्याचें श्रेय उच्चतम तत्त्वांना देण्यांत येतें; पण या कल्पना बदलल्या तर भयंकर उपदंशाच्या सांथीमुळें वेश्यागृहें बंद ठेवावीं लागलीं असेंहि म्हणण्यास कमी करणार नाहींत. राजकीय, आर्थिक इत्यादि अनेक प्रकारचीं कारणें शोधून काढतील; परंतु नैतिक कारण कोणी कबूल करणार नाहीं. स्वाभाविक मनोधर्म व आवश्यकता अथवा उपयुक्तता अशीं जीं हीं दोन कारणें समाजनियंत्रणाच्या मागें असतात त्यांची स्पष्टता वैयक्तिक नीति आणि सामाजिक नीति यांची तुलना केली असतां दिसून येणारी आहे. अन्तःकरणांत उद्भूत होणाऱ्या भावना हेंच जेथें समाजनियंत्रणाचें कारण असतें तेथें हें नियंत्रण लोक आचरणांत आणितात. परंतु जर का आपल्या स्वतःच्या कल्याणासाठीं

समाजानें लोकांवर एखादें नियंत्रण लादलें तर लोक त्याप्रमाणें वागतात असें नाहीं. सामाजिक नीतिमत्ता ही वैयक्तिक नीतिमत्तेहून कमी असते असें आपणांस सामान्यतः आढळून येतें. मुत्सद्दी, सेनापति, लोकाग्रणी हे जी गोष्ट स्वतःच्या व्यवहारांत करणार नाहींत ती सार्वजनिक कामांत ते बेशक करतात. मुत्सद्द्यानें खोटें बोलणें पाप नाहीं; उलट तें शहाणपणच ठरतें. सैन्यानें खून केले तरी हरकत नाहीं. अशा प्रकारची विचारसरणि समाजाची असते. इंग्रज लोक आणि इंग्रज राज्यकर्ते यांमध्यें कित्येक लोक फरक करतात त्याचें तरी कारण हेंच.

लहान जातीची नीति मोठ्या जातीच्या नीतीपेक्षां वरच्या दर्जाची असते. मोठ्या समाजामध्यें अहंतेचा दोष अधिक असतो. स्वतःच्या फायद्याकरितां जें दुष्कृत्य माणूस करणार नाहीं तें दुष्कृत्य नानाधर्मपंथीय लोकांनीं केल्याचें इतिहास सांगतो. कित्येक लोकांची दुधारी नीति असते. आपल्याच जातींतील लोकांकरितां एक नीति आणि जातीच्या बाहेरील लोकांकरितां दुसरी नीति. याचें मोठें उदाहरण म्हणजे मुसलमान लोकांचें होय. दया, माया, सत्य, न्याय वगैरे गोष्टी आपल्या जातभाईकरितां ते राखून ठेवतात; परंतु जातीच्या बाहेरील लोकांकरितां द्वेष, पीडा, असत्याचरण व फसवेगिरी हीं उपयोगांत आणिलीं जातात. परकीयांशीं अशा रीतीनें वागणें हें आपलें कर्तव्य, किंबहुना आपला धर्मच आहे अशी पुष्कळ धर्मीयांची समजूत असते. तात्पर्य, लोकमत म्हणजे वाटेल त्याचें मत नव्हे. विचारी, शिक्षित व संघटित लोकांचेंच जें मत त्याला लोकमत म्हणतां येईल. म्हणून समाजाचें नियंत्रण अशा लोकांनींच प्रस्थापित केलें पाहिजे. ही नियंत्रणसत्ता जर बाजारबुणग्याकडे जाईल तर समाजव्यवस्था चांगली राहणार नाहीं. रूढीचा या कामीं बराच उपयोग होतो. कारण कीं, दीर्घकाल अनेक लोकांच्या परीक्षेंतून तावूनसुलाखून निघाल्यामुळें तिच्या नियंत्रणांत भावनेचा अभाव आढळून येतो. यानंतर धर्माचें नियंत्रण अशाच स्वरूपाचें असतें. सरकारी नियंत्रणांतहि भावनेचा पत्ता लागत नाहीं. थोड्या

शहाण्या लोकांच्या विचारानें जेथें राज्यकारभार चालतो तेथेंच मात्र वरील सिद्धान्त खरा ठरतो. मनुष्याच्या प्रत्येक व्यसनाबद्दल सरकार शिक्षा करीत नाहीं. दारूवाल्याला नुसत्या दारू पिण्याबद्दल शिक्षा होत नाहीं, तर तो झिंगून लोकांना उपद्रव देतो तेव्हांच शिक्षा होते. याच्या बुडाशीं अशी समजूत असते कीं, वैयक्तिक व्यसनामुळें समाजाचें नुकसान होत नाहीं. म्हणूनच कायदेशीर गुन्हे आणि नैतिक गुन्हे यांमध्यें अंतर पडतें.

कित्येक वेळां असें होतें कीं, कायदा हा नीतीच्याहि पुढें असतो. म्हणजे लोक ज्या गोष्टी नीतिदृष्टया गर्ह्य ठरवीत नाहींत त्या कायदा गर्ह्य ठरवितो. उदाहरणार्थ तारा तोडणें, अज्ञानाला विद्या विकणें, सरकारी नोकरांना डाली देणें इत्यादि गोष्टी कायद्याच्या दृष्टीनें दोषयुक्त ठरविल्या असतांहि लोक तशा त्या मानीत नाहींत. अर्थात् अशा ठिकाणीं कायदा नीतीच्या पुढें गेला असेंच म्हटलें पाहिजे. कधीं कधीं तर शुद्ध नीतीच्या कल्पना ह्या सुशिक्षित अथवा पुढारलेल्या लोकांपेक्षां अशिक्षित अथवा मागसलेल्या लोकांच्याच श्रेष्ठ असतात. जगाच्या इतिहासांत अशीं अनेक उदाहरणें दिसून येतील कीं जेथें खालच्या लोकांपासूनच नैतिक शासन उत्पन्न झालें आहे.

---

# प्रकरण पांचवें

## समाजनियंत्रणाचा उगम

मागील प्रकारणांत समाजनियंत्रणाच्या दिशेचा थोडासा विचार केला. आतां या प्रकरणांत समाजनियंत्रणाचा उगम कोणत्या ठिकाणीं होतो याचा विचार करूं. महाभारतांत पुढीलप्रमाणें ही नियामक शक्ति कोठें असतें ह्याचें दिग्दर्शन केलें आहे:—

" राजदंडभयादेके पापाः पापं न कुर्वते ।
यमदंडभयादेके परलोकभयादपि ॥
परस्परभयादेके पापाः पापं न कुर्वते ।
एवं सांसिद्धिके लोके सर्वं दंडे प्रतिष्ठितम् ॥ "—शांतिपर्व

ह्या दंडाची अथवा नियंत्रणाची आवश्यकता उघडच आहे. ती ही कीं, " दुर्लभो हि शुचिर्जनः ।" म्हणजे जात्या सज्जनत्व फारच थोड्यांत ! ह्या प्रश्नाचा ऐतिहासिक व तात्त्विक दृष्टींनीं विचार केला असतां नियंत्रणाचा उद्भव प्रथमतः कुटुंबामध्यें पितृस्थानीं झालेला आढळून येतो.

मनुष्य जन्मास येतो तो अर्थात् कोणाचा तरी मुलगा असतोच; व शिवाय तो कोणाचा पुतण्या, भाचा, भाऊ इत्यादि नात्यांनीं बद्ध झालेला असतो. आईबाप लहान अर्भकाला काळजीपूर्वक लहानाचा मोठा करितात व त्याला समजूं लागल्यावर त्याजकडून त्यास प्रथमतः शिक्षण मिळूं लागतें. अर्थात् आईबापांबद्दल मुलाच्या ठिकाणीं प्रेम व पूज्यबुद्धि हीं उत्पन्न होतात. याचेंच पर्यवसान मुलाच्या अनुकरणशीलतेंत होतें. शांतिपर्वांत ( अ. २६६ ) गौतमपुत्र म्हणतो कीं, पिता जें सांगेल तोच धर्म. कारण, पित्याला पुत्रापासून कायतें प्रेम मिळतें; परंतु पुत्राला पित्यापासून सर्व कांहीं मिळतें. शरीरादि ज्या कांहीं देयवस्तु आहेत त्या सर्व एकटा पिताच देतो. यास्तव पित्याची आज्ञा पाळली पाहिजे.

बापामध्यें जर अलौकिक वैशिष्ट्य असेल तर त्याचें नियंत्रणसामर्थ्यहि अधिक असतें आणि त्याचा परिणाम मुलावर पुष्कळ अंशानें झाल्याशिवाय राहत नाहीं. मुलाच्या पुढील आयुष्यास बापाकडूनच वळण लावलें जातें. बापाच्या आचारविचारांची छाप कळत नकळत मुलावर बसून एकप्रकारचें आचाराविचार–सातत्य समाजांत राहूं शकतें. बापामध्यें कांहीं वैशिष्ट्य नसल्यास मुलाच्या मनावर जे विचार बिंबविण्याचा तो प्रयत्न करितो, ते विचार त्याचे स्वतःचे नसून परंपरागत किंवा समाजाचें

असतात. मुलाला समाजांत वागावयाचें असतें. त्यामुळें सामान्यतः समाजाचे जे विचार असतात त्यांच्याविरुद्ध विचारांची उत्पत्ति मुलाच्या ठिकाणीं होऊं दिल्यानें त्यापासून मुलाला सुख होणार नाहीं, ही जाणीव बापाला असते; म्हणून ' अस्वर्ग्यं लोकविद्विष्टं ' असा उपदेश तो मुलाला करतो. आचारांच्या संबंधानें तर असें म्हणतां येईल कीं, आपल्या दुष्ट आचारांचें अनुकरण मुलानें करूं नये असाच प्रयत्न बापाकडून केला जाईल. उपनिषदांतील गुरूंची शिकवण प्रसिद्धच आहे. तेथें गुरूंनीं शिष्याला असा उपदेश केला आहे कीं, " आमच्या ठिकाणीं जें कांहीं चांगलें असेल तेंच तूं घे; परंतु आमच्या ठिकाणीं जें तुला निंद्याचरण आढळून येईल त्याचा तूं अंगीकार करूं नकोस."* अशा रीतीनें बहुजन-समाजाचे रूढ विचार उत्तरोत्तरच्या पिढींत संक्रमित होतात आणि त्याचें कारण आपणांस सुख मिळावें हेंच विशेषेंकरून असतें.

आतां निरनिराळ्या कुटुंबांतील पितृस्थानीं असलेल्या माणसांचे कांहीं-तरी विचार सारखे असण्याचा संभव असतोच. म्हणजे एका बापाला जें वाटतें तसेंच दुसऱ्याला, तिसऱ्याला व इतरांना वाटणें स्वाभाविक आहे. या स्वाभाविकतेचें कारण परिस्थितिसाम्यांत असतें. विशिष्ट परिस्थितीपासून आपला निभाव लागावा म्हणून अनुरूप अशा आचार-विचारांची निर्मिति होते; आणि ही परिस्थिति निरनिराळ्या कुटुंबांची जवळजवळ सारखीच असल्यामुळें माणसांत आचार-विचारांचें सादृश्य आपणांस प्रतीत होतें. अशा रीतीनें कुटुंबामध्यें बापाच्या नियंत्रणाखालीं मुलगा असतांहि समाजाचें शासन त्याच्याकडून आपोआप पाळलें जातें. एवढेंच नव्हे, तर समाजांत राहणाऱ्याला जें नियंत्रण पाळावें लागतें त्याची दीक्षा त्याला कुटुंबांतच मिळते. भाऊ, बहिणी, चुलते, मामे इत्यादिकांशीं जो त्याचा संबंध येतो तोच त्याला समाजशील होण्यास भाग पाडतो.

वैयक्तिक स्वातंत्र्याचें हितावह नियंत्रण व समाजसुखाकरितां वैयक्तिक

---

*तैत्तिरीयोपनिषत् अध्याय १, अनुवाक ११

स्थळ प्रत नं. ता.

देवघेव हेंच समाजशीलतेचें प्रमुख लक्षण होय. स्त्री व पुरुष कुटुंब करून राहिल्याबरोबर त्यांच्या वैयक्तिक स्वातंत्र्याला आळा बसतो. पुरुष किंवा स्त्री आपल्या एकट्याच्याच सुखाचा जर विचार करील तर त्याचा परिणाम त्यांपैकीं कोणाच्यातरी समूळ नाशांत होईल. म्हणून स्त्री-पुरुषांपैकीं प्रत्येकाला दुसऱ्याकरितां आपलें सुख व स्वातंत्र्य नियमित करून घेणें भाग पडतें. त्याशिवाय कुटुंब म्हणून राहणें शक्यच होणार नाहीं; आणि या कारणाकरितां व्यक्तीच्या ऐवजीं कुटुंबच समाजाचा घटक बनणें अवश्य व स्वाभाविक आहे. नवराबायको एकत्र कुटुंब करून राहिलीं म्हणजे एकट्या नवऱ्याचें सुख किंवा बायकोचें सुख हेंच वागणुकीचें सूत्र ठरविल्यास नवरा बायकोचा नाश करील अथवा बायको नवऱ्याचा नाश करील. म्हणून दोघांचेंहि हित ज्यांत आहे तोच वागणुकीचा मार्ग दोघांस पत्करावा लागतो.

पुष्कळ कुटुंबांचे आचारविचार सारखे जुळले म्हणजे कुटुंबांचा समाजांत विस्तार होतो. अशा समाजालाच जाति म्हणतात. समाज म्हणजे जवळजवळ निरनिराळ्या कुटुंबांचें एक कुटुंब बनणें होय. नातेंगोतें हेंच प्रथमतः संघटनाचें कारण असे. बाहेरच्या रक्ताचीं माणसें जवळ करणें म्हणजे त्यांस भाईबंद करणें होय. ही गोष्ट इतर कुटुंबांतील स्त्री, पत्नी म्हणून आपल्या कुटुंबांत आणून सामान्यतः घडून येई. परंतु याशिवाय एकत्र देवार्चन, तसेंच सामुदायिक भोजन, दत्तकपुत्र देणें घेणें इत्यादि प्रकारांनींहि कुटुंबविस्तार सारखा होत असे.

कुटुंबामध्यें एकट्या बापाचाच अधिकार चालत असला म्हणजे त्याच्या ठिकाणीं पूज्यबुद्धि व कुटुंबांतील इतर माणसांविषयीं सहृदयता हे गुण आपोआप उत्पन्न होतात हें मागें सांगितलेंच आहे. परंतु येथें विशेष हें सांगावयाचें कीं, या गुणांपासूनच पितृपूजा उगम पावते व त्याचप्रमाणें बापलेकांमध्यें पाळले जाणारे विशिष्ट आचार निर्माण होतात. धर्मोपाध्याय म्हटला कीं, ज्याप्रमाणें त्याचा एक विशिष्ट प्रकारचा पोशाख असावा लागतो व धार्मिक मानले जाणारे आचार त्याला पाळावे लागतात, अथव

सैन्यांतील शिपाई म्हटला कीं, जिवाविषयीं बेफिकीरी हा विशेष गुण त्याच्या ठिकाणीं असावा लागतो, त्याचप्रमाणें कुटुंबाचा पिता हा एक विशिष्ट आचारांचा प्रवर्तक बनतो व त्याचें तें वळण सर्वत्र गिरविलें जाऊन समाजसुस्थितीला तें कारणीभूत होतें. निरनिराळ्या धंद्यांचे पुढारी, निरनिराळे अधिकारी, वडील माणसें, स्त्रीपुरुष हीं सर्व निरनिराळ्या आचारांचे प्रवर्तक म्हणून मानलीं जातात. उदाहरणार्थ पुरुष म्हटला म्हणजे त्याच्यामध्यें शौर्यादि गुणांची आपण अपेक्षा करितों. उलट स्त्रीच्या ठिकाणीं विनयादि गुण असले पाहिजेत असें आपण मानतों. अर्थात् सर्व स्त्रीपुरुष आपणांमध्यें हे विशिष्ट गुण असावेत म्हणून प्रयत्न करीत असतात. समाज व्यवस्थित राहण्यास निरनिराळ्या माणसांत निरनिराळे गुण असणें आवश्यक आहे व परमेश्वरानें तशी योजनाहि केल्याचें दिसतें. आपणांस ज्याप्रमाणें विशिष्ट रंग आवडतो त्याचप्रमाणें विशिष्ट गुण आपणांस प्रिय होतात. हें सर्व समाजाच्या हिताकरितां, पोषणाकरितांच होत असतें. जिवंत मनुष्यांचें अनुकरण समाज करितो इतकेंच नव्हे, तर मृत मनुष्यांचें वर्चस्वहि समाजावर कमी असतें असें नाहीं. आपल्या मृत पूर्वजांना काय आवडेल तें आपण आपल्या मनानें ठरवून तदनुसार त्यांच्या भीतीनें अथवा लोभानें आपण आपली वागणूक ठेवण्याचा प्रयत्न करीत असतों.

कौटुंबिक संबंधामुळें पित्याच्या ठिकाणीं पूज्यबुद्धि असते हें वर आलेंच आहे. परंतु याशिवाय एखादा पिता दुसऱ्यावर वचक बसविण्यासारखा जर रुबाबदार असेल तर तो आपल्या स्वतःच्या कुटुंबांतील माणसांना आपल्या म्हणण्याप्रमाणें वागावयाला लावील. इतकेंच नव्हे, तर कुटुंबाबाहेरील माणसांवरहि त्याची छाप पडून तीं त्याचा शब्द झेलण्यास उद्युक्त होतील. असे पुरुष समाजाचे स्वयंभु नेते असतात. समाजाचें पुढारीपण जन्मतःच त्यांचेकडे आलेलें असतें. पूर्वसमाजामध्यें अशा पुरुषाची दहशत वाटून लोक त्याचे आज्ञांकित बनत. दुसऱ्याला आपल्या आज्ञेंत ठेवण्याचा गुण ज्याप्रमाणें कांहीं माणसांत स्वाभाविक दिसतो, त्याचप्रमाणें दुसऱ्याच्या

आज्ञेंत राहण्याची प्रवृत्ति कांहीं माणसांत स्वाभाविक व प्रबल असते. शिवाजी व नेपोलियन यांनीं याच आपल्या अंगच्या गुणांनीं लोकसाहाय्य मिळवून अतुल पराक्रम केले. अगदीं अलीकडल्या काळीं वर सांगितलेला गुण ज्यांच्यामध्यें विशेष होता असे पुरुष फेरोजशहा मेहता हे होत. त्यांच्या ठिकाणीं अधिकार नसतांहि त्यांच्या विरुद्ध बोलण्याची धमक असणार लोक सर्व हिंदुस्थानांत त्यांच्या वेळीं क्वचितच असतील. ते म्हणतील त्याला मोठमोठीं माणसेंहि माना डोलवीत. याचें कारण आज्ञाधारकत्व हाहि एक मनुष्यामधला निसर्गदत्त गुण होय. सर्कशीच्या खेळांत या विशिष्ट गुणाचें कार्य आपल्या अनुभवास येतें. एखाद्या माणसाच्या चर्येंत किंवा नेत्रांत असें कांहीं तेज झळकत असतें कीं, त्याला सिंहासारखे क्रूर प्राणीहि सहज वश होतात. या गुणामधूनच विभूतिपूजेचा उदय झाला आहे.

प्रथमतः भीति आणि दरारा यांमुळेंच लोकांचें अनुयायित्व वरील गुणांच्या पुढाऱ्यांना मिळत असे. नेता व नीत यांमध्यें प्रेमाचा संबंध नसे. यानंतर पुढली पायरी म्हणजे ज्याचे प्रयत्न यशस्वी होत त्याच्याच निशाणाखालीं जाण्याची बुद्धि लोकांत येऊं लागली; म्हणजे यशस्वी माणसाकडे नेतृत्व येऊं लागलें. समाजाची जशी प्रगति होते त्या मानानें वरील कारणें मागें पडत जातात. भीति, दरारा इत्यादिकांच्या ठिकाणीं नैतिक गुण अधिष्ठित होतात. स्वार्थत्याग, सत्यवादित्व, औदार्य, न्यायप्रियता इत्यादि प्रकारचे गुण ज्या माणसामध्यें असतील त्याच माणसाकडे पुढारीपण येतें; आणि त्याची छाप इतरांवर बसून ते त्याचें अंकितत्व आपखुषीनें पत्करतात. म. गांधींचें उदाहरण आज सर्वांपुढें आहेच. प्राथमिक समाजांत अत्यंत प्रबल मनुष्यच लोकांचा पुढारी होई. त्यानंतर केवळ बुद्धिमत्तेच्याच जोरावर पुढारीपण लाभूं लागलें; आणि आतां बुद्धिमत्तेखेरीज वर सांगितलेल्या नैतिक गुणांचीहि आवश्यकता पुढाऱ्यामध्यें भासूं लागली आहे, ही प्रगति अभिनंदनीय होय यांत शंका नाहीं. तथापि हें विभूतिमत्व हळूहळू नष्ट होईल अशीं चिह्नें दिसत आहेत. समता, स्वातंत्र्य,

बंधुत्व हे गुण सध्या समाजापुढें ध्येय म्हणून मांडले जात आहेत. यास्तव यापुढें कोणत्याहि एका माणसाचें प्रस्थ समाजांत माजेल असें वाटत नाहीं. नवीन परिस्थितीला अनुसरून समाजनियंत्रणाच्या नवीन तऱ्हा अस्तित्वांत येत आहेत. यामुळें जुने मार्ग निरुपयोगी ठरल्यास त्यांत नवल नाहीं.

---

# प्रकरण सहावें

## समाजनियंत्रणाचें अधिष्ठान

केवळ एका कुटुंबाचा विचार करावयाचा असता तर पित्याचें नियंत्रण पुरें झालें असतें यांत शंका नाहीं. परंतु एका कुटुंबाचीं अनेक कुटुंबें होतात हें मागें सांगितलेंच आहे. अशा निरनिराळ्या कुटुंबांना लगामीं ठेवण्यास एक निराळीच सत्ता असणें आवश्यक आहे. एकानें दुसऱ्याला अपकार केला असतां त्याला शासन करणें व कोणी कोणाला कोणत्याहि प्रकारचा उपद्रव करणार नाहीं असे उपाय योजणें, हें या सत्तेचें कार्य असतें. या सत्तेचें पूर्वस्वरूप म्हणजे राजसत्ता ही होय. समाजाचा विस्तार फार झाला म्हणजे राजाच्या नुसत्या शब्दानें समाजनियंत्रणाचें कार्य होऊं शकत नाहीं, सर्व लोकांना समजतील असे सामान्य नियम ठरविणें प्राप्त होतें. याच नियमांना कायदा अथवा धर्मशास्त्र म्हणतात. हल्लीं धर्मशास्त्र आणि कायदा यांत भेद मानला जातो आणि तसा तो मानणें उचितच आहे. कायद्याचें स्वरूप अत्यंत व्यावहारिक असतें. कोणी कोणाच्या वाटेस गेला असतां त्याचें शासन करणें, त्याचप्रमाणें नैतिक बंधनें व केलेले करारमदार पाळावयास लावणें हें सामान्यतः कायद्याचें द्विविध स्वरूप होय. प्रजेची सहकारिता संपादन करणें अव्यवहार्य असल्यामुळें ती विशेषतः लोकांच्या इच्छेविरुद्ध घडवून आणणें दुस्तर आहे. तथापि कित्येक प्रसंग असे असतात कीं, तेथें सहकारिता न करणाऱ्यास शिक्षा करणें प्राप्त होतें. ज्या लोकांचे जीव आगबोटीच्या कप्तानाच्या स्वाधीन असतात त्यांनीं

समुद्रांत आगबोट संकटांत सांपडली असतां कप्तानाला मदत करण्याचें नाकारलें तर त्यांना शिक्षा करणें न्यायाचेंच ठरतें. ही थोडक्या लोकांचीच गोष्ट असल्यामुळें सहकारिता करावयास लावणें भाग पाडतां येतें; परंतु सर्व राष्ट्राला सहकारिता करावयास लावण्याची गोष्ट शक्य कोटींतील नाहीं.

कायदा हा स्पष्ट असतो तसाच तो निर्दय असतो; आणि त्याचा अमल शरीरावरच चालतो; कारण कायद्याच्या विरुद्ध वागलें असतां देहदंड सोसावा लागतो. मनुष्यांना कायद्याप्रमाणें वागावयाला लावण्याचा हाच एक उपाय आहे. बक्षिसाच्या लालुचीनें कायद्याप्रमाणें लोकांचें वर्तन राखणें शक्य असलें तरी व्यवहारामध्यें हा उपाय योजतां येणार नाहीं. शिक्षा देण्याचा दुहेरी हेतु असतोः–( १ ) माणसानें पुनः अपराध करूं नये; व ( २ ) इतरांना वचक बसावा. द्रव्यदंड, फटके, कैद व ठार मारणें हे सामान्यतः शिक्षेचे प्रकार असतात. याशिवाय गुन्हेगाराच्या मनावर संस्कार घडून त्याच्यांतील अपकारबुद्धि नष्ट व्हावी या हेतूनें शाळा काढून त्यांत गुन्हेगाराला सक्तीनें शिक्षण दिलें जातें. हा उपाय विशेषतः अज्ञान मुलांच्या बाबतींत उपयोजिला जातो. आतां गुन्हेगाराला कैद करून अटकेंत ठेवलें अगर फाशीं दिलें तर त्याच्या नियंत्रणाचा प्रश्नच उरत नाहीं. शारीरिक क्लेश देण्यानें इतरांना वचक बसेल हें खरें; तथापि हा उद्देश साधण्याकरितां म्हणून केवळ फटक्यासारखी अथवा सक्तमजुरीची शिक्षा देणें अमानुष होईल. बैलांना पराणी मारणें निर्दयतेचें लक्षण समजलें जातें व त्याबद्दल तो मनुष्य शिक्षेस पात्र होतो. असें असूनहि मनुष्याला फटके मारणें हें हल्लींचीं सुधारलेलीं सरकारें देखील बिनदिक्कत करतांना पाहून आश्चर्य वाटतें ! मनुष्यानें अपराध केला म्हणून त्याला फटके मारणें वाजवी होईल, तर बरोबर न चालणाऱ्या बैलाला पराणी मारणारा गाडीवान शिक्षेस पात्र कां व्हावा हें समजत नाहीं. तसेंच तुरुंगांत कैद्याला काम करावयास लावण्यानें दुसऱ्यावर कांहींच परिणाम होत नाहीं. त्यांत सुडाची कल्पना मात्र व्यक्त होते. परंतु व्यक्तीप्रमाणें समाजानें सूड उगवणें

ही गोष्ट कोणासच संमत होण्यासारखी नाहीं. यापेक्षां गाढवावरून धिंड काढण्याची पूर्वींची रीत फार बरी असें वाटतें. कारण, पुष्कळ गुन्हेगार तुरुंगांतील सक्तमजुरीची शिक्षा पत्करतील, परंतु हें लांछन पत्करण्यास तयार होणार नाहींत. तत्त्वरक्षणासाठीं केलेल्या कायदेभंगाच्या बाबतींत तर सक्तमजुरीची शिक्षा देणें हें अन्यायाचें व मूर्खपणाचेंच म्हटलें पाहिजे. दंडाच्या शिक्षेनें नुकसानभरपाईच्या पलीकडे कोणतेंच कार्य साधत नाहीं. "दुष्टांचा निग्रह करणें हाच शासनाचा मुख्य उद्देश आहे. द्रव्यप्राप्ति हें कांहीं त्याचें खरें स्वरूप नव्हे." हें शांतिपर्वांतील ( अ. १५२ ) वचन आजहि मनन करण्यासारखें आहे. गुन्ह्याबद्दल समाजामध्यें ज्या प्रमाणांत तिटकारा असेल त्याच प्रमाणांत शिक्षेचें प्रमाण असावें लागतें. शिक्षेची प्रसिद्धि होणें अवश्य आहे एवढेंच नव्हे, तर शिक्षा भोगलेला मनुष्य जिवंत आहे तोंपर्यंत त्याच्या शिक्षेचें स्मरण लोकांमध्यें कायम राहील असाहि कांहीं मार्ग सापडल्यास तो फारच हितावह होईल. याचा हेतु इतकाच कीं, शिक्षा झालेल्या इसमाला समाजांत कमीपणा आला पाहिजे आणि त्याचें वर्तन सर्वस्वीं सुधारेपर्यंत तो कमीपणा टिकला पाहिजे लांच. खाऊन शिक्षा झालेले सुशिक्षित अधिकारी समाजांत प्रतिष्ठितपणानें वागत असतात याचा दोष अर्थात् समाजाकडेच येतो.

पूर्वीं न्यायाधीश म्हणजे दोन पक्षकारांतील तंटा तोडणारा एक पंच मानला जाई. अर्थात् त्यावेळीं गुन्हेगारानें ज्या माणसाचें नुकसान केलें असेल त्याच्याच दृष्टीनें न्यायाधिशाला पाहावें लागे. त्यानंतर आरोपी हा एका व्यक्तीचाच गुन्हेगार नसून सर्व समाजाचा आहे अशी जाणीव उत्पन्न झाल्यावर न्यायाधिशाला सर्व समाजाच्या दृष्टीनें विचार करणें अवश्य झालें. हल्लींच्यासारखे पूर्वीं कायदे नसत त्यावेळीं वहिवाट, रूढि, लोकांची समजूत यांच्या अनुरोधानेंच गुन्ह्याचें स्वरूप ठरवावें लागे. यामुळें शिक्षेचा व समाजाचा निकट संबंध राहत असे. हल्लींमात्र हा संबंध सर्वत्र अनुभवास

येतोच असा नियम नाहीं. सारांश, कायदा हें एक समाजनियंत्रणाचें आवश्यक व प्रबल साधन आहे.

रूढीचें महत्त्व एका काळीं किती होतें याचा निर्देश वर केलाच आहे. परंतु विद्यमान काळीं या कायद्याच्या युगांतसुद्धा रूढि अजून तग धरून आहे, हें विसरतां कामा नये. या रूढीचा अमल कायद्यापेक्षांहि अधिक आहे, असें म्हणण्यांत विशेष अतिशयोक्ति होणार नाहीं. लोकांचे बहुतेक व्यवहार रूढीनें चालतात आणि रूढीला झुगारून देणें इच्छा असतांहि अशक्य होतें. यावरून रूढीमध्यें किती विलक्षण सामर्थ्य आहे याची कल्पना करतां येईल. म्हणून येथें रूढीविषयीं थोडें विवेचन करूं.

रानटी मनुष्याचीं सर्व कृत्यें मनोविकारांनीं प्रेरित झालेलीं असतात. तो जें जें कांहीं करतो तें तें आपल्या त्या वेळच्या लहरीप्रमाणें करीत असतो. त्याच्या त्या करण्यांत संगति असतेच असें नाहीं. कारण त्याच्या वर्तनाच्या बुडाशीं निश्चित असें तत्त्व नसतें. विचार करणें व कल्पना उद्भवणें हें संस्कृतीचें द्योतक होय. विवेकबुद्धि जागृत झाली म्हणजे आपण विचारानेंच कोणतेंहि कृत्य करतों; आणि विचारामध्यें मनोविकारांपेक्षां अधिक सातत्य व संबद्धता असल्यामुळें आपलें वर्तनहि एकाच प्रकारचें असतें. तेंच तेंच वर्तन आपल्या हातून होऊं लागलें म्हणजे आपणाला त्याची संवय लागते; आणि याच संवयीचें पर्यवसान अखेर रूढींत होतें.

संवयी जबरदस्त असतात; इतक्या कीं, त्या भिन्न विचारांचा प्रतिकार करून त्यांना आपल्या बालेकिल्ल्यांत तिळमात्र खिंड पाडूं देत नाहींत. भाषा, पोशाख, खेळ, शारीरिक आचार, सुखदुःखाच्या कल्पना इत्यादि सर्व जागीं त्या सारख्याच असतात. त्यांत एकदम फरक करणें एका माणसाला कठीण जातें. कायद्याप्रमाणें चालणें, वडील माणसांचें ऐकणें, स्वतःची आवडनिवड बाजूला ठेवून चारचौघांप्रमाणें वागणें हें सर्व संवयीमुळें होतें.

रूढीचा अमल इतका प्रखर असतो कीं, मनसोक्त वागणें हें व्यक्तीला शक्य होत नाहीं. जातीच्या अथवा समाजाच्या ज्या ठरलेल्या चालीरीति असतील त्यांच्याविरुद्ध वागावयास लोकांची भीति आड येते. यावरून रूढीचें नियंत्रण किती परिणामकारक असतें याची कल्पना येईल. पूर्वी जगभर सर्वत्र रूढीचाच अमल असे; पण अलीकडे मात्र लोकांना नावीन्याची हौस फार लागल्यामुळें रूढिदुर्ग अंशतः भग्न होऊं पाहत आहे. तथापि समाजाच्या प्रगतींत रूढि ही एक आवश्यक पायरी आहे यांत शंका नाहीं. रूढीमुळें समाजांत क्रांतिकारक फरक होऊं शकत नाहींत व त्याची प्रगति क्रमशः होते, हा तिचा मोठा फायदा आहे. एक रूढि गेली तरी तिची जागा दुसरी रूढि पटकावते. जुने आचारविचार परिस्थितीमुळें निरुपयोगी होऊन टाकावे लागतात; आणि त्यांच्या ठिकाणीं नवीन उत्पन्न झालेल्या परिस्थितीला अनुरूप असे आचारविचार येऊन बसतात. रूढि बदलण्याचें हें एक जबरदस्त कारण असतें. परंतु पुष्कळ वेळां केवळ अनुकरणाच्या इच्छेनें नवीन प्रघात पाडण्याकडे मनुष्याचा कल होतो. ही अनुकरणेच्छा विशेषतः परकीय राज्यकर्ते असले म्हणजे त्यांना खूष करून स्वार्थ साधण्याच्या बुद्धीनें उत्पन्न होते; आणि असलीं हीं स्वार्थनिष्ठ माणसें परकीय सत्तेनें दिलेलें शिक्षण घेऊन सुशिक्षित झाल्याकारणानें नवीन आचारांचा फैलाव होण्यास मदत होते. विवेकशक्ति जागृत असलेल्या समाजांत निरुपयोगी आचारांचा विचार होऊं लागतो; व अशा वेळीं जुनें व नवें यांच्यांत लढा उत्पन्न होतो. परंतु कित्येक वेळां एकाच काळीं निरनिराळ्या समाजांत एकाचें अनुकरण दुसरा करीत असतो. आपल्या इकडे इंग्रजांचें अनुकरण प्रथम पारश्यांनीं केलें, पारश्यांचे आचारविचार प्रभु जातीनें उचलले, असें होत होत आतां सर्व जातींत सारखेच इंग्रजी आचार झाले आहेत. सार्वजनिक लिहिणेंवाचणें, निरनिराळ्या विषयांची वाढती चर्चा आणि पित्याच्या ठिकाणीं शिक्षकाची स्थापना, या कारणांनीं जुने आचारविचार, जुन्या चालीरीति व समजुती झपाट्यानें नाहींशा झाल्या

स्थळ प्रत नं. ........

व नवीन विषयांचें साम्राज्य सर्वत्र प्रस्थापित झालेलें दिसत आहे. शिवाय याबद्दल कोणाची कुरकुर आहे असेंहि दिसत नाहीं.

युरोप खंडांत अठराव्या शतकांत विचारजागृतीमुळेंच लोकमताला प्रतिष्ठा प्राप्त झाली; व जुन्याचा उपयोग काय याची छाननी करून तें कसोटीस उतरत नाहीं असें दिसून आल्यावर तें झिडकारण्यास लोक प्रवृत्त झाले. व्यक्ति आणि समाज यांच्या द्वारा जे फेरबदल घडून येतात त्यांत भेद असा आहे कीं, व्यक्तीनें केलेल्या फरकाचा परिणाम तिलाच सोसावा लागतो. उदाहरणार्थ एखाद्या मनुष्यानें रूढ पोशाख टाकून नवीन तऱ्हेचा धारण केला तर त्या खर्चाचा बोजा त्याच्या एकट्यावरच पडतो; परंतु कायदे किंवा राज्यघटना यांत बदल झाले असतां त्याचा बोजा सर्व समाजाला सोसावा लागतो. समाजाला स्वास्थ्य व शिस्त पाहिजेत, त्याच-प्रमाणें समाज प्रगमनशील असला पाहिजे. साधारणतः अनुभव असा आहे कीं, स्वास्थ्य असलेल्या व शिस्तीच्या समाजांत प्रगति अथवा सुधारणा यांचा शिरकाव होत नाहीं. त्याजबरोबर हेंहि खरें कीं, ज्या समाजांत शिस्त नाहीं त्या समाजांत प्रगति होणार नाहीं. म्हणून आधीं शिस्त व मागून प्रगति असाच निष्कर्ष निघतो. प्रगमनशीलता पाहिजे असें म्हटलें म्हणजे प्रत्येक बाबतींत फेरबदल अथवा सुधारणा झालीच पाहिजे अथवा होणें अवश्य आहे असें नाहीं. उदाहरणार्थ उत्तम तऱ्हेची विवाहसंस्था एकदा निर्माण झाल्यावर तिच्यांत फेरबदल करण्याचें कारणच उरणार नाहीं. ज्या सुधारणा व्हावयास पाहिजेत त्या झाल्या म्हणजे आणखी फेरबदलांना वस्तुतः जागाच राहत नाहीं. परंतु प्रत्यक्ष व्यवहारामध्यें असा अनुभव येतो कीं, निरनिराळ्या अनेक कारणांनीं समाजांत स्थित्यंतरें होत असतात; आणि कितीहि उत्कृष्ट चालीरीति असल्या तरी त्या समाजाला त्या विशिष्ट परिस्थितींत हितकारक होत नाहींत. यामुळेंच समाजांत सारखे फेरबदल होत असतात.

# प्रकरण सातवें

## समाजधर्म

देवधर्मांचा हेतु देवाराधना हा असतो; आणि समाजधर्मामध्यें समाजाची सुस्थिति हेंच प्रत्येक माणसाचें ध्येय असतें. मनुष्यप्राणी सुखाकरितां जन्मास आलेला नाहीं; ऐहिक सुखाच्या मागेंच मनुष्य लागल्यास त्याचा नाश झाल्याशिवाय राहणार नाहीं. म्हणून सुख हें मनुष्यप्राण्याचें ध्येय ठरत नाहीं. आपण वंशरूपानें व समाजरूपानें निरंतर राहणें हेंच मनुष्यानें साधावयाचें आहे. समाजाव्यतिरिक्त मनुष्याचा निभाव लागणार नाहीं, हें आपण पाहिलेंच आहे. अर्थात् समाजांत राहूनच व्यक्तीनें आपली शक्य ती उन्नति करून घेतली पाहिजे. याकरितां समाजाचें चिरस्थायित्व जेणें-करून कायम राहील अशा रीतीनें वागण्याची जबाबदारी प्रत्येक माणसावर येऊन पडते; आणि ही जबाबदारी विवेकशक्तीच्या आधारावरच तो पार पाडूं शकेल. मनुष्याच्या भावना, वासना अशा पाहिजेत कीं, त्यांच्या-योगानें समाजाचें स्वास्थ्य वृद्धिंगत व्हावें. कायदा व रूढि हीं शासनाचीं बाह्य साधनें होत, तर स्वतःच्या वासना अथवा मन हें अंतर्गत साधन होय. बाह्य साधनाइतकीच आवश्यकता या अंतःस्थ साधनाची असते. एका अर्थी हें अंतःस्थ साधन बाह्य साधनाहून अधिक महत्त्वाचें व श्रेष्ठ ठरतें. कायद्याच्या व्यतिरिक्त क्षेत्रांत आपण आपले स्वतःचे शासक असतो हें तर खरेंच; पण आपल्या सुविचाराच्या योगानें कायद्याचा अमलहि सुकर होण्यास मदत होते, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. तात्पर्य, आपल्या वासना तृप्त झाल्या असतां आपल्याला किती सुख मिळतें, ही कसोटी सोडून मानववंशक्षय न होण्याला त्या वासना किती प्रमाणानें उपयोगी पडतात, याचाच मुख्यतः आपण विचार केला पाहिजे; आणि ही गोष्ट साध्य होण्यास सर्व मानवजातीची एकात्मता ह्या प्रमुख तत्त्वाची जोपासना मनुष्यामात्रानें केली पाहिजे. समानवीयत्व हें या समाजधर्मांचें आद्य

तत्त्व असून समाजांतर्गत व्यक्ति ही या धर्माची उपास्य देवता होय. अखिल मानवजातीच्या बंधुत्वाची कल्पना जेव्हां सर्व जगांत प्रस्थापित होईल तेव्हांच या समाजधर्माचें बीजारोपण झालें असें म्हणतां येईल. असंस्कृत समाजांत विश्वबंधुत्वाची कल्पना उद्भूत झालेली नसते एवढेंच नव्हे, तर दुसरा मनुष्य आपला शत्रुच आहे या भावनेनेंच तो प्रेरित झालेला असतो. आज सर्व बाजूंनीं मनुष्यजातीची प्रचंड सुधारणा झालेली दिसत असूनहि या विश्वबंधुत्वाच्या बाबतींत प्राथमिक समाजाच्या पुढें आपण फारसें गेलों आहों असें मानण्यास कांहीं कारण दिसत नाहीं. देवस्थान युधिष्ठिरास सांगतोः—" कोणाचाहि द्रोह न करणें, सत्यभाषण करणें, आपल्या संपत्तींत दुसऱ्याचाहि भाग आहे असें समजणें, दुसऱ्यालाहि आपल्या संपत्तीचा अंश देणें, दया, इंद्रियदमन, मृदुपणा, स्वस्त्रीच्या ठिकाणींच प्रजोत्पत्ति, हाच मुख्य धर्म होय " ( शांतिपर्व अ. २१ ). सामाजिक मनुष्याचें हें उत्कृष्ट वर्णन आहे.

आतां विश्वबंधुत्वाच्या कल्पनेशीं अनेक प्रचलित धर्मपंथ विसंगत असल्यामुळें अशा धर्मांचें जगांतून उच्चाटन होणें अत्यंत अगत्याचें आहे. एक मुसलमान दुसऱ्या मुसलमानाला बंधु समजत असला तरी मुसलमानेतराला तो काफीरच समजतो. त्याचप्रमाणें एक क्रिस्ती दुसऱ्या क्रिस्त्यावर प्रेम करतो, पण क्रिस्ती धर्माच्या बाहेरील माणसाचा तो दुष्टावाच करीत असतो. म्हणून या निरनिराळ्या धर्मांचें बंधुत्व मतलबाचें व दांभिक आहे असेंच म्हणावें लागतें. विश्वबंधुत्वाची कल्पना ज्या समाजाला मानवली नाहीं ते सर्व समाज नष्ट झाले; व जे हल्लीं जीव धरून आहेत तेहि पुढें नाश पावतील यांत कांहीं शंका नाहीं. समाजाव्यतिरिक्त नुसत्या व्यक्तीचा विचार केला तर सर्व जग हें माझ्याकरितां निर्माण झालें आहे व मीच या अखिल जगाचा मध्यबिंदु आहें, अशा कल्पनेनें तो भारलेला असतो; आणि हेंच तत्त्व त्याच्या वागणुकीचें बीज ठरतें. परंतु समाजांत राहणाऱ्या माणसाच्या वागणुकीचा पाया त्याच्या अगदीं विरुद्ध असतो.

मी सर्व जगाकरितां आहें, हाच त्याच्या वागणुकीचा महामंत्र असावा लागतो. पाश्चात्त्य देशांत ही कल्पना अद्यापि आचारांत उतरली नाहीं. परंतु हिंदु समाजाच्या वागणुकीचें हें तत्त्व हजारों वर्षांपूर्वीपासून ठरून गेल्यासारखें आहे. मनुष्याची सहज प्रवृत्ति अथवा स्वाभाविक वासना या स्वार्थमूलक असतात. समाजहिताला ही स्वार्थबुद्धि विघातक असते. म्हणून ती दाबून समाजहिताचा विचार करून तदनुसार आपलें वर्तन ठेवणें, हें सुधारणेचें दर्शक होय. हें कालावधीचें कार्य आहे हें उघड आहे; व हें प्रत्येकाला साध्य होणें अशक्य आहे. एवढ्याकरितां कोणत्याहि समाजांत नेहमी दोन प्रकारचे लोक असतातः ( १ ) विचारवंत, व ( २ ) त्यांच्या शासनांत राहणारे. विचार करणारे लोक कोठेंहि गेलें तरी थोडेच असतात. बहुजनसमाज शेळ्यामेंढ्यांसारखाच असतो. विचाराचें काम त्याच्याकडून होत नाहीं. संयमी, निःस्वार्थी व विचारी अशा लोकांच्या उपदेशाप्रमाणें अथवा त्यांनीं घालून दिलेल्या नियमांप्रमाणें ज्या समाजांत इतर लोक वागतात, तोच समाज शिस्तीच्या व स्वास्थ्याच्या दृष्टीनें उन्नतीला येत आहे असें मानलें पाहिजे. अशा समाजांत राहणारा मनुष्य हा नेमस्त असतो. प्रबळ मनोविकारांचा मनुष्य समाजाच्या हिताच्या आड येत असल्यामुळें समाजांत वाढण्यास योग्य परिस्थिति त्याला मिळत नाहीं व म्हणून त्याचा नाश होतो. समाजाचें ध्येय, समाजाचे विचार व समाजाची नीति, तसेंच समाजाची अपेक्षा यांना अनुरूप जो आपली वागणूक ठेवतो तोच समाजांत टिकतो.

अशा रीतीनें वागावयाचें म्हटलें म्हणजे प्रत्येक आचारासंबंधानें लोकमत काय आहे हें पाहावें लागतें. रूढीइतकेंच लोकमत प्रभावी असतें. जेथें खराखुरा समाज अस्तित्वांत असतो तेथेंच लोकमताचा विचार केला जातो. रानटी लोकांत लोकमतानुसार वागण्याची कल्पनाच उद्भूत झालेली नसते. रानटी मनुष्य आपल्या स्वतःच्या आवडीनावडीप्रमाणेंच वागत असतो. प्रगमनशील समाजांत आपणांस एखादी गोष्ट आवडली तरी ती

लोकमताच्या विरुद्ध असल्यास ती करण्याचें धाडस आपल्या हातून होत नाहीं. लोकमताविरुद्ध आपण वागलों तरी आपलें मनच आपणांस खात असतें; आणि लोकमताची तऱ्हा तरी अशी असते कीं, लोक ज्यांना चांगले म्हणतील ते चांगले व वाईट म्हणतील ते वाईट. कायदा मोडला असतां ठरलेली शिक्षा भोगावी लागते, तद्वतच लोकमताविरुद्ध वागल्यास लोक आपणांस बहिष्कार घालतात. बहिष्कार हें लोकांच्या हातांतील लोकांस ताळ्यावर आणण्याचें भयंकर शस्त्र होय. सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक इत्यादि सर्व बाबतींतच लोकमताचा अमल चालत असतो. गांधींनीं सुरू केलेल्या गेल्या कायदेभंगाच्या चळवळींत चळवळीविरुद्ध वागणाऱ्यांच्या बायकामुलांनींहि त्यास सोडल्याचीं उदाहरणें घडून आलीं आहेत. स्वराज्य आम्हांला नको असें म्हणण्यास हल्लीं कोणताहि राजनिष्ठ हिंदी गृहस्थ कचरतो याचें कारण लोकमताचा वाढता प्रभाव हेंच होय. तो मनापासून इंग्रजनिष्ठ असला तरीसुद्धा स्वराज्य नको म्हणण्याची छाती त्याच्यानें करवत नाहीं. पूर्वी समाजाविरुद्ध वागणें हा घोर गुन्हा समजला जात असे; व तें उचितहि होतें. कारण असा मनुष्य समाजाच्या चिरस्थायित्वाला अपायकारक होतो; आणि त्याला उत्तम शिक्षा म्हणजे समाजांतून काढून टाकणें हीच होय. समाजहिताविरुद्ध वागणाऱ्याचें शासन करण्यास बहिष्कारासारखा दुसरा उपायच सांपडणार नाहीं.

कायदा हा लोकमतानुसारीच असतो, म्हणजे कायद्यांत लोकमत व्यक्त झालेलें असतें. परंतु प्रत्येक लोकमत कायद्याच्या रूपानें प्रकट होऊं शकत नाहीं. कायद्यानेंच सुशील व प्रेमळ आई कशी बनेल ! बालहत्या केली असतां आईला शिक्षा होईल; परंतु मुलाची जोपासना जी काळजीनें व प्रेमानें आईच्या हातून होते, ती कांहीं कायद्यामुळें नव्हे. गरीब विधवेपासून तिच्याजवळ असलेला एकच रुपाया सक्तीनें काढून घेऊन सावकाराला कायदा देईल; तथापि लोकमताला ती गोष्ट रुचणार नाहीं. म्हणून कायद्याचें साह्य असूनहि इतकी निष्ठुरता दाखविण्यास सावकार उद्युक्त होत

नाहीं. कारण लोकांची त्याला भीति वाटते. तसेंच सद्गुणाचें अथवा सद्वर्तनाचें चीज करण्यास कायदा असमर्थ असतो. परंतु अशा प्रकारचें सामर्थ्य लोकमतांत असतें. जगामध्यें आज जें सद्वर्तन होत आहे त्यापैकीं तीन-चतुर्थांश सद्वर्तन तरी लोकमताच्या प्रभावाचाच परिणाम होय. लोक काय म्हणतील ही धास्ती सर्वांनाच असते व लोकांकडून वाहवा मिळवून घेण्याची उत्कट इच्छा प्रत्येकामध्यें वास करते.

एवढें असलें तरी लोकमताचे दोषहि ठळक आहेत. प्रथमतः लोकमत केव्हां बदलेल याचा नियम नसतो; आणि कोणत्या रीतीनें तें शासन करील याचाहि नियम सांगतां येत नाहीं. कायदा जितका निश्चित व स्पष्ट असतो तितकें लोकमत नसतें. तसेंच लोक फार विसराळू असतात;अन्यायी लोकांचें अन्याय्य वर्तन लोकांच्या स्मरणांतून अल्पकाळांत निघून जातें. अपराधी माणूस कांहीं काळ बाहेर जाऊन मग परत गांवीं आला तर त्याच्या अन्यायाचें स्मरण कोणाला क्वचितच असलेलें आढळून येतें. दुसरी गोष्ट अशी कीं, अपराधी मनुष्य श्रीमंत असेल तर त्याचे आश्रित त्याच्या पक्षास मिळतात आणि समाजांत त्यामुळें दुही उत्पन्न होते. शिवाय पुष्कळ लोकांनीं मिळून अन्याय केल्यास त्यासंबंधीं लोकमत लवकर क्षुब्ध होत नाहीं. व्यक्तीचें अन्याय्य कृत्य समाजास असह्य होतें व बहिष्कारादि सर्व शस्त्रास्त्रांनीं समाज त्या व्यक्तीचें शासन करण्यास उद्युक्त होतो. एकाच माणसानें लांच खाल्ला तर लोकांचा क्षोभ ज्या मानानें होतो, त्या मानानें लोकलबोर्ड व म्युनिसिपालिटी हीं लांच खाऊं लागलीं असतांहि होत नाहीं.

लोकमत नेहमी निर्दोषी असतेंच असा नियम नाहीं. अनेक वेळां तें अन्यायाचें, क्रूरपणाचें व अनीतिमूलक असतें. पुष्कळ समाजांत लांच खाण्याच्या कृत्याबद्दल कोणाच्याच मनांत उद्विग्नता उत्पन्न होत नाहीं. शत्रूविषयीं व परधर्मीयांविषयीं असहनशीलतेची तर अनेक ठिकाणीं प्रशंसाच केली जाते. स्वार्थपरायणता, दांभिकपणा इत्यादि दोषांबद्दल आमचा समाज

बेफिकीर असतो. त्याचप्रमाणें स्वदेशप्रेम व करारी वागणूक यांचें बीज आजकालच्या आपल्या समाजांत होत नाहीं, ही गोष्ट नेहमीच्या अनुभवाचीच आहे. म्हणून लोक सुसंस्कृत झाल्याशिवाय समाजाची शिस्त ठेवण्याच्या कामीं लोकमत निरुपयोगी ठरतें. लोकमत मनुष्याच्या वर्तनाला वळण लावतें, त्या वर्तनाची न्याय्यान्याय्यता ठरवीत नाहीं. वर्तनाला वळण लावण्याच्या कामीं मागें सांगितल्याप्रमाणें निःस्पृह असे शिष्ट लोकच उपयोगी पडतात. सुव्यवस्थित समाजांत शिष्टांचें श्रेष्ठत्व मान्य केलें जातें. लोकसत्तेच्या काळांत लोकमत अत्यंत प्रबळ असणें स्वाभाविकच आहे; आणि म्हणून वर्तमानपत्रांतील स्तुतिनिंदेचा परिणाम लोकांवर होत असतो. परंतु वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें लोकमत इष्ट मार्गानेंच व्यक्त होत असतें, असें मात्र म्हणवत नाहीं. नुसतें लोकमत हेंच जर वागणुकीचें प्रमाण ठरलें तर त्या समाजाचा विनाशकाल जवळच ठेपला असें म्हणावें लागेल. बहुजनमत हें उच्छृंखल असतें. त्याच्या मुळाशीं निःस्पृहता दिसून येत नाहीं. त्याचप्रमाणें तें विवेकप्रेरितहि नसतें.

कोणत्याहि समाजांत शिष्ट हेच वागणुकीचे नियम घालून देतात. त्यांना जरी धर्माचें अवगुंठन दिलेलें असलें तरी ते समाजाच्या हिताच्या दृष्टीनेंच योजिलेले असतात. शुक्राचार्यांनीं दारू बंद केली, मनूनें मांसाहाराला आळा घातला, शंकराचार्यांनीं अखिल मानवजाति परमार्थतः एकच आहे एवढेंच नव्हे तर ती ब्रह्मरूप आहे, असें सर्व जगास शिकवून मनुष्याच्या ठिकाणीं आत्मविश्वास व पावित्र्य हीं निर्माण केलीं. अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें देतां येतील. तात्पर्य, हे शिष्टांचे निर्बंध समाजानें आत्मसात् केले म्हणजे जें लोकमत् बनतें, तेंच खरें लोकमत होय. शिष्ट हे समाजाला हळूहळू पुढें नेत असतात. कांहीं निर्बंध समाजानें पचविले म्हणजे दुसरे अधिक वरच्या दर्जाचे निर्बंध समाजानें ग्रहण करण्याकरितां ते घालून देतात. परंतु याबरोबरच अत्युच्च ध्येय हेंहि समाजापुढें ठेवावें

लागतें. मनुष्यस्वभावांत बदल किंवा मनोविकारांचा लोप हा प्रकार फारच मंदगतीनें होत असल्यामुळें समाजांतील कांहीं थोडे लोकच शिष्टांचें ध्येय एकदम उचलूं शकतात; आणि या कारणाकरितां समाजांत निरनिराळ्या जाति उत्पन्न होतात. इतिहासपूर्व काळांतील शुक्राचार्य व मनु यांनीं मद्य व मांस यांचा निषेध केला असतां अद्यापि पुष्कळकांस या पदार्थांची चटक सुटत नाहीं हें आपण पाहतोंच. सारांश, शिष्टांच्या मताची छाप ज्या लोकमतावर असेल तेंच खरें लोकमत आणि तेंच समाजशिस्तीला कारणीभूत होतें. याच दृष्टीनें लोकमत पारखून घेतलें पाहिजे.

लोकमत म्हणजे बहुजनमत होय. म्हणून लोकमताप्रमाणें प्रत्येकाचें मत असतेंच असा नियम नसतो. याच्या उलट, लोकसमजुती ज्या असतात त्या बहुधा प्रत्येक व्यक्तीच्या असतात. यांपैकीं कांहीं समजुती तत्त्वज्ञानावर अधिष्ठित झालेल्या असल्या तरी कांहीं काल्पनिक असतात यांत शंका नाहीं. एकादशीचें उपोषण केलें असतां मनुष्याला स्वर्गप्राप्ति होते; उलट, त्या दिवशीं अन्न भक्षण केलें असतां नरकाची वाट धरण्याचा प्रसंग येतो; अशांसारख्या समजुतींना तत्त्वतः आधार नसल्यामुळें त्या भ्रामक म्हणून म्हणतां येतील. तथापि कांहीं समजुती एकाप्रकारच्या विशिष्ट तत्त्वज्ञानामुळें उद्भूत झालेल्या असतात, म्हणून त्यांचा अमल साधारणतः समाजांतील प्रत्येक व्यक्तीवर असूं शकतो. या समजुतींची इमारत धर्माच्या पायावर उभारलेली असते; आणि धर्माचा उगम देवाच्या कल्पनेंत असल्यामुळें देवाविषयीं कल्पना जसजशी बदलते तसतशा या समजुतीहि पालटत जातात. सर्वशक्तिमान् असा एक परमेश्वर आहे, असा एकदा मनुष्याचा विश्वास ठाम झाला म्हणजे तो आपल्या दुष्कर्माबद्दल ह्याच जन्मीं आपणास शासन करील असें प्रथम मनुष्याला वाटूं लागतें. ह्या भीतीनें त्याच्या समजुतीप्रमाणें जें दुष्कर्म तें करण्यापासून तो परावृत्त होतो. परंतु कांहीं कालानंतर त्यास हळूहळू असा अनुभव येऊं लागतो कीं, दुष्कर्मी लोक सुखी असतात; उलट सत्कर्मी लोकांच्याच कपाळीं हालअपेष्टा ठेविलेल्या आहेत.

या अनुभवाचा परिणाम याच जन्मीं परमेश्वर दुष्टाला शासन करतो, ही समजूत नाहींशी करण्यांत होतो. यानंतर परमेश्वर मनुष्याला मरणोत्तर त्याच्या दुष्कृत्याबद्दल शासन करतो, असें मानण्याकडे मनुष्याची प्रवृत्ति होते. परमेश्वराची कल्पना रूढ झाल्यानंतर अनाचाराची तो उपेक्षा करील असा विचार मनांत येणें शक्यच नाहीं. अशा स्थितींत स्वर्ग-नरकांच्या कल्पना अस्तित्वांत येतात. हिंदूंचा कर्मभोगाचा सिद्धांत आज जरी देवाशीं अगदीं चिकटलेला नसला, तरी कोणत्याहि कर्माचें चांगलेवाईटपणाचें फळ मिळालेंच पाहिजे, या समजुतींत कर्मभोगतत्त्वाचें बीज आहे. अनंतकालपर्यंत मनुष्य पुनःपुनः जन्म घेत असल्यामुळें त्याच्या कर्मांचें फळ त्यास केव्हां तरी मिळालेंच पाहिजे, असें हें तत्त्वज्ञान आहे. हिंदु समाजांतील या सर्वमान्य श्रद्धेमुळें बहुजनसमाज शिस्तीच्या मर्यादेंत राहत असतो.

मेलेले पितर स्वर्गांतून आपलें कृत्य पाहत असतात, ही एक पुष्कळ समाजांत सर्वमान्य झालेली समजूत आहे. आपल्या निंद्य कर्मांच्या योगानें पितरांना दुःख व त्रास हीं होतात, असा चिनी व जपानी लोकांचा दृढ विश्वास आहे हें सर्वश्रुतच आहे. पितृधर्माचा उगम याच कल्पनेंत आहे. ईश्वराच्या सामर्थ्याची भीति लोकांना वाटत असते तोंपर्यंत यज्ञयाग, पूजा-अर्चा इत्यादि कृत्यांनीं त्याला संतुष्ट करण्याचा प्रयत्न मनुष्य करीत असतो. परंतु परमेश्वर न्यायी आहे, या समजुतीवर मनुष्याचा अधिक विश्वास बसूं लागला म्हणजे केवळ पूजेअर्चेनें परमेश्वर संतुष्ट होणार नाहीं, तर तो आपल्या सत्कृत्यांनींच संतुष्ट होईल ह्या कल्पनेचा अमल सुरू होतो. हा समज म्हणजे मनुष्याच्या प्रगतीची पुढची पायरी होय; आणि म्हणून समाज-स्वास्थ्याच्या कामीं या समजुतीचा फार उपयोग होतो. कायदा व लोकमत यांचा अमल प्रत्यक्ष घडलेल्या कृत्यावर चालतो; या दोहोंपैकीं एकहि मनाची वृत्ति बदलूं शकत नाहीं. म्हणून कर्माचा उगम ज्यांत आहे असें जें मन त्या मनावर वरीलसारख्या सर्वमान्य लौकिक समजुतींच्या योगानें संस्कार घडत असतो; आणि यांतच या समजुतीचें महत्त्व फार आहे, असें

समाजशास्त्रज्ञांना वाटत असतें.

देव हा पवित्र असून अमंगळ असें त्याला कांहीं खपत नाहीं, अशा समजुतीनेंसुद्धा पुष्कळ माणसांना निष्पाप ठेविलें आहे. कित्येक सदाचारांची उत्पत्ति या श्रद्धेंत असल्याचें ऐतिहासिक पुराव्यावरून दाखवितां येण्यासारखें आहे. देव सर्वत्र आहेच, तथापि ज्या ठिकाणीं त्याचें विशिष्ट अधिष्ठान असेल त्या ठिकाणीं तरी दुराचरण करूं नये, अशी वृत्ति माणसाची बनू लागते. या दोन्ही प्रकारचीं उदाहरणें आपणांस देतां येतील. यज्ञाची दीक्षा घेतल्यानंतर मांससेवन अथवा सुरापान करूं नये असा निर्बंध शास्त्रकारांनीं घातला, हें सूत्रग्रंथांवरून उघड दिसून येतें. हिंदु समाजापैकीं ब्राह्मणसमाज मांसनिवृत्त झाला याचें कारण वरील गोष्टींत सांपडण्यासारखें आहे. क्षेत्राच्या ठिकाणीं आपल्या हातून दुष्कर्म घडूं नये अशाविषयीं मनुष्य अधिक दक्षता बाळगतो. तसेंच देवालयाच्या आवाराच्या बाहेर जितकें दुष्कर्म घडतें तितकें खुद्द देवालयांत अथवा देवालयाच्या आवारांत घडत नाहीं, ही सामान्यतः आपल्या अनुभवाची गोष्ट आहेच. क्वचित् आपल्या हातून दुष्कर्म घडल्यास परमेश्वर त्यास शासन करीपर्यंतहि मनुष्य वाट बघत नाहीं. देवापर्यंत जाण्याच्या पूर्वीच प्रायश्चित्त-रूपानें तो स्वतःस आपल्या दुष्कर्माबद्दल शासन करून घेतो. प्रायश्चित्त घेणें म्हणजे आपला अपराध उघड रीतीनें कबूल करणें होय. प्रायश्चित्ताच्या योगानें ह्याच जन्मीं आणि तेंहि तात्काल आपल्या पापाचें निरसन झालें अशी मनुष्याची समजूत असते. उपोषणें, व्रतें, यात्रा इत्यादि प्रकार पुष्कळ वेळां पुण्यसंपादनाच्या ऐवजीं पापनिरसनार्थच करण्यांत येतात. या सर्व गोष्टींच्या पाठीमागें देवविषयक कल्पना असतात. म्हणून या गोष्टींचा उपहास न करतां त्यांपासून समाजाचें हित किती झालें आहे हेंच विचारांत घेतलें पाहिजे.

# प्रकरण आठवें

## समाजनियंत्रणाचे मार्ग

### शिक्षण

सर्व संस्कृतीचा पाया विवेक हाच असल्यामुळें प्रत्येकाची विचारशक्ति विकासित होईल असा उपाय योजणें भाग आहे. हें कार्य शिक्षणानें साधतां येईल. म्हणून आतां शिक्षणाचा विचार करूं. शिक्षक म्हणजे शिकविणारा असा अर्थ होत असला, तरी शिक्षक म्हणजे शिकणें असाच अर्थ होतो. याचें कारण 'शिक्ष्' या धातूचें शिकणें व शिकाविणें असे दोन्ही अर्थ आहेत. परंतु ही गोष्ट ध्यानांत न आल्यामुळें शिक्षणाच्या उद्देशावर विपर्यस्त कल्पना अनेकप्रसंगीं व्यक्त केल्या जातात. म्हणून शिक्षण हा शब्द टाकून ज्ञानार्जन याच शब्दाचा उपयोग केला असतां या विपरीत कल्पना नाहींशा होण्याचा बराच संभव आहे. समाजांतील प्रत्येक व्यक्ति समाजाला उपयुक्त व्हावी या उद्देशानें, प्रत्येक व्यक्तीचें बौद्धिक व नैतिक सामर्थ्य जितकें पूर्णतेला नेतां येईल तितकें तें नेलें गेलें आहे, अशाबद्दल समाजानें दक्षता बाळगिली पाहिजे. निरनिराळ्या हेतूनें शिक्षणनौकेची नाळ निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या दिशेनें वळल्याचें आपणांस इतिहासावरून दिसून येतें. धर्मगुरूंच्या वर्चस्वाच्या काळांत धर्मशिक्षणाकडेच एकंदर भर असे. राजसत्ता प्रबल होती तेव्हां सर्व प्रजा राजनिष्ठ करण्याकडेच शिक्षणाचा ओघ वाहत असे. प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या कालांत याच्या अगदीं उलट प्रकार घडून येतो. राजाची भीति कोणालाच राहत नाहीं. इंग्लंडचा मुख्य प्रधान किंवा भारतमंत्री हे जेव्हां हिंदुस्थानांतील दडपशाहीस संमति देतात, तेव्हां त्याबद्दल राजेसाहेबांस काय वाटेल अथवा ते काय म्हणतील याबद्दल यत्किंचितहि पर्वा ते करीत नाहींत. वस्तुतः समाज-हिताच्या दृष्टीनें शिक्षण दिलें गेलें पाहिजे; परंतु इकडे कोणाचें लक्ष नसतें.

सर्व शिक्षण शाळाकॉलेजांतून मिळतें अथवा मिळणें शक्य आहे, ह्यासारखी मूर्खपणाची दुसरी कोणतीहि कल्पना असणार नाहीं. निरनिराळ्या माणसांची बुद्धि निरनिराळ्या विषयांत चालते ही गोष्ट ध्यानांत घेतल्यावर, तसेंच परिश्रमाशिवाय बुद्धीचें आपोआप विकसन होत नाहीं हा सिद्धांत मान्य केल्यावर, मनुष्याच्या बुद्धीचा त्याच्या स्वाभाविक मर्यादेपर्यंत विकास करणें व ज्या विषयांत त्याची विशेष गति आहे त्या विषयासंबंधानें पूर्ण ज्ञान संपादन करण्यास त्यास साधनें उपलब्ध करून ठेवणें, हें समाजाचें आद्य कर्तव्य आहे. परंतु एवढ्यानें काम भागेल असें मात्र नाहीं. निरनिराळ्या काळीं निरनिराळ्या गुणांची आवश्यकता समाजाला भासत असते. म्हणून अशा प्रकारचे गुण प्रत्येक व्यक्तीमध्यें उद्भूत होतील अशा प्रकारचें वळण बालपणापासून त्या व्यक्तीला लावणें या गोष्टीकडेहि समाजानें दुर्लक्ष करतां कामा नये. नाहींतर माणसें शिक्षित होऊनहि समाजाचा विशिष्ट हेतु सिद्धीस नेण्याच्या कामीं त्यांचा कांहींएक उपयोग होणार नाहीं. याच कारणास्तव शिक्षण हें समाजानें आपल्याच हातीं घेतलें पाहिजे. परिणत बुद्धि, सुसंस्कृत मन, आणि समाजाला उपयुक्त होण्याचें ज्ञान व वळण हीं शिक्षणाची प्रमुख अंगें होत. सामाजिक मनुष्यामध्यें अहंपणा यत्किंचित्‌हि असून उपयोगी नाहीं. वस्तुतः पाहतां अहंपणाला जागाहि नाहीं. आपण जें कांहीं करतों त्याचा परिणाम सर्व समाजावर कमीजास्त प्रमाणानें होत असतो. म्हणून समाजांत घडून येणाऱ्या कार्यजाताला वैयक्तिक कारणें नसून सामाजिक असतात. उदा० एखादा मनुष्य शिकून विद्वान् झाला व त्यानें पुष्कळ पैसा मिळविला तर त्याचें श्रेय सर्वस्वीं त्यालाच घेतां येईल काय ! त्याच्या शिक्षणाची काळजी आईबापांनीं घेतली, समाजानें घेतली, हें नाकबूल कसें करतां येईल ! तसेंच समाजांत शांतता नांदत होती म्हणून त्यास विद्या संपादन करतां आली. एवढ्यासाठीं शांततेची परिस्थिति ज्यांनीं निर्माण केली त्यांच्याकडेहि वरील श्रेयाचा वांटा जाणें अवश्य आहे. बुद्धि तर परमेश्वरच देतो. एवढ्या सगळ्या भानगडींत यशाचें प्रमाण स्वतःकडे

स्थळ प्रत
सं. नं. ६३

फारच अल्प असल्याचें एखाद्या गणितज्ञानें सांगितलें तर त्यांत आश्चर्य नाहीं. बरेंच मोठें श्रेय समाजाकडे जातें. अशा प्रकारची शिकवणूक समाजांत राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मिळाली पाहिजे. आमचें पूर्वीचें शिक्षण असल्याप्रकारचें होतें, म्हणून आमचा समाज आजपर्यंत टिकाव धरून राहिला आहे.

## सदाचार

शिक्षणाच्या योगानें मनुष्याला विचार करण्याची संवय लागते. विचाराचें महत्त्व असें असतें कीं, मनुष्यमात्राची कोणतीहि क्रिया विचार-प्रेरित असली तरच ती समाजाला हितावह होते. केवळ मनोविकारांनीं प्रेरित होऊन मनुष्य जेव्हां कोणतेंहि कृत्य करितो, तेव्हां तो त्याच्या चांगलेवाईटपणाबद्दल विचारच करीत नाहीं. कोणत्याहि कर्माची किंमत, योग्यता अथवा उपयुक्तता ठरविण्याच्या भानगडींत विकारी मनुष्य पडत नाहीं. विवेकी मनुष्य आणि विकारी मनुष्य यांच्यांत फारच मोठा फरक असतो. विकारी माणसाच्या क्रियेंत कार्यकारणभावाचा अभाव असतो– उलट, विवेकी माणसाची क्रिया कारणनिष्ठ असल्यामुळें ती परिस्थितीला अनुरूप अशी असते. प्रत्येक क्रियेचा परिणाम इतरांवर घडत असल्यामुळें त्या क्रियेचा बरेवाईटपणा अथवा तिची उपयुक्तता किंवा आवश्यकता यांचा सूक्ष्म विचार करावा लागतो. पण मनोविकारांनीं पछाडलेला माणूस कोणताहि विचार न करितां एकदम क्रिया करीत असल्यामुळें ती समाजाला हितकर होईलच असा नियम नाहीं. अर्थात् सर्व क्रियांचा उगम मनोविकारांच्या ऐवजीं विवेकांत पाहिजे हें उघड आहे. एवढ्याचसाठीं मनोविकार स्वाधीन ठेवण्याविषयीं साधुसंत उपदेश करीत असतात. मनोविकारांचें प्राबल्य असतें तेव्हां मनुष्य आपल्या विवेकबुद्धीला पटेल तेंच करितो. दुसऱ्याच्या कामांत न्यायाधीश तटस्थ राहून योग्य तो निर्णय देऊं शकतो. परंतु तोच न्यायाधीश आपल्या स्वतःच्या कामांत विवेकशक्तीला क्षणभर बाजूस ठेवून

आपल्यावर मनोविकारांचें वर्चस्व होऊं देतो. म्हणून मनोविकारांचा पगडा कमी होऊन विचाराचें साम्राज्य जेथें प्रस्थापित होईल अशाच ठिकाणीं कोणत्याहि समाजाचें पाऊल पुढें पडूं शकतें. भूक, तहान, विषयसुख इत्यादि नैसर्गिक वासना व मनोविकार मनुष्य आणि मनुष्येतर प्राणी या सर्वांत सारखेच असतात. सर्व प्राण्यांमध्यें या उपाधि जन्मतःच रुजलेल्या असल्यामुळें त्यांचें प्रमाणहि सारखेंच असण्याचा संभव आहे. परंतु मनुष्यांत जिज्ञासा, खेळाडूपणा व सोबतीची गरज हे गुण मनुष्येतर प्राण्यांहून अधिक असतात. अगदीं रानटी मनुष्य असला तरीहि तो गायनलुब्ध असून खेळाडू स्वभावाचा आढळतो. जिज्ञासा हा गुण जर माणसांत नसता तर मानवजातीची प्रगतिच खुंटली असती. ह्या जिज्ञासेमुळें व सहवासामुळें ज्ञानाचा प्रादुर्भाव होऊन बरेंवाईट, हिताहित यांतील भेद तो ओळखावयास शिकतो. अशा रीतीनें नैसर्गिक मनोविकारांचें योग्य प्रमाणांत नियंत्रण करून विवेकशक्तीचा अधिकार तो मान्य करितो. मनोविकारांचें विकसन करण्याची खटपट कोणी करीत नाहीं व करावी लागत नाहीं. उलट जन्मागत मनोविकार स्वाधीन ठेवण्याचा प्रयत्न करावा लागतो. कांचन व कामिनी यांच्यावर पाणी सोडण्यास मनुष्य उद्युक्त होतो, याचें कारण शोधिलें असतां तें त्याच्या जिज्ञासेंत व तिजपासून उत्पन्न झालेल्या सदाचारप्रवणतेंत असल्याचें दिसून येईल. आतां जिज्ञासेचा उगम सहवासांत असल्याचें दिसून येतें. सहवासानें मनुष्यांत निराळ्याच वृत्ति उत्पन्न होतात. त्याच्या स्वार्थी वृत्ति नष्ट होतात. कारण त्या समाजशीलतेला विरुद्ध असतात. चार माणसें एके ठिकाणीं जमलीं म्हणजे प्रत्येक माणसाला ज्यामध्यें सगळ्यांचें मन वेधेल, ज्या चौघांच्या हिताला पोषक होतील अशा गोष्टीच बोलाव्या लागतात. अशा वेळीं वैयक्तिक गोष्टी पुढें आणतांच येत नाहींत. अनियंत्रित मनोविकार हे वैयक्तिक असल्यामुळें खऱ्या समाजांत विकारवशतेच्या ऐवजीं विवेकशीलताच अधिक प्रमाणांत असल्याचें अनुभवास आलें पाहिजे. पाश्चात्यांची

' क्लब ' ही संस्था या दृष्टीनें फारच उपयुक्त आहे, असें म्हणावें लागतें. मनुष्याकडून जें जें कर्म केलें जातें तें संस्थेचें किंवा संघाचें असावयास पाहिजे. संस्थेच्या कृत्यांत वैयक्तिक मनोविकार हिडीस स्वरूपांत आढळ-ण्याचा संभव फारच कमी असतो. म्हणून मनुष्यानें कोणतेंहि कृत्य करणें तें मी समाजापैकीं एक आहें, समाजाचा प्रतिनिधि आहें अशा जाणिवेनें केलें पाहिजे. असें झालें असतां स्वहिताच्या ऐवजीं समाजहित, समाजाचें ध्येय हेंच आपल्या आचाराचें अथवा वागणुकीचें कारण होतें. स्वतःच्या महत्त्वाची आकांक्षा धरून कर्म करणारा मनुष्य समाजांत टिकत नाहीं. सर्व लोक त्याचा दुष्टावा करतील व हा आपणांमध्यें नको अशीच इच्छा बाळगतील. या कारणास्तव हाव, लोभ, मत्सर इत्यादि दुर्गुण सोडणें प्राप्त होतें. सारांश, मनोविकार उच्छृंखल ठेविल्यास समाजाचें अस्तित्वच लोप पावण्याचा संभव फार; मग समाजाच्या प्रगतीची गोष्टच बोलावयास नको. एवढ्याचसाठीं केवल मनोविकारजन्य कृत्यांना समाज कमी लेखतो. याच्या उलट विवेकप्रेरित कृत्यांना समाजधुरीणांकडून फार महत्त्व दिलें जातें. हरिदास व पुराणिक विषयाची नेहमी निंदा करीत असतात याचें कारण हेंच. खेळ, संभाषण, गप्पा यांसारखे जे निरुपद्रवी, परंतु थोडेसे हितावह आचार असतील त्यांस उत्तेजन कां दिलें जातें हें आतां कोणा-च्याहि सहज ध्यानांत येईल. कलाकौशल्याचीं कामें याच सदरांत घालतां येतील. असल्या आचारांना हिंदुधर्मशास्त्रकार सदाचार ही संज्ञा देतात. अमुक आचार सदाचार व अमुक दुराचार असें निश्चित झाल्यावर दुरा-चारांबद्दल लोकांना कमीपणा वाटतो आणि सदाचाराची उठावणी होते. लोकांत मान्यता मिळावी म्हणून मनुष्य सदाचारी होण्याचा प्रयत्न करतो; आणि बाह्यतः तरी दुराचाराबद्दल तिटकारा व्यक्त करतो. अशा रीतीनें आचारांना लोकमान्यता येऊन समाजनियंत्रणाचें कार्य साधतें. सदाचार ठरविण्याचें काम समाजांतील निःस्पृह, विद्वान् व शिष्ट अशा लोकां-

कडून होत असतें. समाजाचें ध्येय उच्चतर करणें, नैतिक मानिल्या जाणाऱ्या आचारांना अनैतिकत्वाचा छाप मारून समाजाच्या नैतिक कल्पना अधिक शुद्ध करणें, या गोष्टी समाजनेते घडवून आणीत असतात. पूर्वी शिष्टांबद्दल आदरबुद्धि असल्यामुळें बाकीच्या लोकांकडून त्यांचें अनुकरण केलें जाई. वरचे विचार खालीं येण्यास अनुकरणबुद्धीशिवाय दुसरें कांहीं साधन नव्हतें. परंतु समतेच्या भ्रामक कल्पनेनें ही अनुकरणबुद्धि आतां नष्ट झाली आहे. यास्तव विचारी लोकांचें विचार खालच्या लोकांनीं स्वीकारावे म्हणून मुद्दाम प्रयत्न करावे लागतात. आपलीं मतें लोकांना पटवून दिल्याखेरीज लोक त्यांचें ग्रहण करण्यास तयार होत नाहींत. जनसमूहाच्या बुद्धीवर लेखनव्याख्यानद्वारें संस्कार करून आपले विचार त्यांच्या ठिकाणीं उतरविण्याचा कसून प्रयत्न करण्याची प्रथा आधुनिक काळीं पडली आहे. सर्वांची बुद्धि सारखी नसल्यामुळें या मतप्रसाराच्या कामांत एक मोठें विघ्न येतें, हें अद्यापि लोकांच्या लक्षांत यावें तसें आलें नाहीं.

समाजांतील बुद्धिमान् माणसें नवीन सुखकल्पना व गरजा उत्पन्न करतात. त्यामुळें समाजाची शांतता बिघडून, समाजांत सारखी खळबळ चाललेली असते. लोकांच्या गरजा वाढल्या असतां समाजांत शांतता नांदेलच अशी खात्री नसते. विकासवादाचें तत्त्व मनुष्यवासनेलाहि लागू पडतें. मनुष्याच्या वासना जर क्षुद्र किंवा कमीपणा आणणाऱ्या असतील, तर त्या घालवून त्यांच्या ठिकाणीं अधिक उदात्त वासना प्रस्थापित करण्यानेंच समाजाला सुख होतें. भरमसाट गरजा वाढविल्या तर समाज सुखी होईल कीं नाहीं याची शंकाच आहे; उलट कष्टी होण्याचाच संभव अधिक.

हिंदु समाज आजपर्यंत टिकला याचें कारण या समाजांतील लोकांचें वागणुकीचें तत्त्व वैयक्तिक महत्त्वाकांक्षा नसून समाजाची महत्त्वाकांक्षा हें होय. हें तत्त्व हिंदु समाजानें धिःकारून दिल्यास त्या समाजाचा नाश झाल्याशिवाय राहणार नाहीं. हिंदूंसारखीच चिनी लोकांची स्थिति आहे. उदाहरणानें ही गोष्ट मनावर चांगली बिंबेल. इ. स. पूर्वी ५५६ व्या

सालीं राज्यासनावर असलेल्या चिनी बादशहाच्या मनांत आपल्या एका अनभिषिक्त राणीच्या पुत्राला आपल्या मागून गादीवर बसविण्याचा विचार होता. परंतु बादशहाच्या ह्या विचाराला खुद्द राणीनेंच, म्हणजे मुलाच्या आईनेंच हरकत घेतली. ती म्हणाली, माझा "मुलगा गादीवर बसविल्यानें माझ्यावर तुमचें असलेलें प्रेम पाहून मला संतोष होईल. परंतु तसें करणें कायद्याच्या विरुद्ध होईल. तुम्ही राजा म्हणून वर्तन करा; पिता म्हणून वागूं नका." येथें ह्या चिनी राणीनें स्वतःची महत्त्वाकांक्षा लाथाडून राष्ट्रानें –समाजानें घालून दिलेल्या नियमानुसार वागण्याची तत्परता दाखविली ह्यामुळें समाजावर ओढवणारी आपत्ति टाळली गेली. ह्या राणीचा मुलगा गादीवर बसता तर हक्कदार राजपुत्रानें आपणांस गादी मिळावी म्हणून युद्धास सुरुवात केली असती; व अशा रीतीनें सर्व राष्ट्रावर संकट आलें असतें.

अशा प्रकारच्या उदात्त विचारांचा परिपोष ललितकलांकडून केला जातो, म्हणून ललितकलांचाहि समाजनियंत्रणाच्या बाबतींत चांगलाच उपयोग होतो. ललितकलाविशारद हे समाजाच्या दृष्टीनें जेवढें चांगलें असेल तेवढें सुंदर रीतीनें रंगवितात; आणि जेवढें वाईट असेल, त्याचें विद्रूप वर्णन करितात. राक्षसांच्या वर्णनावरून व विष्णूच्या चरित्रावरून हा सिद्धांत दृढच होतो. युद्धांत लढतां लढतां मरण आलें असतां स्वर्गप्राप्ति होते, या कवि-कल्पनेनें असंख्य लोकांनीं आजपर्यंत आपल्या प्राणांच्या आहुति धारातीर्थी दिल्या आहेत आणि त्यामुळें समाजरक्षण झालें आहे. स्फूर्तिकारक लेख, चित्रें व काव्य यांच्या योगानें लोकोत्तर गुणांचीं माणसें पैदा झालीं, ही गोष्ट इतिहासज्ञांस सांगावयास नको. महाभारतानें शिवाजी निर्माण केला; वीर-रसानें ओथंबलेल्या पोवाड्यांनीं कोणाच्या मनांत राष्ट्रीय वृत्ति उचंबळून आल्याशिवाय राहणार नाहीं बरें ! कुशल लेखक वाचकांत दुसऱ्याबद्दल सहानुभूति उत्पन्न करितो. पूर्वानुभव नसला तर आपणांस दुसऱ्याच्या संकटाची जाणीव होत नाहीं. परंतु ही जाणीव वाकबगार लेखक अथवा चित्रकार आपणांस करून देतात. एकाचें दुःख तें दुसऱ्याचें, अशी भावना

जागृत केल्याशिवाय लोकसत्ताक राज्यपद्धति यशस्वी होणार नाहीं. अशा प्रकारची सहानुभूति उत्पन्न करण्याची कामगिरी राष्ट्रीय वाङ्मय करीत असतें. एकत्र राहणाऱ्या माणसांना परस्परांच्या संकटांची कल्पनाच करतां आली नाहीं तर त्यांचा समाज बनणें शक्य नाहीं. ती सहानुभूतीची ज्योत राष्ट्रांतील वृत्तपत्रें सतत पेटविलेली ठेवूं शकतात. समाजाचें ध्येय व्यक्तीपुढें ठेवून त्या ध्येयप्राप्तीकरितां, म्हणजे समाजाकरितां व्यक्तीला मरावयास उद्युक्त करणें हें काम प्रतिभासंपन्न व भावनामय ग्रंथकार सहज करूं शकतात. व्यक्ति नश्वर आहे, परंतु समाज शाश्वत आहे; म्हणून नश्वराची पर्वा न करतां शाश्वताच्या पाठीमागें लागणें योग्य होय, अशी विचारसरणि या उपदेशाच्या बुडाशीं असते. सारांश, समाजनियंत्रणाच्या कामीं ललितकलांचा विसर आपणांस पडतां कामा नये.

## नीतितत्त्वांची जोपासना

आपल्या लहरीप्रमाणें न वागतां समाजानें प्रशस्त मानिलेल्या नियमांनुसार वागण्यांत नीतिमत्ता प्रतीत होते. पूर्वीं अनेक वेळां सांगितल्याप्रमाणें मनुष्य आणि समाज यांच्या आवडीनावडी ह्या पुष्कळ वेळां परस्परविरुद्ध असतात. व्यक्तिप्राबल्य म्हणजे मनोविकारांचें प्राबल्य होय. मनोविकारांवर नीतिमत्ता कधींहि अधिष्ठित होत नाहीं. उलट, समाजानें घालून दिलेले नियम म्हणजेच धर्म होय. या धर्मरूपी पायावर नीतिशास्त्राची इमारत उभारण्यांत येते.

व्यक्तीला सर्व सत्ता आपल्या एकट्याच्या हातीं असावी असें वाटतें, तर समाजाला समता आवडते. व्यक्ति कलहप्रिय असते, तर समाज शांततेचा भाट बनतो. व्यक्तीच्या ठिकाणीं विषयलोलुपता असते, तर समाज तपाचा पुरस्कार करतो. अशा रीतीनें नीतिकल्पनांचें मूळ समाजाच्या वासनांत आढळतें. अर्थात् समाज आपली नीति व्यक्तीवर लादण्याचा प्रयत्न करीत असतो. हें कार्य धर्मग्रंथांच्या द्वारें बऱ्याच अंशानें केलें जातें. अशा तत्त्वांचा

धर्मांत समावेश झाल्या कारणानें त्यांचा प्रसार सर्व समाजांत हळूहळू होत जातो. यामुळें सर्व समाजाला एकप्रकारचें शिस्तीचें व शांततेचें वळण लागतें. सेनापति, गलबतावरील तांडेल, कारखान्याचा प्रमुख, व प्रांताधिकारी यांचें यश तर शिस्तीवरच अवलंबून असतें. यामुळेंहि पुष्कळ लोकांना शिस्तीची सवय लागते. शिस्त म्हणजेच घालून दिलेल्या नियमांप्रमाणें वागणें. ठरीव नियमांप्रमाणें जो तो वागला म्हणजे समाजांत शांतता नांदते. जमीनदार, व्यापारी, कारखानदार यांचें जीवितच शांततेवर अवलंबून असतें. याकरितांच समाज हा शांतताप्रिय होतो. क्रांति–मग ती राजकीय असो, सामाजिक असो किंवा धार्मिक असो–तिच्या योगानें समाजसागर खवळून जातो. म्हणून कोणताहि समाज स्वभावतः क्रान्तीच्या विरुद्ध असतो. क्रान्तिकारक गोष्टी करण्याकडे समाजाचा कल झुकत असलेला दिसला म्हणजे कांहीं तरी बिघडलें आहे असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.

शांतता हें शिस्तीचें कार्य आहे; आणि समाजानें घातलेल्या नियमांनींच शिस्त राहते हें आपण पाहिलेंच आहे. आत्मसंरक्षणार्थ समाज नियम करतो. आतां समाजाला नियम करतां येतात, तसे ते बदलतांहि येतात. नियम बदलण्याचें काम समाजांतील विवेकी लोक करतात. या लोकांची मतें समाज हळूहळू ग्रहण करतो. हीं तत्त्वें सर्व समाजांत रुळलीं म्हणजे त्यांतून अधिक विचारी लोक निर्माण होतात. ते पूर्वींच्याहून आधिक श्रेष्ठ प्रकारचीं मतें प्रतिपादन करतात. तींहि समाज पचवूं लागतो. अशा रीतीनें समाजाची नैतिक प्रगति सारखी होत असते. समाजाला झेपतील अशीच धर्माचीं किंवा नीतीचीं तत्त्वें समाजापुढें ठेवावीं लागतात. ज्यांना नीतीची कल्पनाच नाहीं त्यांना अत्युच्च नीतितत्त्वांचा भार सहन करवणार नाहीं. समाज आणि समाजनेते यांत जर महदंतर असेल तर अशा नेत्यांचा समाजाला मुळींच उपयोग होणार नाहीं. तथापि उच्च ध्येय समाजापुढें ठेवून समाजाला झेपेल असेंच आचरण योग्य म्हणून ठरविण्याचें प्रसंग

वारंवार येतात; आणि येथेंच शास्त्र आणि रूढि यांचें मार्ग भिन्न भिन्न होतात. एकदा बांधलेली विवाहग्रंथि सोडूं नये असें शास्त्रकार सांगतात, तर इकडे सोडचिठ्ठीची वहिवाट समाजांत मान्य झालेली असते. म्हणून कोणत्याहि जिवंत समाजांत शास्त्र आणि रूढि यांत फरक पडणें अपरिहार्य होतें. समाजाचें ध्येयच जेव्हां बदलतें तेव्हां विलक्षण देखावा दृष्टीस पडतो. नवीन ध्येय आचरणीय मानिलें जाऊन जुन्या ध्येयाला केवळ शाब्दिक पूज्यता प्राप्त होते. वैदिक कालीं ऐहिक उत्कर्ष हेंच समाजाचें ध्येय होतें. पुढें उपनिषदांतील वेदान्तानें या ध्येयाचें उच्चाटन केलें. अर्थात् ऐहिक सुखाकरितां केले जाणारे यज्ञयाग बंद पडले. आजचा हिंदु समाज वेदांना केवळ शाब्दिक मान देत आहे. प्रत्यक्ष आपलें आचरण उपनिषदांतील तत्त्वज्ञानाला अनुसरून असावें अशासाठीं त्याचा जीव तळमळत असतो. इंग्लंडच्या राजाप्रमाणें अशा ध्येयांची स्थिति होते. इंग्लंडच्या राजाला सर्व प्रकारचे मान मिळतात; परंतु त्याच्या ठिकाणीं कर्तृत्व ठेवलेलें नाहीं. त्याचप्रमाणें वेदाचें हिंदु समाजावर साम्राज्य असलें, तरी प्रत्यक्ष अमल उपनिषदांचा आहे.

मनुष्याची उन्नति नेहमी नैतिक स्वरूपाची असते; आणि नीतीचा उगम समाजनियमनांत सांपडतो. याचा उल्लेख वर आलाच आहे. यावरून एका दृष्टीनें असेंहि म्हणतां येण्यासारखें आहे कीं, मनुष्याची उन्नति तो स्वतः करीत नसून समाजच तिला कारणीभूत होतो. कारण समाजांत वागावयाचें म्हणजे त्याला लोकमताप्रमाणेंच वागावें लागतें. त्याचें व्यक्तित्व त्याला बाजूस ठेवणें भाग पडतें. दोन माणसांचा नुसता संभाषण-प्रसंग आला असतां उभयतांनाहि थोडें आत्मसंयमन करणें भाग पडतें. दुसऱ्याचें मन दुखविलें जाणार नाहीं अशी उभयतांस खबरदारी घ्यावी लागते. भारदस्तपणा बाळगावा लागतो. तशीच जबाबदारीची जाणीव उत्पन्न होते. दुसऱ्याच्या संबंधानें जी गोष्ट आपणांस पुराव्यानिशीं सिद्ध करतां येणार नाहीं, ती बोलण्याचें टाळावें लागतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे

स्वतःस वाटेल तें न बोलतां अनाक्षेपार्ह असेल तेंच बोलावें लागतें. एकंदरींत भाषण हें ऐकणाऱ्याच्या धोरणानें करावें लागतें. दरोडेखोर दुसऱ्यांच्या घरावर दरोडा घालण्याची भाषा बोलतात, आपआपसांत दरोडा घालण्याविषयीं कधीं बोलत नाहींत. एकमेकांच्या घरावर दरोडा घालण्याची बुद्धि मनांत बाळगिली, तर त्यांचें सामुदायिक कार्य कधींच तडीस जाणार नाहीं. म्हणून आपआपसांत दरोडा न घालण्याचा जो त्यांचा निश्चय त्यांतच दरोडेखोरांतसुद्धा नीति जन्म पावते. यावरून समाजाचें मन व्यक्तीच्या मनापेक्षां श्रेष्ठ आहे असें सिद्ध होतें. दोन भिन्न चालीरीतींचें समाज एकत्र आले म्हणजेहि प्रत्येक समाज आपल्या चालीरीतींचें परीक्षण करूं लागतो. त्यामुळें कित्येक युगें उराशीं बाळगून ठेविलेल्या चाली सोडाव्या लागतात; आणि त्या ठिकाणीं नवीन, परकीयांच्या चाली घुसतात. हे दोन समाज जर समान योग्यतेचे असतील तर निरर्थक बनलेल्या चाली लुप्त झाल्यानें समाजाचें अहित होत नाहीं. परंतु जितजेत्यांच्या संबंधाप्रमाणें दोहोंपैकीं एक समाज जर बलिष्ठ असेल, तर आचारांत घडून येणारी क्रान्ति इष्ट दिशेनेंच होईल असें म्हणवत नाहीं. स्वार्थमूलक अनुकरणेच्छेनें होणारे फरक मोठें मनःसंयमन करून टाळावे लागतात. भिन्न संस्कृतीच्या समाजाचीं नीतितत्त्वें दुसऱ्या समाजानें आत्मसात् करावयास कालावधि लागतो. लोककथा, धर्म, तत्त्वज्ञान, काव्य यांत जेव्हां या नवीन नीतितत्त्वांचा समावेश करावा तेव्हांच तीं सर्व समाजांत रुळतात. या कामीं दंतकथांचाहि फार उपयोग होतो. या मार्गानें शिक्षण घेऊन मुलें लहानाचीं मोठीं होतात, तेव्हां समाजानें नवीन ग्रहण केलेल्या तत्त्वांचें मूळ दृढ होतें. महाराष्ट्र संस्कृतींत तेलुगु व कानडी संस्कृतींचें मिश्रण अशाच रीतीनें झालेलें आहे. याप्रमाणें कोणताहि समाज नीतीची जोपासना करीत असतो. नीतीनें म्हणजे समाजाला पसंत असलेल्या नियमांप्रमाणें वागलें म्हणजे सर्व समाज आपोआपच नियंत्रणाखालीं आला. सामाजिक नीति ही शेजाऱ्याकरितां असते. वैयक्तिक नीति ही स्वतःपुरतीच असते. व्यक्तीकडून समाज सामाजिक

नीतिमत्तेचीच अपेक्षा अधिक करतो; म्हणून सामाजिक नीतीचें महत्त्व फार मानिलें जातें.

समाज आपल्या संरक्षणाकरितां जे नियम करतो तेच कोणत्याहि नीतिशास्त्राचा पाया म्हणून मानिले जातात, हें वर सांगण्यांत आलेंच आहे. पण यांत लक्षांत ठेवावयाची गोष्ट ही कीं, समाज या शब्दानें अखिल समाजच समजला पाहिजे. कारण समाजांतर्गत असे जे अनेक संघ असतात त्या संघांनीं आत्मसंरक्षणार्थ केलेले नियम अथवा पाडलेल्या रूढि यांच्यापासून नीतितत्त्वांचा प्रादुर्भाव कधींच होणार नाहीं. कोणत्याहि राष्ट्रांत धर्मगुरु, जमीनदार, कारखानदार वगैरे लोकांचे विशिष्ट वर्ग बनतात. यांपैकीं कांहीं वर्गांतील लोक परोपजीवी असतात. शेतकऱ्यानें केलेल्या कष्टावर जमीनदार लोक पोसले जातात, एवढेंच नव्हे तर त्यांना चैनींत राहतां येतें. ह्या आपल्या चैनींत खळ कधीं पडूं नये म्हणून जमिनीवरील कुळांना पिळून काढण्याकडे त्यांची प्रवृत्ति होते. धर्मगुरूंचें वजन लोकांवर मनस्वी असतें. त्या वजनाचा दुरुपयोग आपली प्रतिष्ठा कायम ठेवण्याकरितां क्रिस्ती पाद्र्यांनीं केल्याची साक्ष इतिहास देत आहे. अनियंत्रित राजा आणि त्याची प्रजा यांचे संबंधहि एका पक्षाचें डोकें वर काढूं न देणारे असेच असतात. यामध्यें सत्ताधारी वर्ग आपला अधिकार अबाधित राहील अशा रीतीनेंच आपल्या अधिकाराचा उपयोग करीत असतो. हा सत्ताधारी वर्ग प्रबल असतो तेव्हां ताबेदार लोक हुकुमबंदी होतात. दैवानें ओढवलेली ताबेदारी आपणांस सहन केलीच पाहिजे, अशी ते आपली समजूत करून घेतात. परंतु एकदा का या लोकांच्या विचाराला चालना मिळाली म्हणजे सत्ताधाऱ्यांचें नियंत्रण ढिलें पडतें. समाजांतील दुसऱ्याच्या कष्टावर उपजीविका करणाऱ्या लोकांचा वर्ग सार्वत्रिक विचारस्वातंत्र्यामुळें नाहींसा होऊन समाजाचें स्वरूप पालटतें. समाज चढाओढीच्या तत्त्वाचा अंगीकार करतो. अशा समाजांत कायदा व पोलीस हींच शासनसाधनें शिल्लक राहतात. रूढि, पारलौकिक समजुती यांचें नियंत्रण थोडेंबहुत जरी टिकून

राहिलें, तरी चढाओढीच्या समाजांत त्यांतील सार गेलेलें असतें. चढाओढीच्या समाजांत दुर्बल मागें पडतातच; पण त्यांच्या दुःस्थितीबद्दल समाजांतील दुसरा कोणी मनुष्य जबाबदार नसतो एवढेंच, त्यांची दुःस्थिति त्यांच्या दुर्बलतेंत असते व ती दुर्बलता कित्येक वेळां स्वाभाविक असल्यामुळें निरुपायाची असते. पाश्चात्त्य देशांत जमीनदारांसारख्या दुसऱ्याच्या श्रमावर मौज मारणाऱ्या लोकांविरुद्ध कांगावा करून चढाओढीच्या तत्त्वाचा जयजयकार करण्यांत आला; परंतु त्यामुळें समाजांतील विषमता अधिकच वाढून पूर्वींचेच वर्ग पण निराळ्या स्वरूपांत जन्मास आले. यांत्रिक शोधांमुळें जमीनदारांच्या ठिकाणीं कारखानदारांची सत्ता निर्माण झाली. पैसा मिळविणें हेंच ध्येय झाल्यामुळें अल्प श्रम व विपुल वित्त हाच प्रत्येकाच्या वागणुकीचा शिरस्ता होऊन बसला. या कारणानें अनीतीला पुष्कळच वाव मिळाला आणि समाज पूर्ववत् दरिद्री, दुःखीकष्टी व असमाधानी असल्याचें अनुभवास येऊं लागलें. श्रीमंत लोकांच्या हातांत सत्ता जाणें स्वाभाविकच आहे; आणि गुणांच्या नैसर्गिक विषमतेमुळें थोडीं माणसें श्रीमंत होणें व पुष्कळशीं माणसें दरिद्री असणें क्रमप्राप्तच आहे. याला धनोत्पादक कारखाने राष्ट्रीय करणें, हा उपाय अमलांत आणण्याचा सांप्रत प्रयत्न करण्यांत येत आहे. राष्ट्रांत उत्पन्न झालेली संपत्ति सर्वांना सारखी वांटून देण्याचा हा एक मार्ग आहे; परंतु हें जुलमानें घडवून आणावें लागतें हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. तसेंच आपल्या श्रमांचा मोबदला आपल्या एकट्याला मिळणार नाहीं या जाणिवेनें श्रम करण्याचा उत्साहच कोणामध्यें राहणार नाहीं, हा जो दोष या योजनेसंबंधीं दाखविला जातो तो योग्यच आहे. वर वर्णन केलेल्या आपत्तीला तोंड देण्याला हिंदूंच्या धर्मग्रंथांत जो उपाय सुचविला आहे तो थोडा निराळा आहे. आपण मिळविलेलें धन हें नुसतें स्वतःकरितांच नसून इतरांकरितांहि आहे, अशी हिंदूंची श्रद्धा असल्यामुळें इतरांना ते आपल्या संपत्तीचा उपभोग घेऊं देतात. हिंदु

समाजांत दानाची पद्धति याच कारणामुळें पडली; आणि सत्पात्रीं दान करण्याचा धर्मशास्त्राचा जो कटाक्ष आहे तिकडे दुर्लक्ष न करतां दानधर्म करण्यांत आला, तर द्रव्योत्पादन कमी होण्याची भीति न राहतां उत्पादित द्रव्याचा सर्व समाजास फायदा मिळूं शकतो; आणि हीच खरी नीति होय.

समाजांत शांतता नांदल्याशिवाय समाजांतील सर्व व्यक्ति परस्परांस उपकारक होऊन त्यांची व तद्द्वारा समाजाची उन्नति होणार नाहीं. समाजाच्या संसारास प्रत्येक व्यक्तीला हातभार लावतां यावा व सर्वांनीं परस्परांच्या साहाय्यानें सुखाचा अनुभव घ्यावा, हेंच मुख्यतः नियंत्रणाचें कार्य असतें. परंतु समाजामध्यें एकसारख्या घडामोडी होत असल्यामुळें हें कार्य जावें तसें सिद्धीस जात नाहीं. घडामोडींचें मुख्य कारण म्हणजे दारिद्र्य आणि श्रीमंती हें होय. प्रस्तुत कारणामुळें निरनिराळी परिस्थिति समाजांत उत्पन्न होते; आणि हें उत्कर्षापकर्षांचें रहाटगाडगें कांहीं केल्या टाळतां येत नाहीं. समाजाच्या एका अवयवाचें जरी नियंत्रण करावयाचें असलें, तरीसुद्धा दुसरे असंख्य फेरबदल करणें भाग पडतें. कोणत्याहि सुधारलेल्या समाजाची ठेवणच अशी असते कीं, कोठेंहि स्पर्श केला तरी सर्व समाजावर त्याचा परिणाम होतो. समाजांत लहानमोठे वर्ग उत्पन्न झाले असतां अथवा निरनिराळ्या वर्गांत कलह माजले असतां समाज विस्कळित होतो. एका वर्गाचें हित तें दुसऱ्या वर्गाचें अहित अथवा कांहीं लोक अतिशय श्रीमंत आणि दुसरे कित्येक अगदीं भिकारी, त्याचप्रमाणें कित्येक लोकांना उत्कर्षाचीं द्वारें मोकळीं आणि इतरांना तीं बंद, अशी स्थिति झाली म्हणजे निरनिराळ्या वर्गांत तेढ उत्पन्न होते; आणि या अंतर्गत दुहीमुळें समाज विघटित होतो. समाजाचा एकोपा मोडण्यास आणखीहि कित्येक गोष्टी कारणीभूत होतात. हाडामांसानें व संस्कृतीनें एकच असलेल्या समाजांत भिन्न रक्ताचीं व संस्कृतीचीं माणसें विवाहबंधनानें घुसलीं म्हणजे ही गोष्ट समाजास न खपल्यामुळें त्या समाजांत वितुष्ट उत्पन्न होतें. कांहीं हिंदूंनीं मुसलमान अथवा क्रिस्ती स्त्रियांबरोबर लग्न केलें असतां इतर

हिंदूंस ही गोष्ट असह्य होऊन त्याचा परिणाम अखेरीस समाजाचीं शकलें पाडण्यांत होतो. दुसराहि एक अनुभव हिंदु समाज हल्लीं घेत आहे, त्यावरून समाजाच्या स्थित्यंतराचें आणखी एक कारण कोणालाहि पटण्यासारखें आहे. इंग्रज लोक राज्यकर्ते असल्यामुळें त्यांच्या चालीरीती व त्यांची संस्कृतीहि आम्ही उचलून आम्ही आपल्या स्वतःच्या चालीरीतींत व संस्कृतींत बदल करून घेतला आहे. जोंपर्यंत सर्वच समाजानें या परकीयांच्या चालीरीतींचें अनुकरण केलें नाहीं, तोंपर्यंत अनुकरण करणारे आणि अनुकरण न करणारे यांमध्यें वैरभाव उत्पन्न होतो; व त्यामुळें समाजांतील एकसूत्रीपणा नष्ट होतो. अशा वेळीं समाजाचें नियंत्रण करण्यास समाजबाह्य सत्तेचीच आवश्यकता भासते. राज्यकर्त्यांचें अनुकरण करणाऱ्यांकडे राज्यकर्त्यांचा ओढा असणें स्वाभाविक असल्यामुळें बाकीचा समाज हताश होणें अस्वाभाविक नाहीं. परंतु सर्व समाजानेंच जर परकीयांची संस्कृति स्वीकारली तर समाजाचीं शकलें होत नाहींत आणि समाजनियंत्रण दुःसाध्य होत नाहीं हें जरी खरें असलें, तरी परकीय संस्कृतींत समाज विरघळून गेल्यामुळें त्याचें आत्मीयत्वच नष्ट होऊन जातें हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. त्याचप्रमाणें नवीन शोध, नवीन कल्पना व नवीन ज्ञान, तसेंच नवीन गरजा अथवा वासना यांच्या योगानेंहि समाजाचें पूर्वस्वरूप अगदीं पालटून जातें; आणि या पालटलेल्या स्वरूपाला अनुसरून समाजनियंत्रणाची दिशाहि बदलावी लागते. हिंदुस्थानांत इंग्रजी सत्ता अधिष्ठित झाल्यानंतर शांततेच्या मार्गानेंच हिंदु समाजांत विस्कळितपणा कसा उत्पन्न झाला आहे, हें सर्वांच्या प्रत्ययास येऊन चुकलेंच आहे. आज विस्कळित झालेला हिंदु समाज राज्यकर्त्यांमधील मुत्सद्दीपणाच्या अभावामुळें पुनश्च सुसंघटित होऊं पाहत आहे. शत्रु उठला असतां सर्व लोक एक होतात, त्याचप्रमाणें देशांतर करण्याचा प्रसंग आला असतां देशांतर करणाऱ्या समाजांत एकोपा व सामुदायिक शिस्तीची आवड हीं दिसून येतात. तद्वतच कोणतेहि राज्यकर्ते प्रजेला कडक सत्तेखालीं ठेवण्याचा प्रयत्न करूं लागले म्हणजे प्रजेमधील आपआपसांतील कलह लय

पावून तिच्यामध्यें सुसंघटितपणा निर्माण होतो. तात्पर्य, सर्व समाज जेव्हां सुसंघटित असेल तेव्हां व्यक्तिस्वातंत्र्याला वांव नसतो; आणि व्यक्तिस्वातंत्र्य बोकाळलें म्हणजे समाज खिळखिळीत झाला आहे असें बेशक अनुमान करावें.

नियंत्रणाचें रहस्य असें आहे कीं, तें सर्व समाजांत पसरलेलें असावें; म्हणजे प्रत्येक मनुष्य आपला नियंता असावा. शिक्षा ठेवून एखाद्या कृत्याचें नियंत्रण करण्यापेक्षां कर्माचा उद्भव जेथून होतो तें मन सुधारण्याचा प्रयत्न करणें अधिक श्रेयस्कर होय, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. मन हें असें आहे कीं, तें सुधारण्याचा प्रयत्न एकदा करून चालत नाहीं. मनोविकार अथवा वासना कधींच समूळ नष्ट होत नाहींत. त्या सारख्या उसळ्या खात असतात. स्वतःच्या विचारशक्तीनें त्यांना दाबून टाकण्याचें सामर्थ्य सर्वांत नसतें. म्हणून मनुष्याला आमरण धर्मोपदेशाची आवश्यकता भासत असते. नियमित कालांत एखाद्या गोष्टीचें ज्ञान संपादन करतां येतें व एकदा केलें म्हणजे पुनः त्यासाठीं शाळेंत जावें लागत नाहीं. परंतु मनोविकार लगामीं ठेवतां यावे म्हणून वृद्ध माणसांसहि कथापुराणास जाणें जरूर पडतें. शाळा लवकर सुटते, देऊळ जन्मभर चिकटतें. मनुष्याची बुद्धि, भावना, वासना, विवेकशक्ति ह्या सर्वांवर संस्कार करण्याचे प्रयत्न सारखे चालू ठेवावे लागतात. यावरून लहान मुलांना चांगल्या गोष्टींचें वळण लावणें ही किती महत्त्वाची बाब आहे याची कल्पना करतां येईल. सारांश, मनुष्य आपण होऊन नियमबद्ध झाला पाहिजे; याचाच अर्थ त्याचें शील सुधारलें पाहिजे. असें झालें असतां समाजनियंत्रणाची बाब सोपी होते.

# प्रकरण नववें

## समता

नियंत्रणाविषयीं लिहितांना समतेच्या प्रश्नाचा विचार करणें अवश्य आहे. सर्व जग विषमतेनें व्यापिलें असतां समतेच्या कल्पनांनीं मनुष्याचें मन भारून गेलेलें असतें. माणसामाणसांत जमीनअस्मानाचें अंतर असतें; तथापि कनिष्ठ मनुष्य श्रेष्ठांशीं समतेचें नातें जोडूं पाहतो. प्रत्येक मनुष्य शंकराचार्य, शिवाजी किंवा गांधी होऊं शकत नाहीं. मन व बुद्धि हीं संस्काराच्या योगानें वृद्धिक्षम असल्यामुळें प्रत्येक माणसाची नीतिमत्ता व बुद्धिमत्ता कमीअधिक असणें अपरिहार्य आहे. ह्या नैतिक व बौद्धिक विषमतेमुळें माणसांच्या आचारविचारांत भिन्नत्व उत्पन्न होतें. ह्या कारणास्तव वेगवेगळ्या रोगांच्या रोग्यांना एकच उपाय करून चालत नाहीं, तर वेगवेगळी योजना करावी लागते. त्याचप्रमाणें समाजाला प्रत्येक माणसाशीं निराळी वागणूक ठेवणें भाग पडतें. शाळा स्थापन करून सर्वांची बुद्धि व हुशारी सारखी करतां येणार नाहीं. असें करणें अशक्य आहे. म्हणून राजकीय, सामाजिक, धार्मिक वगैरे सर्व बाबतींत विषमताच आढळणें साहजिक आहे. पं. मदनमोहन मालवीय व गिरणीकामगार यांना सारखाच मतदानाचा अधिकार असणें हें केव्हांहि सदोषच मानलें जाईल. शिक्षित-अशिक्षित यांच्या विचारांची एकच किंमत ठरवितां येणार नाहीं. लहान व मोठा, स्त्री व पुरुष, रोगी व निरोगी यांच्यासंबंधीं कायद्यालाहि भिन्न भाव मान्य करून शिक्षेत फेरबदल करावा लागतो. तसेंच गुन्हेगार आणि निरपराधी यांना समाजानें सारखेंच लेखणें याला समता म्हणतां येणार नाहीं; आणि अशा तऱ्हेची समता पाहिजे असें कोणी म्हणणारहि नाहीं. ज्याच्या त्याच्या बुद्धीप्रमाणें मनुष्याची अर्जनशक्ति असणार हें उघड आहे — ह्या कारणानें आर्थिक विषमता समाजांत उत्पन्न होते. दरिद्री मनुष्य दरिद्री असतो याचें कारण त्याची अदूर दृष्टि, त्याचीं व्यसनें, त्याचा आळस

त्याचा अप्रामाणिकपणा हीं असूं शकतील. असा मनुष्य आणि आपल्या अकलेनें व श्रमानें द्रव्यसंचय करणारा धनिक यांच्या ठिकाणीं समदृष्टि ठेवणें म्हणजे समाजाचा नाश करणें होय. ज्या समाजांत मनुष्याच्या गुणांचें चीज होत नाहीं तो समाज अधोगतीला जाऊन पोंचला नसल्यास लवकरच पोंचेल हें निश्चित समजावें. त्यांतल्यात्यांत सुदैवाची गोष्ट म्हणजे आपल्या हिताकरितां मनुष्याला गुणावगुणांची निवड करणें भागच पडतें. कोणताहि वैद्य औषधें तयार करून देण्यास भांगट किंवा दारूबाज मनुष्य पसंत करणार नाहीं. आळशी मनुष्याला आपल्या घरांत काम करण्यास कोणी ठेवणार नाहीं. अप्रामाणिक मनुष्याला आपल्या मिळकतीचा वहिवाटदार म्हणून नेमण्यास कोणताहि शहाणा मनुष्य धजावणार नाहीं. देवाच्या पुजाऱ्यांत स्वच्छता, शुद्धता, आचारसंपन्नता इत्यादि गुणांची अपेक्षा कोणी झालें तरी करणारच. सारांश, ‘सब्र घोडे बारा टक्के’ हा नियम कोणासहि रुचणार नाहीं.

राष्ट्रांत संस्था निर्माण केल्यानें योग्य माणसें तयार होतीलच असा नियम नाहीं. संस्था चालविण्यास अवश्य असणारे गुण मनुष्यांत नसतील तर सुरू केलेल्या संस्था डबघाईस आल्यावांचून राहणार नाहींत. आधीं गुण मग संस्था, का आधीं संस्था मग गुण, हा भानगडीचा व न सुटणारा प्रश्न नाहीं असें नाहीं. एवढें मात्र खरें कीं, गुणानुरूप संस्था निर्माण केल्यास संस्था चांगल्या चालतील एवढेंच नव्हे, तर गुणांचा त्या संस्थेमुळें उत्कर्ष होईल, याविषयीं संशय उत्पन्न होण्याचें कारण नाहीं. संशय जो आहे तो उलट प्रकारासंबंधानें आहे. संस्था चालवितां चालवितां नसलेले गुण येतात असें कित्येक म्हणतात; आणि तें एका दृष्टीनें खरेंहि आहे. धंद्याचे अथवा कसबाचे गुण अथवा संस्था चालविण्याचें चातुर्य वगैरे काम करतांकरतां संपादन करतां येईल. परंतु प्रामाणिकपणा, निरलसता, स्वार्थत्याग इत्यादि नैतिक गुण मूळचे अंगीं नसतांना केवळ धंद्याला लागल्यानें येतील, असें एकदम कबूल करण्यास मनुष्य कचरतो. ह्या ठिकाणींच मतभेदाला जागा आहे. कारण संस्था जड आहेत. त्यांच्यामध्यें

गुणोत्पादनाचें सामर्थ्य कसें असणार ? परंतु अंगीं असलेल्या गुणांचें चीज होण्यास संस्थांच्या योगानें अवकाश मिळतो हें कांहीं खोटें नाहीं. म्हणून असे गुण ज्यांच्यांत असतील त्यांना पुढें आणून उत्तेजन देणें हें समाजाचें, म्हणजे सरकारचें मुख्य कर्तव्य आहे. कोणत्याहि सरकारचा सद्धेतु अशा गोष्टीवरूनच ताडिला जातो. राष्ट्रांत गुणांचा परिपोष होण्यास गुणग्राहकता हाच एक उपाय आहे. परकीय सत्तेखालीं खऱ्या गुणांचा उदय होत नाहीं याचें कारण अशा गुणांचे चीज होणें परकीयांच्या अमलांत कठीण असतें. परकीय सत्ताधाऱ्यांना आचारविचारानें जे लोक आपलेसे वाटतात त्यांनाच ते जवळ करतात आणि त्यामुळें अशा लोकांची चलती होते. परंतु आपल्या लोकांस सोडून जाणाऱ्या ह्या लोकांत कोणते गुण असूं शकतील बरें ! ह्या-कारणास्तव परकीय अमलांत विद्या येईल, ज्ञान वाढेल, परंतु नैतिक गुणांचा प्रादुर्भाव होणार नाहीं.

असो. विषमता जरी सर्वत्र व सर्व कालीं असली तरी ती कृत्रिम असतां कामा नये. नैसर्गिक विषमता अमान्य करणें वेडेपणाचें असलें, तथापि मनुष्यकृत विषमतेच्या विरुद्ध बंड उभारणें न्यायाचेंच ठरेल. हें बंड उभारल्या-मुळेंच फ्रेंच राज्यक्रांतीचें आधुनिक इतिहासांत इतकें गौरव केलें जात आहे. दोन माणसांच्या स्थितींत जर अंतर असेल तर त्याला योग्य कारण असलें पाहिजे; नसल्यास ती विषमता दूर करणें हें समाजाचें कर्तव्य आहे. कृत्रिम विषमता असलीच तर ती नैसर्गिक विषमतेपासूनच उत्पन्न झालेली पाहिजे, म्हणजेच ती समर्थनीय होईल. समाजाचें हित किंवा अहित होत आहे ह्याचा विचार करून विषमतेचा प्रश्न सोडविला पाहिजे. समाज-हिताला पोषक नसणारी विषमता राहूं देणें इष्ट होणार नाहीं. सद्गुणी माणसांचें गौरव समाजानें केलें पाहिजे. तसें करण्यानें विषमता उत्पन्न झाली तरी भिण्याचें कारण नाहीं. सद्गुणी माणसांचें गौरव समाजाकडून केलें जातें याचें कारण तीं माणसें इतरांहून अधिक चांगलीं म्हणून नव्हे, तर समाजाला त्यांच्याबद्दल आपलेपणा वाटतो. आई आपल्या मुलावर

प्रेम करते तें तीं मुलें आपलीं म्हणून करते. चांगल्यावाइटाचा विचार तिच्या मनाला शिवत नाहीं. त्याचप्रमाणें सद्गुणी माणसांकडे समाजानें आत्मीयतेच्या भावनेनें पाहिलें पाहिजे.

कृत्रिम विषमता नाहींशी करून समता स्थापण्याकरितां नियंत्रणाची फार आवश्यकता असते. व्यापारांत कांहीं लोक आपल्याच हातांत सर्व सत्ता ठेवीत असल्यास हें कोंडाळें मोडून टाकण्याकरितां वाटेल त्या मनुष्यास व्यापारांत प्रविष्ट होतां येईल असे कायदे सरकारनें केले पाहिजेत. अशा तऱ्हेचे कायदे अठराव्या व एकोणिसाव्या शतकांत युरोपमध्यें सर्वत्र केलेले दिसून येतात. हिंदुस्थानांत सार्वजनिक मंदिरें व पाणवठे यांवर अस्पृश्यांना व्यवहार करतां यावा म्हणून सरकारास व स्थानिक संस्थांस विशिष्ट ठराव करावे लागले आहेत; व या पुढें कदाचित् नवीन कायदेहि करावे लागतील. हिंदुस्थानांत आजपर्यंत सैन्यामध्यें हिंदी लोकांस मोठ्या अधिकारांच्या जागा देत नसत; परंतु अलीकडें त्यासंबंधीं नवीन नियम होऊन कांहीं थोड्या विशिष्ट लोकांना ‘ कमिशन् ’ ऊर्फ बादशाही अधिकारपत्र देण्याची योजना अमलांत आली आहे. स्त्रियांनीं मालमत्ता धारण करण्याच्या बाबतींत युरोपांत जी विषमता होती ती घालविण्याकरितां सांप्रत सर्व देशांत स्त्रियांच्या मालमत्तेवरील हक्कांसंबंधीं नवीन कायदे अमलांत आलेले आहेत.

हल्लींच्या काळीं आर्थिक बाबतींत जी तीव्र विषमता आढळते आणि कांहीं लोक अतिश्रीमंत व कांहीं अतिदरिद्री असल्याचें दिसून येते, ती स्थिति सरकारी नियंत्रणाशिवाय बदलणार नाहीं, अशी सार्वत्रिक समजूत झाली आहे. ह्या तत्त्वास अनुसरूनच ‘ कम्यूनिस्ट ’ नांवाचा पंथ निघाला आहे. त्यांच्या मतें सरकारनेंच सर्व धनोत्पादन आपल्या हातांत घेऊन वारसाहक्कानें मालमत्ता मिळणें इत्यादि विषमतेचे प्रकार कायद्यानें बंद केल्याशिवाय सांपत्तिक समता प्रस्थापित होणार नाहीं. पूर्वकाळीं समता घडवून आणण्याकरितां धार्मिक निर्बंध असत. उदाहरणार्थ, श्रीमंतांनीं यज्ञ करून दक्षिणेच्या द्वारें आपली संपत्ति वांटून टाकावी, अशी या देशांत शास्त्राची

शिकवण असे व तदनुसार लोकांचें वर्तन असे. परंतु आधुनिक काळीं हीं बंधनें लुप्त झाल्यामुळें समता स्थापण्याकरितां कायद्याचा आश्रय केल्याशिवाय गति नाहीं. ह्या दृष्टीनें ‘ कम्यूनिस्ट ’ पंथाचें म्हणणें अमान्य करतां येणार नाहीं. नियंत्रण केल्यावांचून जर संपत्तीची समविभागणी होईल तर फारच उत्तम; परंतु अशी अपेक्षा करणें हल्लींच्या युगांत व्यर्थ होय. त्यामुळें समता स्थापित करण्याची जबाबदारी सरकारावर येऊन पडते हें निर्विवाद आहे. कम्यूनिझमचे जे आक्षेपक आहेत त्यांचें म्हणणें इतकेंच आहे कीं, अशी जी समता उत्पन्न होईल ती दीर्घ काल टिकणार नाहीं; आणि बुद्धिमान् व साहसी लोक अशा सरकाराविरुद्ध बंड करून राज्याचीं सूत्रें आपल्या ताब्यांत घेतील. असो. ह्या वादाचा कांहींहि निकाल लागला तरी नियंत्रणाशिवाय कोणत्याहि पद्धतीची समता आधुनिक युगांत प्रस्थापित होणार नाहीं हा सिद्धांत अबाधित दिसतो. हें नियंत्रण युक्तीनें व कौशल्यानें केलें तर विशेष कलह न होतां इष्ट कार्य साधण्याचा संभव आहे. वरील विवेचनावरून विषमतेच्या प्रश्नाचा समाजनियंत्रणाशीं कसा निकट संबंध आहे हें ध्यानांत येईल.

तथापि हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, समतेची भावना व तीविषयीं आवड ही बहुजनसमाजाच्या अंगवळणीं पडल्याशिवाय नियंत्रणाचा चिरस्थायी परिणाम होणार नाहीं. शिवाय कडक नियंत्रणानें समता स्थापित केल्यास स्वातंत्र्य व समता यांचा मेळ कसा बसणार ! का नियंत्रणालाच स्वातंत्र्य म्हणावयाचें ! शिवाय लोकांवर बाहेरून लादलेली समता अनेक शतकें नांदणार नाहीं. म्हणून “ आपपरु नाहीं । चैतन्या जैसा ” अशी वृत्ति बनविणें हेंच समतेचें खरें अधिष्ठान होय.

---

# प्रकरण दहावें

## नियंत्रणाची सीमा

समाज झाला तरी त्याला व्यक्तीव्यतिरिक्त निराळें अस्तित्व नाहीं. विशिष्ट व्यक्तींच्या समुदायाचा समाज बनतो. अर्थात् व्यक्तींच्या उत्कर्षानें समाजाचा उत्कर्ष होतो, तसेंच व्यक्ति दुर्बल झाल्या म्हणजे समाजहि दुर्बल होतो. व्यक्ति आणि समाज ह्यांचें तादात्म्य नसलें तरी दोहोंमध्यें अवयवावयवी भाव असतो. ह्यासाठीं समाजनियंत्रणाची मर्यादा कोठपर्यंत ढकलावी हा मोठा बिकट प्रश्न आहे. ह्या कामीं धोपट मार्ग आखून देतां येत नाहीं. वेळोवेळीं उद्भवणाऱ्या प्रश्नांचा परिस्थित्यनुरूप व सारासार विचार करूनच निर्णय केला पाहिजे. समाजनियंत्रणानें जर व्यक्ति चिरडून जाईल तर त्या नियंत्रणाचा अतिरेक झाला म्हणून समजावें. मात्र अशा बाबतींत एकाच व्यक्तीचा विचार करावयाचा नसतो, हें ध्यानांत ठेवणें अवश्य आहे. समाज-नियंत्रणाची दोरी फार ताणली तर व्यक्तिस्वातंत्र्य एकदम फोफावून समाजाच्या नाशाला तें कारणीभूत होतें. समाज व व्यक्ति यांमध्यें हा लढा असतो. व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा न येतां समाजाचें अस्तित्व अबाधित राहील असें धोरण ठेवणें योग्य होईल. आतां एवढें खरें कीं, प्रत्येक नियंत्रणानें व्यक्तिस्वातंत्र्याला आळा बसलाच पाहिजे व आळा घालणें हाच नियंत्रणाचा हेतु असतो. तथापि व्यक्तींच्या मनसोक्त वर्तनाला बांध घाल-ण्यांतच व्यक्तींचें हित असतें हें विसरतां कामा नये. यथेच्छ आचरणानें व्यक्तीचा नाश होतो. असा नाश होऊं नये म्हणून परमेश्वरानें मनुष्याला विवेकशक्ति दिली आहे. ह्या विवेकशक्तींत मनुष्याचें स्वयंनियंत्रण प्रतीत होतें. परंतु विवेकशक्तीहून मनुष्याचे मनोविकार प्रबल असतात. ह्याकरितां नियंत्रणाची आवश्यकता व्यक्तीसहि पटते. तथापि ह्या बाह्य नियंत्रणाचा अतिरेक झाल्यास मनुष्याची विवेकशक्ति निकामी होण्याचा संभव असतो. विवेकशक्ति पंगु झाली म्हणजे मनोविकार अनावर होतात; आणि असें

झालें म्हणजे समाजनियंत्रणाच्या वाद्या कितीहि लांब केल्या तरी त्या मनुष्याला आपल्या लगामी ठेवूं शकत नाहींत. म्हणून मनुष्याचें विवेक-सामर्थ्य यत्किंचितहि कमी होणार नाहीं अशी खबरदारी समाजानें बाळगिली पाहिजे. समाजाच्या संरक्षणाचें बीज व्यक्तीच्या विवेकांत असतें.

कोणतेंहि नियंत्रण असें असावें कीं, त्याच्यापासून मनुष्यांना व्यक्तिशः गैरसोय सोसावी लागेल त्याहून समाजाचे घटक ह्या नात्यानें त्यांचें अधिक हित साधेल. त्याचप्रमाणें समाजस्वास्थ्याला आधारभूत असलेल्या मनुष्यांच्या भावना दुखवणार नाहींत अशा प्रकारचें नियंत्रण असावें. आपण असें पाहतों कीं, ज्याच्या सुधारणेची आशा नाहीं अशा व्यसनमग्न मुलाला-सुद्धा जगविण्याचा हरप्रयत्न बाप करीत असतो. अशा बापाचें अनुकरण. समाजानें करूं नये. कित्येक लोक निसर्गतःच राक्षसी वृत्तीचे असतात व अशा वृत्तीनेंच त्यांचा आपोआप नाश होतो. नियंत्रणाच्या योगानें हा नाश टाळण्याचा प्रयत्न समाजानें करणें युक्त होणार नाहीं. तसेंच चढा-ओढीच्या तत्त्वाला मुळींच वांव मिळणार नाहीं इतकी नियंत्रणाची मर्यादा पुढें सारूं नये. अहमहमिकेनें मनुष्य आपली उन्नति करून घेतो त्याच्या आड समाजानें येऊं नये. ह्या चढाओढींत निकामीं माणसें आपोआप गळून पडतात. त्यांचा टिकाव लागत नाहीं. दुर्गुणी, बुद्धिहीन, आप-मतलबी माणसें समाजाला उपकारक होत नाहींत.

नियंत्रण म्हणजे जुलुम आहे असा भास होतां कामां नये. आईबाप, धर्मगुरु व राजा यांनीं चोहोंकडून नियंत्रणाचीं कुंपणें घातलीं तर व्यक्ति-स्वातंत्र्याची काय अवस्था होणार याची कल्पनाहि करतां येत नाहीं. परंतु ह्या स्वातंत्र्याच्या दिवसांतहि नियंत्रण कमी न होतां सारखें वाढत आहे हें कायद्यांच्या संख्येवरून कोणालाहि समजण्यासारखें आहे. हर्बर्ट स्पेन्सरचें ऐकांतिक व्यक्तिस्वातंत्र्य आज कोणालाहि मान्य होण्यासारखें नाहीं. पूर्वीचा साधा समाज आतां राहिला नाहीं. त्यामुळें नियंत्रणाची आवश्यकता अधिकाधिक भासत आहे. निर्भेळ व्यक्तिस्वातंत्र्याचें पर्यवसान बेबंदशाहींत

होत असतें; आणि बेबंदशाही तर इष्ट नाहीं. कारण त्यामुळें प्रगतीचा मार्गच बंद होतो. बरें, समाजाचें हिताहित ज्यांत नाहीं अशा बाबतींत समाजानें ढवळाढवळ करूं नये असें म्हणावें, तर सुधारलेल्या समाजाची कातडी इतकी नाजूक असते कीं, कोणत्याहि भागावर झालेला आघात सर्व समाजाला उपद्रव देतो. तेव्हां बारीकसारीक गोष्टींच्या संबंधानें देखील समाजानें जागरूकता बाळगिली पाहिजे. विवाहाचा प्रश्न वैयक्तिक समजला जातो. परंतु उद्या जर तरुण हिंदु वधू एकीमागून एक क्रिस्ती अथवा मुसलमान वर करूं लागल्या तर समाजाला मध्यें पडणें भाग आहे. कांहीं गोष्टी सक्तीनें सरकारनें बंद केल्याच पाहिजेत, उदा० मद्यपान. कांहीं गोष्टी अनिष्ट वाटल्यास त्यांपासून लोकांस परावृत्त करण्याचे प्रयत्न सरकारनें करणें अवश्य आहे. उपदेशानें, जाहीर पत्रकें काढून, अथवा पुस्तकांत धडे घालून लोकांचीं मनें वळवून घेतलीं पाहिजेत. इतक्यानें काम भागत नाहीं असा अनुभव आल्यास कायद्यानें अनिष्ट गोष्टी बंद पाडण्याचा अधिकार सरकारनें बजावणें योग्यच होईल. लग्नकार्यांत व उत्तरक्रियेंत पैसा ऐपतीबाहेर खर्च करूं नये, हें लोकांस सांगूनहि पटत नसेल तर कायदा करून असा बेफाम खर्च बंद करणें हें सरकारचें कर्तव्यच मानलें जाईल. तात्पर्य, शिक्षण व शासन यांचा उपयोग जरूरीप्रमाणें केला पाहिजे.

असें जरी आहे तरी व्यक्तिस्वातंत्र्य हें केवळ थोतांड आहे असें म्हणणें योग्य होणार नाहीं. व्यक्तीच्या आध्यात्मिक उन्नतीस जरी समाजानें कितीहि मदत केली, तरी मुख्यतः व्यक्तीनेंच आपली उन्नति आपल्या प्रयत्नानें करावी हें मोक्षविद्येंतील आद्यतत्त्व आहे. मुलाला जसें आपण भरवितों त्याप्रमाणें व्यक्तीस सर्वतोपरी बाह्य शक्तींच्या योगानें समाजानें मोक्षाप्रत न्यावें हें अनिष्ट आहे. " आत्मैव ह्यात्मनो बंधुः" हें गीतेंतील ब्रीदवाक्यच या ठिकाणीं लागूं केलें पाहिजे. समाजानें व्यक्तीच्या उन्नतीस अनुकूल अशीं हजारों साधनें निर्माण करून ठेवावीं व नंतर व्यक्तीलाच आपली उन्नति करूं द्यावी हा मार्ग उत्तम समजला पाहिजे. शिवाय

व्यक्तीनें स्वतःच्या प्रयत्नानें आपली उन्नति केल्यास ती अधिक चिरस्थायी असते असा अनुभव आहे. विद्यार्थ्यानें स्वतः उदाहरणें सोडविणें व शिक्षकानें तीं त्याच्याकरितां सोडवून देणें यांमध्यें जो फरक आहे, तोच व्यक्तीनें स्वतः आपली उन्नति करणें व समाजानें व्यक्तीची उन्नति करणें यांमध्यें आहे. नियंत्रणाचा प्रत्येक निर्बंध हा आपणच आपल्या स्वेच्छेनें उत्पन्न केला आहे असें व्यक्तीस वाटलें पाहिजे, म्हणजे कायद्याची अमलबजावणी करणें अतिशय सुकर होईल. अन्यपक्षीं नियंत्रण हें हितकर आहे ही भावना व्यक्तीच्या मनांत उत्पन्न न झाल्यास व्यक्ति नेहमी नियंत्रणास विरोध करीत राहील–निदान नियंत्रणाच्या कार्यास मनापासून मदत करणार नाहीं– आणि अशा रीतीनें कायद्यांची व सामाजिक आचारांची अमलबजावणी होणें फार कष्टप्रद व दुःसाध्य होईल. अशाप्रकारें व्यक्तीच्या मनाची तयारी करणें हें काम प्रत्येक कुटुंबांतील पालकाचें व देशांतील शिक्षकाचें आहे. त्यांनीं या कामांत कसूर करतां कामा नये; केल्यास ते दोषास पात्र होतील.

समाजसत्तावादास जो हल्लीं विरोध केला जातो तोहि व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाच्या आधारावरच केला जातो. प्रत्येक गोष्ट समाजानें आपल्या ताब्यांत घेतल्यास एक तर सरकारचें काम बिकट होईल; व दुसरी गोष्ट म्हणजे व्यक्तीवर अनान्वित जुलूम होईल. कल्पना करा कीं, एखाद्या समतावादी समाजांत मनुष्यानें शेती करावी किंवा नाहीं, केल्यास किती बिघे लागवडीस घ्यावे, त्यांत किती खत घालावें व तें कोठून विकत घ्यावें, नंतर उत्पन्न झालेला माल कोणास कोणत्या भावानें विकावा हें सर्व नियंत्रित केलें; त्याचप्रमाणें कोणतें अन्न खावें, कोणत्या प्रमाणांत खावें व किती वाजतां जेवण करावें, पक्वान्नें कोणत्या दिवशीं करावीं व किती मित्रांस त्यावेळीं जेवावयास निमंत्रण द्यावें; त्याचप्रमाणें कोणते खेळ कोणत्या दिवशीं खेळावे, व्यायाम किती घ्यावा व कोणत्या ठिकाणीं घ्यावा; तसेंच स्वतःच्या पतीशीं किंवा पत्नीशीं किती मिनिटें भाषण करावें वगैरे बाबतींत

विस्तृत कायदे केले व त्यांची अमलबजावणी केली. असें झालें असतां हा जुलूम इतका असह्य होईल कीं, यापुढें मध्ययुगांतील कोणत्याहि सुलतानी राजाच्या विचित्र लीला फिक्या पडतील! अशा तऱ्हेची कांहींशीं प्रवृत्ति हल्लीं रशियांत दिसून येत असून ती वृद्धिंगत झाल्यास 'कम्यूनिझम्'चें नांव अप्रिय होईल व ती पद्धति जें कांहीं चांगलें कार्य करीत आहे त्याला बाध येईल. अशा रीतीनें व्यक्तिस्वातंत्र्याचा पूर्ण नाश केल्यास समाज म्हणजे एक मोठा तुरुंगच होऊन बसेल.

वरील त्रोटक विवेचनावरून असें दिसून येईल कीं, व्यक्तिस्वातंत्र्य हें तत्त्व समाजसत्तेइतकेंच महत्त्वाचें समजलें पाहिजे. दोनहि टोकांना समाज न नेतां तो शक्य तितका मध्यावर ठेंविला पाहिजे. समाजविघातक व्यक्ति-स्वातंत्र्य व व्यक्तीला गुलाम बनविणारें समाजनियंत्रण हीं दोनहि टाळलीं पाहिजेत. या दोहोंच्यामध्यें कोणतें व कसे धोरण आखावें हा समाजशास्त्रां-तील अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. समाजशास्त्रावरील प्रत्येक ग्रंथांत या प्रश्नाचा थोडाबहुत विचार केला जातो व उभयपक्षीं अतिरेक होऊं नये असेंच बहुतेक ग्रंथांतील प्रतिपादन आहे. हल्लींच्या काळीं युरोपखंडांत व्यक्तिस्वातंत्र्य अधिक आहे हें ठरविणें फार कठीण आहे. परंतु नियंत्रणाचें क्षेत्र प्रत्यहीं हळूहळू वाढत चाललें आहे हें निर्विवाद होय. समाजसत्ता-वादाचा पक्ष अधिकाधिक प्रबल होत चालला आहे, हें कोणीहि निःपक्ष-पाती मनुष्य कबूल करील. अशा वेळीं व्यक्तिस्वातंत्र्याचें तत्त्व लोपलें जाण्याचा संभव आहे; व ह्या कारणास्तव त्या तत्त्वाचें महत्त्व जनतेपुढें मांडून समाजसत्ताधारी जीं सरकारें त्यांनाहि धोक्याची सूचना देणें इष्ट आहे. सरकारास वाटेल तें करण्याचा अधिकार आहे ही कल्पना भ्रामक आहे. समाजाचें आत्यंतिक हित पाहूनच सरकारनें आपला अधिकार बजाविला पाहिजे. ज्या बाबतींत व्यक्ति समाजहिताच्या आड येत नाहीं त्या बाबतींत तिला नियंत्रित करणें अयोग्य आहे; कारण अशा नियंत्रणाचें समर्थन करितां येत नाहीं. ज्या वेळेस व्यक्ति समाजहितास विघातक अशी कृति करूं लागेल

त्या वेळेसच व तितक्याच मर्यादेपुरतें तिचें नियंत्रण केलें पाहिजे. यापुढें समाजसत्तेचा अतिरेक होतां कामा नये; झाल्यास व्यक्ति स्वावलंबी न होतां परावलंबी होईल.

समाजापुढें उच्च ध्येयें ठेवून समाजनियंत्रण करतात असें पूर्वी सांगण्यांत आलेंच आहे. परंतु येथेंहि मनुष्यस्वभावानें नियंत्रणास मर्यादा घातली आहे. अत्युच्च ध्येयें व अव्यवहार्य नियम समाज यशस्वी करूं शकत नाहीं. उदाहरणार्थ सर्वांनीं विवाह न करितां ब्रह्मचर्य पाळावें हें ध्येय समाजापुढें ठेविलें तरी तें कृतींत उतरूं शकत नाहीं; उलट अशा ध्येयाचा परिणाम इष्ट आहे त्याच्याविरुद्ध कित्येक वेळां होतो. ह्याप्रमाणें कॅथॉलिक धर्माच्या अव्यवहार्य ध्येयांनीं तद्धर्मीयांचें अतोनात नुकसान झालेलें आहे. आर्यावर्तांतहि अहिंसादि ध्येयांनीं समाजाचें नियंत्रण करणें कठीण झालें; आणि अहिंसेच्या विरुद्धच सर्व लोक वर्तन करूं लागले. म्हणून धर्मशास्त्रकारांनीं व कायदेपंडितांनीं समाजाची मनोरचना पाहून लोकांना अमलांत आणतां येतील अशाच तऱ्हेचे नियम घालून दिले पाहिजेत. लोकांची जितकी तयारी असेल त्याच्या किंचित् पुढें कायद्यानें असावें, अतिशय पुढें जाऊं नये, असें प्रो. डायसी यांनीं जें म्हटलें आहे तें खरें आहे. हल्लीं सारडा कायद्यानें अशाच तऱ्हेची परिस्थिति निर्माण झाली आहे. कायद्यानें चवदा वर्षांवर वधूचें वय असावें असें ठरविलें; परंतु लोकमत अजून तयार नाहीं. तथापि तें फार मागें आहे असेंहि नाहीं. त्यामुळें कायद्याचा परिणाम होऊन लोकमत कायद्याच्या मर्यादेपर्यंत लवकरच येईल असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु युरोपांत मद्यपानबंदीचा कायदा केला तर तो यशस्वी होणार नाहीं. कारण त्याला अनुकूल असें लोकमत तयार झालेलें नाहीं. युनायटेड् स्टेट्समध्यें मद्यपाननिषेधाचा कायदा अमलांत येत नाहीं याचेंहि कारण हेंच आहे.

नियंत्रण करण्यास जेवढी सक्ती करावी लागेल तेवढी करण्याची सरकारची तयारी नसल्यास नियंत्रण करूं नये. समजा, एखादा कायदा इतका

अप्रिय आहे कीं; त्याच्या अमलबजावणीचें कार्य सामान्य पोलिसखात्याकडून होणार नाहीं व त्याकरितां वारंवार सैन्याचाच उपयोग करावा लागेल, तर अशा वेळीं कायदा न करणेंच श्रेयस्कर आहे. कारण तो केल्यापासून हितापेक्षां अहितच अधिक होणार. उदाहरणार्थ, हिंदूंनीं कोणतीहि वाद्यांची मिरवणूक केव्हांहि काढूं नये असा कायदा हिंदुस्थानांत केल्यास वर वर्णिलेली स्थिति निर्माण होईल. हाच नियम कुटुंबांतील नियंत्रणासहि लागू आहे. कुटुंबांत असे नियम करूं नयेत कीं, ज्यांची बजावणी जबर शारीरिक शिक्षा केल्याशिवाय होणार नाहीं. प्रत्येक कुटुंबांतील मनुष्यानें ठराविक वेळीं जेवावयास आलें पाहिजे असा नियम केल्यास तो सहज पाळला जाईल; परंतु कोणत्याहि मनुष्यानें चहा पितां कामा नये हा नियम अधिक जाचक होईल व चोरून त्याचें अतिक्रमण होण्याचा संभव राहील. त्याचप्रमाणें प्रत्येक कुटुंबांतील पुरुषानें अमुक देवाचें दर्शन घेतलेंच पाहिजे असा नियम पाळला जाणार नाहीं; कारण कांहींची श्रद्धा नसेल, तर कांहींना सक्ती म्हणून हें नियमन आवडणार नाहीं. प्रथम कांहीं वर्षें अशा तऱ्हेच्या दर्शनाविषयीं लोकांमध्यें आवड उत्पन्न करून नंतर असा नियम अमलांत आणिला पाहिजे. त्याचप्रमाणें हल्लींच्या समाजांत धूम्रपान पूर्णपणें बंद करण्याचा कायदा अनन्वित सक्ती केल्याशिवाय कोणत्याहि सरकारास अमलांत आणितां येणार नाहीं. सुमारें शेंकडा ऐंशी लोक युरोपमध्यें धूम्रपान करीत असल्यामुळें त्या खंडांत लोक प्रत्यहीं हा कायदा मोडतील व कोट्यवधि लोकांवर खटला करणें अशक्यप्राय होऊन जाईल. अशा गोष्टींत कायदे करण्यापेक्षां शाळांमध्यें व इतरत्र धूम्रपानापासून होणाऱ्या अपायाविषयीं व्याख्यानें, चित्रपट इत्यादिकांच्या द्वारें उत्तम माहिती तज्ज्ञांकडून देणें हा मार्ग अधिक सुकर व फलदायी आहे. त्याचप्रमाणें कायद्याच्या द्वारें वेश्यागृहें बंद करून वेश्यागमनास आळा घालण्याचें प्रयत्न व्यर्थ आहेत. जोंपर्यंत लक्षावधि लोकांची वेश्यागमनाकडे कांहीं कारणास्तव प्रवृत्ति आहे, तोंपर्यंत नोंदली गेलेलीं वेश्यागृहें बंद केलीं तरी गुप्त रीतीनें दुसरीं गृहें उघडण्यांत

मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत नं.

येतील. जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड इत्यादि प्रगतिपर राष्ट्रांत कायद्यांच्या द्वारें नियंत्रण करण्याचे अनेक वेळां प्रयत्न करण्यांत आले. परंतु ते सर्व विफल ठरले. वेश्यागमन ज्या मनःप्रवृत्तींपासून उत्पन्न होते त्या प्रवृत्तींची दिशा बदलून नीतीस अविरुद्ध अशा दिशेकडे त्यांचा प्रवाह लावून देणें हा नियंत्रणाचा खरा मार्ग आहे. विवाहाच्या मार्गांत ज्या नैसर्गिक अडचणी आहेत त्या दूर करणें व अधिक लोक विवाहबद्ध होतील अशी समाजरचना तयार करणें—अर्थात् कायदेशीर विवाह सुकर करणें, बेकायदेशीर संबंधाविषयीं लोकमत प्रतिकूल करणें, विवाह म्हणजे स्वातंत्र्याचा नाश आहे वगैरे वेडगळ कल्पनांचा निषेध करून विवाहाविषयीं योग्य मतांचा प्रसार करणें इत्यादि मार्गांचा अवलंब केला असतां, वेश्यागमनाचें नियंत्रण आपोआप होऊन सक्ती करण्याचा प्रसंग येणार नाहीं. तात्पर्य, जेथें समाजांतील सामुदायिक मनोरचना नियंत्रणाविषयीं अनुकूल अशी बनली नाहीं, त्या विवक्षित क्षेत्रांत नियंत्रण सफल होणार नाहीं. कायद्याच्या नियंत्रणास समाज तयार व्हावा म्हणूनच कुटुंबांत थोडथोडें नियंत्रण बालपणापासून करावें लागतें. पूर्वींच्या कर्मठपणांत हेंच तत्त्व दिसून येत होतें. शाळांमधील नियंत्रणाची अशाच तऱ्हेची उपयुक्तता असते. अशा रीतीनें क्रमशः नागरिक बनवावा लागतो.

मनुष्याच्या नैसर्गिक वृत्तींचें सक्तीनें निर्मूलन करण्याचा प्रयत्न केल्यास तो यशस्वी होत नाहीं, हें बहुजनसमाजाच्या संबंधानें निःसंशय खरें आहे. तथापि हिंदुस्थानांत ब्राह्मणांनीं ही अशक्यप्राय गोष्टहि शक्यकोटींत आणतां येते हें जगाच्या निदर्शनास आणिलें आहे. ब्राह्मणांत असंख्य तरुण विधवा पुनर्विवाहित न होतां वैधव्यस्थितींत आनंदानें आजपर्यंत राहूं शकल्या आहेत. ब्राह्मण स्त्रीपुरुषांनीं मद्यमांसाहार वर्ज्य करून एका बाबतींत तरी रसनेंद्रियावर आपला अमल पूर्णपणें बसविला आहे. अशा प्रकारचें नियंत्रण सर्व समाजांत सहज व्हावें, त्याकरितां व्यक्तीला विशेष

परिश्रम करावे लागूं नयेत म्हणून विशिष्ट परिस्थिति निर्माण करावी लागते. तसेंच शांततेचा काळ असल्यावांचून असे प्रयोग सिद्धीस जात नाहींत. ह्या भरतभूमींत वरील गोष्टी नित्याचरणांत उतरविण्यास किती काळ लागला व कोणत्या उपायांनीं त्या घडवून आणिल्या याचें संशोधन करणें समाजशास्त्राच्या दृष्टीनें अवश्य आहे. ब्राह्मणांनंतर अमेरिकन् लोक दारू-संबंधानें असाच प्रयोग करण्याचा आज प्रयत्न करीत आहेत. अमेरिकन् लोकांची भिस्त कायद्यावर असणार हें उघड आहे. ब्राह्मणांनीं इष्ट हेतु सिद्धीस नेण्यास धर्माचें साहाय्य घेतलें. जेथें कायद्याचा उपाय योजिला जातो तेथें अल्पावधींत इष्ट हेतु सिद्धीस गेल्याचा भास होईल हें खरें; परंतु त्याच्या कायमपणाबद्दल मन साशंक असतें. याच्या उलट धर्मोपायानें मनुष्याच्या मनावर हळूहळू परिणाम घडत असतो, परंतु अखेरीस पूर्ण यशाची खात्री वाटते.

प्रत्येक नियंत्रणाचें अंतिम हें असावें कीं, कांहीं कालानंतर नियंत्रणाचें अथवा कायद्याचें अस्तित्व भासूं नये. लंडन, पॅरिस, मुंबई इत्यादि शहरीं वाहतुकीचे नियम लोकांच्या इतके अंगवळणीं पडलेले आहेत कीं, पोलीस अधिकाऱ्यास सहसा मध्यें पडावें लागत नाहीं. डाव्या बाजूनें गाडी हाकणें, दिव्याशिवाय रात्रीं वाहनें न चालविणें, सूचनार्थ घंटा किंवा शिंग वाजविणें, दुसऱ्या वाहनाच्या पुढें जाण्याचें असल्यास त्याच्या उजवीकडून जाणें वगैरे नियम ह्या शहरांतील रहिवाशांच्या अगदीं परिचयाचे झालेले आहेत; आणि सहसा त्यांचें अतिक्रमण कोणी करीत नाहीं. उत्तर हिंदुस्थानांतील लहान शहरांत ह्या नियमांविषयीं अतिशय अनास्था दिसून येते, म्हणूनच कांहीं वर्षें थोडीशी सक्ती करणें आवश्यक आहे. ह्या लहान शहरांत अद्यापि नागरिकांची सदसद्विवेकबुद्धि तयार झालेली नाहीं. ती होईपर्यंत सक्ती केली पाहिजे. अशा तऱ्हेनें समाजांतील बहुतेक मनुष्यें उच्च अवस्थेप्रत पोंचलीं म्हणजे कायद्यांचें कामच राहत नाहीं; ते नुसते दप्तरांत पडून राहतात. कांट व हर्बर्ट स्पेन्सर यांचें असें मत आहे कीं,

कालांतरानें समाजांतील सर्व व्यक्तींचें वर्तन इतकें लोकोपयोगी व नीतीपूर्ण होईल कीं, शासनसंस्था स्वस्थ पडून राहतील; व नीतिनियमसुद्धा कष्टप्रद वाटणार नाहींत. हें मत जरी सर्वस्वीं खरें नाहीं तरी त्यांत थोडेंसें सत्य आहे; मात्र असा काल येण्यास किती शतकें वाट पाहावी लागेल व वाट पाहूनहि तो कधीं येईल कीं काय तें सांगतां येत नाहीं. परंतु असा काल येऊन नियंत्रणाशिवाय सर्वच लोक आनंदानें समाजहित करूं लागतील तर तें कृतयुगच अवतरलें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. सर्व नीतिशास्त्रज्ञांची अशीच इच्छा आहे आणि ते ह्या भावी कालाकडे फार उत्सुकतेनें पाहत आहेत. तथापि जोंपर्यंत लोक आपलपोटेपणानें वागून समाजहितविघात करण्यास दंड ठोकून उभे ठाकले आहेत, तोंपर्यंत कोणत्याहि राजसत्तेस सक्तीनें कायद्याची अमलबजावणी केल्याशिवाय गत्यंतर नाहीं; व तिच्याविषयीं सुज्ञ मनुष्यास सहानुभूतिच वाटेल.

अराजक नांवाचा जो पंथ आहे त्याचें तत्त्व असें आहे कीं, नियंत्रण मुळींच असूं नये, कोणत्याहि देशांत राजा अथवा इतर कोणत्याहि पद्धतीची राजसत्ता मुळींच नसावी आणि ज्या हल्लीं अस्तित्वांत आहेत त्यांचा नायनाट केल्याशिवाय समाजांत सुख उत्पन्न होणार नाहीं. हें तत्त्व मनुष्यस्वभावाचा जो आजपर्यंत संकलित केलेला अनुभव आहे त्याच्या विरुद्ध आहे. सर्व मनुष्यें शांतवृत्तीचीं, न्यायानें वागणारीं, परोपकारीं, समाजसेवा हेंच आपलें कर्तव्य मानणारीं व इतरांस पीडा न देणारीं अशीं असल्याशिवाय अराजकता एक दशकपर्यंत सुद्धा टिकणार नाहीं. सर्व मनुष्यें इतकीं उत्तम शीलवान् आहेत असें मानण्यास काय आधार आहे तेंहि अराजकतावादी सांगत नाहींत. त्यांचें पालुपद हेंच आहे कीं, मनुष्य हा फार सुशील व सद्गुणी आहे आणि समाजाच्या कृत्रिमतेमुळें तो भ्रष्ट होतो. हें जर खरें मानलें तर समाजाचा नाश केल्याशिवाय मनुष्याला सुख होणार नाहीं, असा अपसिद्धांत मांडण्याचा अनवस्थाप्रसंग प्राप्त होईल. शिवाय अराजक समाजांत जो सार्वजनिक गोष्टीकरितां पैसा एकत्र होईल

तो व्यवस्थित रीतीनें खर्च करण्याकरितां एखादें मंडळ नेमावेंच लागेल. हें मंडळ म्हणजे हळूहळू एकप्रकारचें सरकारच बनणार; व ह्या मंडळास व्यवस्थितपणा राखण्याकरितां कांहीं नियम करावे लागणार. अर्थात् अशा समाजांत पूर्ण नियंत्रणाभाव राहूं शकणार नाहीं. सारांश, अराजकांचें तत्त्व मूर्त स्वरूपांत येणें हें हल्लींच्या काळीं अशक्य आहे. नियंत्रणावांचून मनुष्य आनंदांत राहील असा काळ येण्यास आणखीं कित्येक सहस्र वर्षें गेलीं पाहिजेत असा अंदाज आहे.

मनुष्यस्वभावच असा आहे कीं, मनुष्याला वाऱ्याप्रमाणें मनास येईल तिकडे वाहावें असें वाटतें. परंतु आपण नियंत्रणाला कितीहि कंटाळलों तरी नियंत्रणाशिवाय आपलें क्षणभरदेखील चालावयाचें नाहीं. तेव्हां हें नियंत्रण न्याय्य व युक्तीला धरून असेल एवढी सर्वांनीं दक्षता बाळगली पाहिजे. ही गोष्ट लोकसत्ताक राज्यपद्धतीमध्यें उत्तम रीतीनें साध्य होते, असा सांप्रत विश्वास आहे; व याच कारणाकरितां ही पद्धति स्थापण्याची सर्व देशांत रूढि पडून गेली आहे. निदान लोकांच्या प्रतिनिधींनींच कायदे केले म्हणजे ते परकीय बंधन आहे असें म्हणतां येत नाहीं; व त्या कायद्यांना स्वयंनिर्णयाचें स्वरूप येतें. प्रजासत्ताक राज्यांत कायद्यांचा जुलूम हा शब्दप्रयोग सार्थ असत नाहीं; कारण, स्वतःच केलेले कायदे स्वतःच मानावे अशा तऱ्हेची तेथील रचना असते. यामुळें अशा राज्यपद्धतींत नियंत्रणाविषयीं तिरस्कार अथवा द्वेष उत्पन्न होत नाहीं. उलटपक्षीं, एका राजाच्या हातांत सर्व सूत्रें असतात तेव्हां त्याच्यावर धर्मानें वागण्याची मोठी जबाबदारी असते; कारण, त्याचे कायदे धर्म व नीति यांस अनुसरून नसल्यास प्रजेमध्यें असंतोष उत्पन्न होतो आणि त्यांना जुलमाचें स्वरूप प्राप्त होतें. याकरितां प्राचीन भारतीय शासनपद्धतींत निःस्पृह, धर्मज्ञ व स्वतः धर्माचरण करणारे असे मंत्री राजानें नेमून त्यांच्या सल्ल्यानें शासन करावें असा निर्बंध घातलेला असे. तात्पर्य, राज्यपद्धति एकतंत्री असो किंवा प्रजासत्ताक असो, प्रजेनें नियंत्रण तेवढें राजीखुशीन

स्वीकारिलेलें असावें हें उत्तम. अर्थात् प्रजा अतिशय अडदांड असल्यास बरीच सक्ती करावी लागेल; परंतु त्याला उपाय नाहीं. समाजाची किंचित् प्रगति झाल्यावर सक्ती कमी कमी तीव्र करावी हें उचित आहे. मनुष्याच्या स्वभावाच्या पूर्णतेचें हें एक लक्षण आहे कीं, समाजहितास आवश्यक असें नियंत्रण त्याला दुःखकारक वाटतां कामा नये.

---

# प्रकरण अकरावें

## निष्कर्ष

मागील सर्व विवेचनाचा मथितार्थ इतकाच कीं, समाज हा व्यक्तीपेक्षां श्रेष्ठ आहे. कारण समाजाव्यतिरिक्त व्यक्तीला जगतां यावयाचें नाहीं व आपला उत्कर्षहि करून घेतां येणार नाहीं. तसेंच व्यक्तीचें हित तें समाजाचेंहि हित असतेंच असा नियम नाहीं; तथापि समाजाच्या हितांत व्यक्तीचें हित असतें. ही गोष्ट लहानपणापासून मुलांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न समाजानें केला पाहिजे. समाज आणि जात ह्यांत भेद आहे. जातीचीं बंधनें लोक आपण होऊन पाळतात. समाज अथवा राष्ट्र याला नियंत्रणाची आवश्यकता असते. इतःपर समाजाचें अस्तित्व नियंत्रणावरच अवलंबून राहणार असें दिसतें. आगगाड्या, तारायंत्रें, वर्तमानपत्रें यांच्या योगानें जगांत मोठी क्रांति झाली आहे. पूर्वी आपआपल्या खेड्यापुरताच लोक विचार करीत. खेड्यापलीकडे दुसरें जग त्यांस फारसें माहीत नव्हतें. आतां ही संकुचित वृत्ति राहिली नाहीं. खेड्यांतील लोकहि जगांत काय चाललें आहे याची वाटाघाट करतात. याचा परिणाम खेड्यांतील संहति नष्ट झाली. आज सर्व

जगभर हीच स्थिति आहे. सांप्रत लोक व सरकार हे दोनच पक्ष राहतात. आपल्या अस्तित्वाकरितां, स्वास्थ्याकरितां, उत्कर्षाकरितां लोक सरकारकडे बघतात. अशा परिस्थितींत लोकांचेंच सरकार बनणें अवश्य होतें. आज सर्व जगांत प्रजासत्ताक राज्यपद्धति सर्वमान्य झाली आहे याचें कारण हेंच. सरकार व लोक हे जर एकजीव नसतील किंवा त्यांचे हितसंबंध जर परस्पर-विरुद्ध असतील, तर राष्ट्र म्हणून राहणारच नाहीं. पूर्वी हे हितसंबंध वेगळे होते; परंतु लोकांत एकोपा असल्याकारणानें आत्मसंरक्षणाचें सामर्थ्य त्यांच्यांत असे. त्यांची फळी फोडण्यास राजास जड जाई. भविष्यकाळीं अंतर्गत विरलता पावलेलें राष्ट्र केवळ राष्ट्रैक्यबुद्धीनेंच स्थिर राहील. म्हणून राज्यसूत्रें लोकांच्या हातीं आल्याशिवाय गत्यंतर नाहीं. कारण समाज त्या-शिवाय जिवंतच राहणार नाहीं. समाजाचें स्वरूप पालटलें आहे. आजचा समाज पूर्वस्थितीला जाईल ही गोष्ट अशक्य आहे. तसें होण्यास दळण-वळणाचीं साधनें व छापण्याची कला हीं जगांतून समूळ नष्ट झालीं पाहिजेत. विद्यमान स्थितींत लोकसत्ता हीच अनुरूप गोष्ट होय. लोकांच्या हातांत राज्यकारभार असला म्हणजे समाजनियंत्रणाचें स्वरूपहि लोकस्थितीला अनु-कूल असेंच असतें. लोकांमध्यें परस्पर स्निग्धता नसली तरी प्रत्येक व्यक्ति समाजशील बनली पाहिजे. समाजशील व्यक्ति आणि लोकानुकूल सरकारी नियंत्रण ह्या मार्गानेंच कोणत्याहि राष्ट्राची उन्नति होणार.

व्यक्ति स्वार्थपर होऊं नये म्हणून राष्ट्रांतील सर्व संस्थांनीं शक्य तो प्रयत्न केला पाहिजे. ज्या राष्ट्रांत पूर्वीच्या धर्मसंस्था लुप्त झाल्या नसतील त्यांत धर्माच्या द्वारें हें काम करणें जास्त सुकर होईल. गीतेनें ज्याप्रमाणें लोकसंग्रहावर जोर दिला आहे, त्याप्रमाणें सर्व धर्मग्रंथांचा रोख परोपकार व समाजसेवा यांवरच आहे. तथापि ज्या राष्ट्रांत धर्मसंस्था लुप्त अथवा लुप्तप्राय झालेल्या आहेत, त्या राष्ट्रांत शिक्षणसंस्थांनीं हें कार्य पद्धतशीर रीतीनें केलें पाहिजे. तत्त्वज्ञानांत हा विषय अंतर्भूत झाल्यामुळें तत्त्व-ज्ञानाचा जितका अधिक प्रसार होईल तितकें इष्ट आहे. तत्त्वज्ञान हा

विषय शुष्क व निरुपयोगी आहे ही कल्पना अत्यंत भ्रामक होय. लोकांना योग्य मार्गावर ठेवण्यास वेदान्ताचीं तत्त्वें त्यांच्या मनांत पूर्णपणें बिंबलीं पाहिजेत; व हें कार्य तत्त्वज्ञानाच्या अभ्यासानें सुसाध्य होतें.

समाजाची सदा प्रगतिच होत राहील असें मानण्यास सबळ कारणें दिसत नाहींत. ऐतिहासिक पुरावाहि अशाच प्रकारचा आहे. आजपर्यंत अनेक राष्ट्रें उन्नतीच्या शिखरावर चढूनहि त्यांचा अखेरीस समूळ नाश झाला व मागमूसहि राहिला नाहीं. याचें कारण असें दिसतें कीं, उत्कर्षांतच अपकर्षाचें बीज असतें. उत्कर्षापकर्ष हें व्यक्तीच्या तसेंच समाजाच्या मागें लागलेच आहेत. उत्कर्षानंतर अपकर्ष व अपकर्षानंतर उत्कर्ष हें रहाटगाडगें सारखेंच चालत असणार. तथापि त्यांतहि उत्कर्षामागून अपकर्ष हें जितकें निश्चयानें सांगतां येतें, तितकें अपकर्षानंतर उत्कर्षाचा प्रादुर्भाव होतोच असें सांगतां येत नाहीं. कारण अधोगतीला गेलेले अनेक समाज नामशेष झाले आहेत. उलट युरोपीय राष्ट्रांचें उदाहरण आज आपल्या डोळ्यांपुढें आहेच. भौतिक वैभवाच्या शिखराला पोंचलेलीं हीं राष्ट्रें जिवंत कसें राहतां येईल ह्या विवंचनेंत आज आहेत. संपत्तीच्या मागें लागून ज्या मार्गानें त्यांनीं धनसंचय केला त्याच मार्गावर असतां धन त्यांना सोडून गेलें. धनाचा अमर्याद हव्यास म्हणजेच लोभ होय. लोभ हा मनोविकार आहे. त्याच्या योगानें विवेकशक्ति भ्रष्ट होते. सद्विवेक नष्ट झाला कीं, उतरती कळा लागण्यास उशीर लागत नाहीं. असें नसतें तर अत्यंत प्रबल राष्ट्रांचें वैभव त्रिकालाबाधित राहिलें असतें; एकदा का उन्नतीचा मार्ग सांपडला म्हणजे मग त्या समाजाला अवनति बघण्याचें कारणच काय ? परंतु अनुभव याच्या अगदीं उलट आहे. मनुष्याला जन्म-मरण आहे त्याप्रमाणें समाजालाहि उदयास्त आहेत. जर्मनीचा सर्व राष्ट्रांनीं मिळून पराजय केला. जयाच्या मदानें वाटेल तितकी खंडणी जर्मनीवर लादतां आली. महायुद्धानंतर जर्मनीपाशीं पैसा असणें अशक्य असल्या-कारणानें मालाच्या रूपानें खंडणी वसूल करण्याचें पतकरावें लागलें. त्याचा

परिणाम बाकीच्या सर्व राष्ट्रांचे उद्योगधंदे बुडण्यांत झाला; आणि आज असा अपूर्व चमत्कार जगाच्या दृष्टीस पडत आहे कीं, जेतेच खंडणीची सूट देण्याचा आग्रह धरीत आहेत! आपल्याला तारक होईल म्हणून जी परिस्थिति आपण निर्माण करतों तीच आपणांस प्रसंगीं मारक होते. हा व्यवहारांतील अनुभव समाजनेत्यांनीं ध्यानांत ठेवणें अवश्य आहे.

समाजाला उन्नतीला नेण्याकरितां उपाय योजावे लागतात, त्याचप्रमाणें उन्नतीला पोंचलेला समाज अधोगतीला न जावा म्हणूनहि दक्षतेनें उपाय-योजना करणें अवश्य आहे. ह्या दोन उपायांत स्वरूपतः भेद असेल हें खरें; परंतु " जितं मया " म्हणून स्वस्थ बसून कधींहि चालणार नाहीं. कोणताहि समाज पूर्णत्वाला पोंचल्याचें उदाहरण इतिहास देत नाहीं. व्यक्तीच्याहि वासना कधीं तृप्त होत नाहींत. जें जें कांहीं पाहिजे तें तें सर्व इच्छेनुरूप लाभलें, वासना ज्याच्यावर जाईल असें कांहीं उरलें नाहीं अशी स्थिति आजपर्यंत कोणत्या तरी मनुष्याची झाली आहे काय! वासना उद्भवणें आणि तृप्त होणें ह्यांत फरक आहे हें सांगावयास नको. तात्पर्य, मनुष्य जसा सदैव अतृप्त असतो तसाच समाजहि असतो. महत्त्वाकांक्षी व चळवळ्या समाजाची हाव अनिवार व अमर्याद असते. आर्थिक परिस्थिति हेंच तिचें निरोधन होय. समाजांत उद्भूत होणाऱ्या अनेक वासना पूर्ण करण्याची महत्त्वाकांक्षा सध्यातरी अशक्यप्राय वाटते. तेव्हां समाज नेहमी अपूर्ण राहणार असें धरून चालण्यास हरकत नाहीं. आतां अतृप्त वासना तृप्त करून घेण्याकरितां समाजांतील कांहीं व्यक्ति धडपड करीत राहणार ही गोष्ट निर्विवाद आहे. तथापि बहुजनसमाज मर्यादित आकांक्षाक्षेत्रांत राहूनच कालक्रमणा करणार यांत संशय नाहीं. अशा बहुजनसमाजाच्या दृष्टीनें नियंत्रणाची दिशा व स्वरूप हीं निश्चित करावीं लागतील.

प्रत्येक नियंत्रण कायदा, रूढि व आचार ह्या स्वरूपांत व्यक्त होतें. म्हणून कायद्यांत, रूढींत व आचारांत वेळोवेळीं बदल होत असतो. परंतु ह्या प्रत्येक बदलाला सुधारणा हा शब्द लावतां येणार नाहीं. जिच्या योगानें

स्थळ प्रत

आपण सांस्कृतिक प्रगतीच्या मार्गांत पुढील मजल गांठूं शकूं तिलाच सुधारणा म्हणतां येईल. हे सुधारणानिदर्शक फेरफार फार थोडे असतात. कोणत्याहि समाजाचें अंतिम ध्येय एकच असणार. सर्वांनीं सुखी असावें हेंच तें ध्येय होय. सुखाचा संबंध मनाशीं असल्याकारणानें सुखामध्यें आरोग्यादि शारीरिक सुख व नीतिजन्य सात्त्विक सुख अशा दोनहि सुखांचा अंतर्भाव होतो. म्हणून समाजांतील प्रत्येक व्यक्ति सुखी राहील, हाच कोणत्याहि नियंत्रणाचा उद्देश असला पाहिजे. कोणतेंहि समाजबंधन ह्या व्यक्तिसुखाच्या आड येतां कामा नये. समाजांत किती व्यक्तींना किती सुख मिळत आहे यावरच राज्यकर्त्यांची व धर्मकर्त्यांची किंमत ठरविली जाते. अंतिम ध्येय परिस्थितिनिरपेक्ष असतें. खरें बोलावें, कसलाहि अपहार करूं नये, एका पुरुषाला एकच स्त्री असावी व एका स्त्रीला एकच पति असावा, हिंसा करून नये, प्रामाणिकपणा सोडूं नये, व्यसनापासून दूर असावें, सदा उद्योग करावा, कोणत्याहि गोष्टींत परिमितता असावी, दुसऱ्याच्या सुखाशीं आपलें सुख निगडित झालें आहे ही भावना ठेवावी, परमेश्वरानें दिलेल्या बुद्धीचा पूर्ण फायदा आपणांस व इतरांस करून देण्याचा अट्टहास धरावा, सर्व आचरण विवेकप्रेरित असावें इत्यादि नियम त्रिकालाबाधित असतात. अशा प्रकारचें वर्तन मनुष्यमात्राच्या हातून सहज घडावें, उलट वर्तन करण्याकडे मनुष्याची प्रवृत्ति होणार नाहीं, अशी परिस्थिति सदा टिकावी म्हणून राज्यकर्त्यांनीं दक्षता बाळगिली पाहिजे. अनैतिक आचरण करविणारी परिस्थिति निर्माण झाल्यावर अनिष्ट गोष्ट सक्तीनें बंद करण्याकरितां उपाय योजणें एकंदरींत गौणच. सावकाराचें कर्ज बुडवावें ही वृत्ति ज्या परिस्थितीमुळें शेतकऱ्यांच्या मनांत उत्पन्न झाली, ती परिस्थिति निर्माण होऊं न देण्याची खबरदारी घेतली असती तर बरें झालें असतें. शेतकरी आणि सावकार यांच्यांत बाचाबाची होऊन एकाचीं हाडें मोडल्यावर शेतकऱ्यांच्या ऋणमुक्ततेचा कायदा करणें गौणच म्हटलें पाहिजे. समाज-

नायकांचें लक्ष अंतिम ध्येयावरून कधींहि चळतां कामा नये. लोकांच्या नीतिकल्पनांचें क्षेत्र उत्तरोत्तर विस्तृत होत आहे अथवा संकोच पावत आहे याचा आढावा वेळोवेळीं घेतला पाहिजे. माणसाला नीतिभ्रष्ट करण्यास पैशाचा अभाव व पैशाचा अतिरेक हीं सारखींच कारणीभूत होतात. दारिद्र्यामुळें अपहारबुद्धि बळावते, परोपकाराची वृत्ति लय पावते, समाजशीलता हीन होते; थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे समाजांतील एक व्यक्ति म्हणून जे गुण अवश्य पाहिजेत त्या सर्वांचा त्या व्यक्तीमध्यें लोप झालेला आढळतो. दारिद्र्यजन्य दुर्गुण समाजाला बाधा करतात. परंतु अतिरिक्त संपत्तीमुळें उद्भवणारे दुर्गुण प्रथमतः तरी वैयक्तिक स्वरूपाचे असतात. श्रीमंतींत लोळणारा मनुष्य प्रथम आळशी व व्यसनी होतो; दरिद्री माणूस लबाड व फसव्या बनतो. अप्रामाणिकपणामुळें समाजांत राहण्यास मनुष्य अपात्र होतो. उलट, व्यसनी व आळशी माणूस पैशाच्या जोरावर परोपकार करूं शकतो. म्हणून श्रीमंतीचे चार समाजाला एकदम नडत नाहींत. एवढ्यासाठीं समाज दारिद्र्यग्रस्त न होऊं देण्याविषयीं समाजनियंत्यांनीं शिकस्तीचे प्रयत्न करणें अवश्य आहे. दरिद्री समाज हा समाज ह्या संज्ञेसच पात्र होणार नाहीं. समाजांतील प्रत्येक व्यक्ति खाऊनपिऊन सुखी असली पाहिजे. ती तशी सुखी राहील अशाबद्दल राज्यकर्त्यांनीं दक्षता बाळगिली पाहिजे. युरोप-अमेरिकेंत बेकारी घालविण्याचे प्रयत्न ह्याच तत्त्वावर करण्यांत येतात. राष्ट्रांत संपत्ति विपुल असावी, हें म्हणणें सयुक्तिक दिसतें. कारण, पनामा कालव्यासारखीं प्रचंड कामें पर्वतप्राय संपत्तीशिवाय कशीं होऊं शकतील ! हें जरी खरें असलें तरी ही संपत्ति लोकांजवळच पाहिजे असें नाहीं. सरकारच्या हातांत संपत्ति असली म्हणजे झालें. आतां कराच्या रूपानें लोकांजवळील संपत्ति सरकार आपल्याकडे ओढून घेईल तर लोकांत असमाधान होईल व शिवाय द्रव्यसंचय करण्याची कोणीच काळजी घेणार नाहीं. तेव्हां द्रव्यार्जनाचे मार्ग आपल्या ताब्यांत घेणें हेंच सरकारास सोयीचें होण्यासारखें आहे. इतःपर सरकार

हें लोकांचेंच असणार; त्यामुळें अनेक धनोत्पादक कारखाने सरकारनें चालविण्यास हरकत घेण्याचें कारण उरणार नाहीं. धनोत्पादक कारखाने सरकारच्या हातीं राहिल्यास समाजांत संपत्तीच्या योगानें होणारी विषमता आपोआपच नष्ट होईल. हा कांहीं लहानसहान फायदा नाहीं.

उन्नतीची दिशा निश्चित करून सुकाणदारानें समाजनौका त्या रोखानें चालविली पाहिजे. परंतु इष्टस्थानीं पोंचण्याकरितां वाऱ्याच्या अनुसंधानानें गलबत ज्याप्रमाणें प्रसंगानुसार वेगवेगळ्या दिशेकडे फिरवावें लागतें, त्याचप्रमाणें समाजालाहि वळणावळणांनीं जाणें भाग पडतें. ह्यालाच पूर्व-ग्रंथकारांनीं 'आपत्काल' ही संज्ञा दिली आहे. ह्या वेळीं आपण आपल्या आचरणांत जे फेरबदल करतों त्यास सुधारणा शब्द लावणें अनुचित होय. एका पुरुषानें एक स्त्री करणें हा उत्तम मार्ग असूनहि कांहीं निमित्तानें समाजांत स्त्रियांची संख्या पुरुषांच्या दुप्पट झाल्यास एका पुरुषानें दोन स्त्रियांशीं लग्न लावणें क्षम्यच नव्हे तर धर्म्य होईल. स्त्रियांचा नैतिक अधःपात टाळण्याकरितां असें करणें भाग पडतें. कारण, स्त्रीनें विवाहबद्ध होऊनच विषयसुख अनुभवावें हा श्रेष्ठ नीतिधर्म होय. तात्पर्य, नीतीच्या मार्गांत पिच्छेहाट झाली तरी हरकत नाहीं, परंतु मार्ग सुटतां कामा नये. समाज मार्गावर असला पाहिजे. स्त्री-पुरुषांचें संख्याबल सारखें असून एका पुरुषानें विशेष कारणाच्या अभावीं अनेक स्त्रिया केल्या, तर तो पुरुष ध्येयाचा मार्ग सोडून भलतीकडेच वाहवला असें समजावें. कोणीं दारू पिऊं नये असा नियम करणें म्हणजे सुधारणा करणें होय. आजारीपणांत जरूर तर दारू प्यावी असा कायदा करणें म्हणजे सुधारणा करणेंच आहे, असा आग्रह धरणें योग्य होणार नाहीं. सारांश, तात्पुरते हितावह वाटणारे उपचार आणि अंतिमध्येयसिध्यर्थ केलेली उपाययोजना यांतील भेद समाज-नियंत्यांनीं नीट ओळखिला पाहिजे. आपद्धर्म म्हणजे शाश्वतधर्म नव्हे. परंतु पुष्कळ विद्वानांचें ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष होतें. तात्कालिक उपचारांना ते शाश्वत समजतात. समाजाकडे दोन डोळ्यांनीं न पाहतां एकाच डोळ्यानें

जे पाहतात त्यांची अंतिम ध्येयावरची दृष्टि चळते. तात्कालिक उपचार करण्यानें ते आपणांस कृतार्थ समजतात. परंतु हा दोष आहे. राजपुरुष किंवा धर्मपुरुष जें जें नियंत्रण करतात तें सर्व वरील दोन प्रकारांत कोठें तरी पडतें. म्हणजे नियंत्रणाचे किंवा नियमनांचे उद्देश दोन प्रकारचे असतात. हे दोन निरनिराळे उद्देश समाजापुढें स्पष्टपणें असले पाहिजेत. इंग्रज लोकांची दृष्टि तात्पुरत्या उपाययोजनेवरच खिळलेली असते. अंतिम ध्येय साध्य करून घेण्याची विशेष पर्वा ते करीत नाहींत. उलट, हिंदूंची दृष्टि अंतिम ध्येयावर विशेष असते. ह्यामुळेंच आपद्धर्मांचा प्रपंच हिंदुधर्मशास्त्रांत केलेला आढळतो. मुसलमानी अथवा ख्रिस्ती धर्मांना ही आपद्धर्मांची कुलकथा अवगत नाहीं.

वरील विवेचनावरून असें निष्पन्न होतें कीं, समाज हा पूर्णावस्थेला पोंचणार नाहीं हें गृहीत धरूनहि तो सर्व प्रकारांनीं पूर्ण व्हावा हा उद्देश पुढें ठेवूनच समाजनेत्यांनीं समाजनियमांचें स्वरूप बनविलें पाहिजे. मनुष्याच्या पूर्णत्वाची कसोटी त्याचें मन अथवा वासना आणि बुद्धि ह्यांवर अवलंबून असते. अजूनहि नवीन शोध लागत आहेत. यावरून मनुष्याची मेधा म्हणजे बुद्धि हिनें अद्यापि अखेरची मजल गांठली नाहीं, हेंच सिद्ध होतें. बुद्धीचा विकास केव्हां पूर्ण होईल याची कल्पनाहि आज करवत नाहीं. गेल्या पंचवीस वर्षांतील शोध अजब आहेत यांत शंका नाहीं. तथापि शास्त्रज्ञांची अपेक्षा फलद्रूप झाल्यास पुढें होणाऱ्या शोधांच्या मानानें हें कांहींच नाहींत असें म्हणावें लागेल. सारांश, मानवी बुद्धि अद्यापि अपूर्ण आहे असेंच म्हणावें लागतें. मात्र बुद्धीचा विकास सारखा होत आहे हें विसरतां कामा नये. हा बुद्धीचा विकास कधींकाळीं पूर्ण झालाच तर अंशतः तरी मनुष्यत्वाला पूर्णता आली असें म्हणतां येईल. सर्व माणसांची बुद्धि सारखी नसते हें खरें. परंतु थोड्या माणसांची बुद्धि जरी प्रगल्भ झाली तरी तिचा फायदा सर्वांस मिळतो हें लक्षांत ठेविलें पाहिजे. आगगाडीची युक्ति एकानेंच काढिली, परंतु निर्बुद्ध माणसांनाहि आगगाडीचा

8-872

उपयोग होत आहे. अर्थात् एका माणसाच्या बुद्धीचा उपयोग सर्व समाजास होतो.

मन आणि बुद्धि यांत अंतर आहे. बुद्धि विकसित करावी लागते, मन सुसंस्कृत करावयाचें असतें. बुद्धीचा उपयोग समाजाला प्रत्यक्ष व तावडतोब होतो, सुसंस्कृत मनाचा उपयोग अप्रत्यक्ष व परंपरेनें होतो. ऐकांतिक स्वार्थपरायणता ही समाजाला जाचक होते; आणि स्वार्थपरायणता हें असंस्कृत मनाचें कार्य आहे. तो एक मनाचा विकार आहे. ह्याचा अर्थ असा कीं, विकारवश माणसें स्वतःचेंच सुख बघतात. दुसऱ्याच्या सुखाविषयीं तीं बेदरकार असतात. दैहिक सुखलोलुपता विकास पावलेल्या बुद्धीलाहि जडत्व व मलिनत्व आणते. एवढ्यासाठीं मन व बुद्धि ह्यांच्या सुधारणेच्या बाबतींत सारखेच प्रयत्न करावे लागतात. मनुष्याच्या बुद्धीला पटवून दिलें म्हणजे त्याच्याकडून नेहमीं सद्वर्तन होईलच असा नियम नाहीं. ह्या कामीं बुद्धि ही दुर्बल ठरली गेली आहे. म्हणून अनेक युक्त्या लढवून समाजाला सद्वर्तनाची संवय जडवावी लागते. परंतु याचा परिणाम असा होतो कीं, विचार करण्याची संवय नाहींशी होते. त्याचें वर्तन विचारपूर्वक होत नाहीं. कायद्यानें, रूढीनें, धर्मानें, लोकमतानें लादलें गेलें म्हणूनच माणसाच्या हातून सद्वर्तन घडत असतें. हीहि स्थिति चांगली नाहीं. आज हिंदु समाजाची स्थिति अशाच प्रकारची झाली आहे. आमचा निकृष्ट हिंदु दुसऱ्या कोणत्याहि धर्माच्या त्याच स्थितींतील माणसापेक्षां आचाराच्या दृष्टीनें श्रेष्ठ ठरेल. परंतु विवेकशक्तीच्या अभावीं त्याच्या आचाराचें समर्थन करण्याचा त्यास प्रसंग आल्यास त्याला मौन स्वीकारावें लागतें. ही झाली निकृष्ट स्थितींतील माणसाची गोष्ट; पण ब्राह्मणासारख्या वरिष्ठ जातीच्या माणसाची स्थिति त्याहून चांगली आहे असें नाहीं. हिंदु समाजाच्या आजच्या दुःस्थितीचें मुख्य कारण विचाराचा अभाव हेंच होय. तथापि विचार अथवा चिकित्सक बुद्धि फार झाली म्हणजे मनुष्य अश्रद्ध बनून त्याच्या वर्तनांत अस्थिरता उत्पन्न होते. चिकित्सकपणानें सदाचार घडेलच असा नियम नाहीं; उलट, विरुद्ध आचार

घडण्याचा संभव मात्र उत्पन्न होतो. ह्याकरितां सदाचाराचें वळण आणि विचार करण्याची संवय हीं इष्ट प्रमाणांत असणें अगत्याचें आहे.

प्रत्येक मनुष्यानें आपली विचारशक्ति वाढविली पाहिजे आणि ती विचार करूनच वाढणार हें उघड आहे. परंतु मनुष्यानें विचार केला तरी त्याच्या विचाराप्रमाणें वागण्याचें स्वातंत्र्य त्यास देणें मात्र उचित होणार नाहीं. बुद्धीच्या कमजास्तपणामुळें, प्रत्येकास आचारस्वातंत्र्य दिलें तर समाजांत गोंधळ उडेल. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत राहणार नाहीं. समाज नाश पावेल. कायद्याचें नियंत्रण सर्वांना सारखें असतें. म्हणजे कायद्यानें आचारस्वातंत्र्य हिरावून घेतलें जातें. ह्यांतच समाजाचें हित आहे. कायद्याच्या बाहेरील क्षेत्रांतहि ह्याच नियम लागू केला पाहिजे. तात्पर्य, विचार हा वैयक्तिक असला तरी आचार सांघिक असावा लागतो. ह्या कल्पना मुलें शाळेंत असतांनाच त्यांच्या मनावर ठसविल्या पाहिजेत. समाजाचें नियंत्रण करण्याचा अधिकार ज्यांना प्राप्त झाला आहे त्यांनीं वरील गोष्टींचें मनन करावें. आरंभीं सांगितल्याप्रमाणें कोणत्याहि नियंत्रणाचा उद्देश समाज सुखी असावा हाच असला पाहिजे. “ दिवस बहुत कठीण आले. कोणी सुखांत असों नये अशीच काळसत्ता आली आहे. ” अशा तऱ्हेचें उद्गार कोणाच्याहि तोंडांतून निघणार नाहींत ह्याविषयीं समाजनेत्यांनीं दक्षता बाळगिली पाहिजे.

REFBK-0004612

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 8E92

# लोकशिक्षण-लघुग्रंथमाला

संपादकः गणेश गंगाधर जांभेकर

पुस्तक १ समाजनियंत्रण
श्री. ना. गो. चापेकर, बी. ए., एल्‌एल्. बी.

,, २ हिंदुस्थानचा आर्थिक इतिहास
(अर्वाचीन विभाग–इ. स. १८५०–१९३०)
प्रो. ध. रा. गाडगीळ, एम्. ए. एम्. लिट्.

,, ३ श्रीज्ञानदेव (चरित्र, ग्रंथ व तत्त्वज्ञान)
प्रो. शं. वा. दांडेकर, एम्. ए.

प्रत्येकीं किंमत १२ आणे

पत्ता:—व्यवस्थापक, 'लोकशिक्षण–कार्यालय'
सदाशिव पेठ, पुणें